# चितगांवचे क्रांतिकारक

लेखिका

**कल्पना दत्त**

लो क प्र का श न गृ ह
राजभवन, सँढर्स्ट रोड,
मुंबई ४

किंमत दीड रुपया

| | | |
|---|---|---|
| मूळ बंगाली आवृत्ति | : ऑक्टोबर | १९४५ |
| पहिली इंग्रजी आवृत्ति | : ऑक्टोबर | १९४५ |
| ” गुजराती ” | : जानेवारी | १९४६ |
| ” हिन्दी ” | : एप्रिल | १९४६ |
| ” **मराठी** ” | : **जून** | **१९४६** |

या शिवाय या पुस्तकाच्या तामिळ, तेलगु व मल्याळी आवृत्त्या याच वर्षी प्रसिद्ध झाल्या आहेत.

मुद्रक : शरफ अतहरअली, न्यू एज प्रेस, १९० बी. खेतवाड़ी मेन रोड, मुंबई ४
प्रकाशकः शरफ अतहरअली, लोकप्रकाशन गृह, राजभुवन, सँढर्स्टरोड, मुंबई ४

अद्याप तुरुंगांत असलेले
माझे ‘ दादा ’ व कॉम्रेड्स्
यांस
ज्या जनतेसाठीं त्यांनीं लढा केला,
जिच्यासाठीं त्यांनीं हालअपेष्टा
सोसल्या, ती जनता त्यांची सुटका
करण्यासाठीं आम्हांला मदत करील
या विश्वासानें
समर्पण

# अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| पुरस्कार ... ... ... ... | ५ |
| प्रस्तावना ... ... ... ... | ७ |
| मास्तरदा ... ... ... ... | १६ |
| अनंत सिंह ... ... ... ... | २७ |
| गणेश घोष ... ... ... ... | ३५ |
| अंबिका चक्रवर्ती ... ... ... ... | ३९ |
| सावित्री देवी ... ... ... ... | ४४ |
| सुहासिनी गांगुली ... ... ... ... | ५० |
| प्रीति वदादार ... ... ... ... | ५७ |
| मणी दत्त ... ... ... ... | ६७ |
| स्वदेश रॉय ... ... ... ... | ७६ |
| शान्तिदा ... ... ... ... | ८१ |
| टेग्रा ... ... ... ... | ८५ |
| एकेकाळी सारेच आम्हांला पाठिंबा देत होते ... ... | ९२ |
| मी कम्युनिस्ट कशी झाल्ये ... ... ... | ९७ |

नगर वाचनालय, सातारा.
नगर वाचनालय ता. सातारा.

# पुरस्कार

चितगांव शस्त्रागारावरील हल्ला ही आपल्या स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासांतील एक स्फूर्तिदायक घटना आहे. त्या कटांतील पुढारी सूर्य सेन आणि त्यांचे सहकारी व तरुण साथी यांच्या आठवणी या पुस्तकांत ग्रथित केल्या आहेत. या आठवणींचा विशेष म्हणजे त्या कटांत प्रत्यक्ष भाग घेतलेली कल्पना दत्त हिनें या लिहिल्या आहेत. त्या वाचतां वाचतां या वीरांविषयीं प्रेम वाटूं लागतें, आपली देशभक्ति उत्कट होते आणि आपल्या या प्राचीन देशाच्या भवितव्याविषयीं मनांत मोठी आशा उत्पन्न होते. हे वीर विविध प्रकृतीचे, भिन्न वयाचे, आणि बंगाल्यांतील मध्यम वर्गाच्या भिन्न भिन्न थरांतून आलेले असे आहेत. ज्या गुणांचें आपण कौतुक करतों अशा गुणांचीं हे वीर जिवंत प्रतीकें होत. त्यांच्या सारखी झुंज द्यायला लागणारें असामान्य धैर्य फारच थोड्यांच्या ठिकाणीं आढळतें. कल्पना दत्त हिनें या आठवणी साध्यासुध्या शब्दांत लिहिल्या आहेत. ज्या ध्येयांनीं या कटवाल्यांना प्रेरणा दिली आणि ज्या सहभावानें त्यांनीं आपल्या या ध्येयांचें संगोपन केलें त्याचें तिला प्रत्यक्ष ज्ञान होतें व त्यांतूनच या आठवणी आल्या आहेत.

घरोघर या कटाच्या लोककथा निर्माण झाल्या आहेत. या कटांतील वीर आज त्या लोककथांतील पराक्रमी विभूति झाल्या आहेत. कटांत सामील झालेल्या सर्व लहानथोर माणसांचीं नांवें ज्या गांवीं तीं जन्मलीं होतीं, त्या गांवांतील पोरांबाळांच्या तोंडीं झालीं आहेत. या कटवाल्यांना जनतेच्या हृदयांत हें अढळ स्थान कसें प्राप्त झालें तें या पुस्तकावरून सहज ध्यानांत येण्यासारखें आहे.

कल्पना दत्त हिला वास्तविक फांशीची शिक्षा व्हावयाची; पण ती सारी अठरा वर्षांची मुलगी होती याच कारणास्तव ती या शिक्षेंतून सुटली. आपल्या मावाप सरकारनें तिला जन्मठेपेची शिक्षा दिली होती, पण आपल्या जनतेनें तिची सुटका करून घेतली. तुरुंगांत गेली त्या वेळीं ती एक अल्पवयी मुलगी होती. आणि आठ वर्षें सजा भोगून ती बाहेर आली ती एक तरुण महिला म्हणून.

प्रत्यक्ष काम करीत असतांना सहजगत्या ती कम्युनिस्ट पक्षाकडे कशी आली याचें सत्यकथन तिनें येथें केलें आहे. तिचें हें आत्मकथन वाचणें म्हणजे

आपल्या राष्ट्रीय चळवळीच्या एका चैतन्यमय अंगाचें ज्ञान करून घेणें होय—१९३० नंतरच्या काळांत हे दहशतवादी स्थानबद्ध व बंदी बहुसंख्येनें कम्युनिस्ट पक्षाकडे आले हें कसें घडलें हें समजून घेणें होय. आमच्या पक्षाकडे येणें हें त्यांच्या दृष्टीनें एका अर्थीं सुकर आणि एका अर्थीं दुष्कर होतें. सुकर अशासाठीं कीं त्यांनीं आजपर्यंत जीं क्रांतिकारक स्वप्नें रंगविलीं होतीं त्यांच्यासाठीं चाललेला शास्त्रशुद्ध व यशस्वी लढा त्यांना आमच्या पक्षाच्या धोरणांत आणि कार्यांत आढळला. दुष्कर अशासाठीं कीं त्यांना आपल्या भ्रामक समजुती दूर कराव्या लागल्या आणि आपलें चुकलें कुठें आणि देशाचा जो संग्राम लढविण्याच्या आपण बाल्यावस्थेंतच शपथा घेतल्या होत्या तो संग्राम चालू ठेवतांना आपल्याला कुठें सुधारणा करावयास पाहिजेत हें त्यांचें त्यांनाच समजून घ्यावें लागलें. दहशतवाद ही त्यांच्या आयुष्याची बाल्यावस्था आणि कम्युनिझम हीं पूर्णावस्था कशी आहे हें या आठवणींतून स्पष्ट होत आहे. चितगांवच्या शस्त्रागार हल्ला कटांतील तुरुंगांत असलेले आणि तुरुंगाबाहेरील त्यांचे अनुयायी हे बहुतेक सारे आज आमच्या पक्षाकडे आले आहेत. चितगांवचे लोक मोठ्या अभिमानानें ज्याला "सूर्यसेनी बाणा" आणि "चितगांवची परंपरा" म्हणतात तिचा खराखुरा वारसदार आमचा पक्षच आहे.

—पी. सी. जोशी

नगर वाचनालय
ता. ........
सातारा.

# प्रस्तावना

कुप्रसिद्ध बंगाल वटहुकुमाखालीं स्थानबद्ध असलेले सूर्य सेन, अनंत सिंग, गणेश घोष व इतर चितगांवचे क्रांतिकारक पुढारी १९२८ सालीं मुक्त होऊन चितगांवला परत आले.

सुटका होतांच त्यांच्या मनांत पहिला विचार आला तो हा कीं आपला देश स्वतंत्र करण्याकरितां काय करायला हवें आणि कोणता मार्ग अवलंबावयाला हवा.

दहशतवाद्यांची परंपरागत कल्पना अशी कीं कोणातरी बाहेरील बलाढ्य राष्ट्राच्या मदतीवांचून स्वातंत्र्य मिळवितां येणार नाहीं. त्यांना हें कळून चुकलें होतें कीं चार दोन सरकारी अधिकारी, कांहीं युरोपियन व पोलीस ऑफिसर्स यांचे खून करून कांहीं ब्रिटिश सरकार उखडलें जात नाहीं. सहाजिकच नैराश्य भावनेनें या क्रांतिकारकांना भारून टाकलें. चितगांवच्या क्रांतिकारकांना ही निष्क्रियता काढून टाकावयाची होती. बाहेरच्या मदतीवांचूनहि सरकारशीं सामना देणें अगदीं सहज शक्य आहे हें दाखवून त्यांच्यामध्यें त्यांना आत्मविश्वास निर्माण करावयाचा होता. हें साध्य करण्यासाठीं शस्त्रांच्या सहाय्यानें सामना द्यायचा, सरकारच्या शस्त्रागारावर पूर्वतयारीनें मोठ्या प्रमाणावर हल्ला करायचा, शस्त्रें हस्तगत करायचीं, दळणवळण बंद पाडायचें, हिंदुस्तानच्या इतर भागांतून सरकारला कुमक मिळणार नाहीं अशी व्यवस्था करायची आणि एकट्यादुकट्या युरोपियनावर हल्ला न करतां ज्या ठिकाणीं ते जमावानें मिळतील अशा क्लबांवर हल्ले करून सामना द्यायचा असा त्यांचा बेत होता. एक आठवडाभर तरी चितगांव स्वतंत्र करूं; पुढें जर सरकारनें लष्कर आणलें तर शरण न जातां लढतां लढतां मरायचें; अशा रीतीनें आपली त्रोटक पण ऐतिहासिक जीवनकथा साऱ्या देशाला धवळून टाकील आणि मायभूमीसाठीं लढण्याची स्फूर्ति नव्या पिढीला मिळेल असें त्यांना वाटत होतें.

*　　　*　　　*

१९३० मधील एप्रिलची १८ वी तारीख. रात्रीं दहा वाजतां एकाच वेळीं तार ऑफिस, शस्त्रागार, आणि पोलिस लाईन्स यांवर हल्ला झाला. नानगलकोट व धुम येथील रेल्वेलाईन्स निखळल्या. त्याच वेळीं साऱ्या गांवांत हस्तपत्रिका

वांटण्यांत आल्या. त्यांत लिहिलें होतें कीं गांधीजींनीं कायदेभंग करण्यास सांगितलें आहे त्याप्रमाणें राजद्रोहाचा कायदा आपण मोडत आहोंत. दुसरींहि हस्तपत्रकें वांटण्यांत आलीं त्यांत " अध्यक्ष, इंडियन रिपब्लिकन आर्मी चितगांव शाखा " यांच्या सहीखालीं त्या हल्ल्याचा उद्देश जाहीर केला होता. या दहशतवादी पक्षानें इंडियन रिपब्लिकन आर्मी, चितगांव शाखा असें नांव धारण केलें होतें. मास्तरदा ( सूर्य सेन ) हे तिचे अध्यक्ष होते.

शस्त्रागाराच्या ठिकाणी मेजर फेरोल मारला गेला आणि पोलिसांच्या चाळीमध्यें दोन पहारेकरी प्राणाला मुकले. क्रांतिकारकांनीं शस्त्रागार व पोलिस चाळी ताब्यांत घेतल्या. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट त्या जागीं आला तेव्हां त्याच्यावर गोळी झडली पण नेम चुकला. तो बंदरावर धांवला. तेथून त्यांनें बिनतारी संदेश पाठविले आणि बंदरावरच्या शस्त्रागारांत होतीं तीं शस्त्रें जमवून क्रांतिकारकांवर चालून जाण्यासाठीं सैन्य पाठविलें. शस्त्रागाराच्या समोर एक टेकडी होती. त्या टेकडीवर पाण्याची टाकी होती. त्या टेकडी वरून सरकारी प्रतिहल्ला सुरू झाला. क्रांतिकारकांची जागा अगदीं गैरसोयींची होती तरी त्यांनीं सरकारी सैन्य मागें हटविलें.

परंतु त्या टेकडीवर फार वेळ राहणें धोक्याचें होतें आणि म्हणून तिथून निघून जातांना त्यांनीं शक्य होतीं तेवढीं शस्त्रें जमविलीं. जेवढीं नेतां येत होतीं तेवढीं बरोबर घेतलीं आणि उरलेल्यांवर पेट्रोल ओतून साऱ्या शस्त्रागाराला त्यांनीं आग लावली.

लढतांना ज्यांना कांहीं दुखापत झाली नव्हती त्यांना आतां अपघात झाला. शस्त्रागारावर पेट्रोल ओतीत असतांना हिमांशु सेन हा आगींत सांपडला आणि भाजून मेला. अनंतदा, गणेशदा आणि दुसरे दोघे यांनीं हिमांशूला उचलून गांवांत नेलें. तिथें एका गुप्त जागीं त्याला ठेवलें पण तीन दिवसांनीं त्याचें प्राणोत्क्रमण झालें. गांवावर झपाट्याचा हल्ला करण्याच्या तयारीसाठीं बाकीचे टेकडीकडे वळले. अनंतदा आणि इतर जे गांवांत गेले त्यांची आणि या लोकांची या वेळीं पांगापांग झाली.

जलालाबाद टेकडीची लढाई ! २२ एप्रिल रोजीं ४-३० वाजतां शस्त्रसिद्ध अशा ब्रिटिश लष्कराशीं क्रांतिकारकांची चकमक झडली. क्रांतिकारक हे जलालाबाद टेकडीवर होते आणि ब्रिटिश लष्कर समोरच्या टेकडीवर होतें. काळोख पडेपर्यंत समोरासमोर जोराची लढाई झाली. शेवटीं ब्रिटिश लष्कराला माघार घ्यावी लागली.

दोन्ही पक्षांकडील बरींच माणसें कामास आलीं. जलालाबाद टेकडी ही चितगांवच्या क्रांतिकारक तरुणांच्या दुर्दम्य प्रतिकाराची अमर कहाणी होऊन राहिली.

ब्रिटिश मशीन गन्सच्या पहिल्याच फैरींत ११ वीर पडले. चौघांना गंभीर स्वरूपाच्या जखमा झाल्या. या लढाईंत अंबिका चक्रवर्ती ठार झाले असें सरकारी पत्रकांत जाहीर करण्यांत आलें पण खरोखर ते मेले नव्हते. त्यांना जखमा झाल्या होत्या. तरीहि ते आणखी दोघां इतर जखमी सहकाऱ्यांबरोबर निसटले. अर्धेदु दस्तीदार हेच काय ते जखमी अवस्थेंत सरकारच्या हातीं लागले. त्यांचा पोलिसांनीं अमानुष छळ केला. पोलिसच्या ताब्यांत असतांनाच कांही दिवसांनीं ते कालवश झाले.

सरकारच्या पक्षाकडील किती माणसें गारद झालीं याचा निश्चित आंकडा मिळाला नाहीं. असें म्हणतात कीं १५० सोल्जर ठार झाले. टिपेरा जिल्ह्यांतील अगर-तोळ्याहून मुद्दाम आणलेल्या लष्करी तुकडीच्या कॅप्टननें एका रेल्वे अधिकाऱ्या-जवळ कबूल केलें कीं आपल्याकडील बरींच माणसें गमावलीं. दोन तीन महिन्यांनीं ज्या वेळीं गणेश घोष व इतर कांहीं जणांना अटक झाली त्यावेळीं सर चार्ल्स टेगार्ट यांनीं त्यांना खूप मारहाण केली व त्यांना शिव्या देतांना सरसाहेब चिडून म्हणाले " तुम्ही–तुम्ही आमचीं ६४ माणसें मारलीं. "

जलालाबादवर सरकारनें अचानक हल्ला केल्यामुळें शहरावर हल्ला करण्याचा बेत क्रांतिकारकांना सोडून द्यावा लागला. लढाईच्या दुसऱ्या दिवशीं नवीन निर्णय घेण्यांत आला. " आपलें काम अद्यापि संपलेलें नाहीं, सरकारशीं अद्यापि सामना द्यावयाचा आहे, स्वातंत्र्याची लढाई यापुढें गनिमी काव्यानें लढावयाची आहे. भूमिगत जीवनांतील आपत्तींना आणि गनिमी युद्धांतील हजारों प्राणघातक अडचणींना तोंड देण्याची ज्यांची तयारी असेल त्यांनींच तेवढें चळवळींत राहावें. इतरांनीं हवें तर घरीं जावें." शिवाय ज्यांच्याविषयीं पोलिसांना अद्यापि संशय आलेला नव्हता अशा कांहींना चळवळीच्या हिताच्या दृष्टीनें मुद्दाम घरीं पाठ-विण्यांत आलें.

दोन दिवसांनंतर म्हणजे २४ एप्रिल रोजीं गांवांतील सदर घाटा वरील एका ओसाड घरांत पोलिसांना एक तरुण आढळला. त्यांना त्याचा संशय आला. तरुणानें दुसऱ्या मजल्यावरून एकदम उडी घेतली आणि रस्त्याखालील मोरीचा आसरा घेतला. त्यानें गोळ्या झाडल्या पण शेवटीं त्याच्या जवळच्या गोळ्या संपल्या. आणि शेवटीं दुसऱ्या दिशेनें येणाऱ्या लष्करानें त्याच्यावर गोळी झाडून त्याला खालीं पाडलें. त्या तरुणाचें नांव अमरेन्द्र नंदी असें होतें. शस्त्रागाराच्या हल्ल्यानंतर

टेकडीवर जातांना मास्तरदानें त्याला अनंतदा व इतर यांच्याशीं दळणवळण ठेवण्यासाठीं गांवांत पाठविलें होतें. आपलें काम आटोपून परत येतांना त्याला जलालाबादचा प्रसंग समजला आणि म्हणून तो खेड्याकडे निघाला. पण आपल्या सहकाऱ्यांच्या खुनाचा बदला घेण्याची शपथ घेऊन तो पुन्हा गांवाकडे वळला. वाटेंत त्यानें आपले स्वतःचे प्राण वेंचले.

अनंतदाचा गट मास्तरदाशीं आणि इतर मंडळीशीं दळणवळण जोडूं शकला नाहीं. जलालाबादच्या लढाईची वार्ता कानीं येतांच त्यांनीं गांव सोडला. त्यांच्यापैकीं चौघांना पोलिसांनीं फेनी स्टेशनावर संशयावरून पकडलें. परंतु एका पहारेकऱ्यावर गोळी झाडून ते सर्व निसटले. फेनीची चकमक या नांवानें हा प्रसंग प्रसिद्ध आहे.

उरलेल्या लोकांना घेऊन मास्तरदा खेड्यांत गेले. एक क्षणहि न दवडतां आपलें अंगीकृत कार्य पुढें चालविण्याची, सतत हल्ले करून सरकारला सतावून सोडायची त्यांना उत्कंठा लागली होती.

ता ६ मे रोजीं देवीप्रसाद गुप्ता, मनोरंजन सेन, रजत सेन, स्वदेश रॉय, फणींद्र नंदी आणि सुबोध चौधरी हे नदीतीरावरील युरोपियनांच्या वस्तीवर चालून जाण्यासाठीं निघाले. परंतु हा बेत त्यांना साधला नाहीं. परत येतांना वाटेंत कलारपोल जवळ एका हत्यारबंद पोलीस पार्टीशीं त्यांची अचानक गांठ पडली. या चकमकींत चौघे मारले गेले. सुबोध आणि फणी जखमी होऊन पकडले गेले. पोलिसांनीं मदतीसाठीं जे गुंड आणले होते त्यांच्या पैकीं कित्येक जण ठार झाले, कित्येक जखमी झाले.

कांहीं दिवसांनीं या तरुणांपैकीं कांहींना पकडण्यांत आलें. कित्येकांना अगदीं घरांतून बाहेर काढून पकडलें. साऱ्या चितगांववर लष्करी पाहरा सुरू झाला. कर्फ्यू ऑर्डर सर्वत्र जारी करण्यांत आली. ज्यांना पकडलें त्यांमध्यें कलारपोल येथें ठार झालेल्या रजतचे वडील होते; तसेच देवीप्रसादचे वडील होते व अनंतसिंहचेहि वडील होते. त्यांच्या मुलांवर व इतर क्रांतिकारकांवर यत्किंचितहि दयामाया दाखवली जाणार नाहीं अशी धमकी पोलिसांनीं त्यांना दिली व क्रांतिकारकांच्या विरुद्ध माफीचे साक्षीदार उभे करण्याचे आटोकाट प्रयत्न केले. पण ऐनवेळीं अनंतसिंह हे आपण होऊन पोलिसांच्या स्वाधीन झाले आणि बंदीजनांचें मनोधैर्य खचविण्याचे सरकारचे प्रयत्न फसले.

१९३० मध्यें अनंतसिंह व इतर पुढारी मिळून एकंदर ३० जणांवर खटले भरले. त्यांचा खटला चालविण्यासाठीं एक खास न्यायमंडळ नेमण्यांत

आलें. राजाविरुद्ध बंड केल्याचा आरोप यांच्यावर ठेवण्यांत आला. त्यांच्या या दहशतवादी कृत्यांना शस्त्रागारावरील हल्ल्यापासून सुरवात झाली म्हणून या खटल्याला चितगांव शस्त्रागारावरील हल्ल्याचा खटला असें संबोधण्यांत आलें.

१ सेप्टेंबर १९३० रोजीं मध्यरात्रीच्या सुमारास हुगळी जिल्ह्यांतील चंद्रनगर मधील एका घराला पोलिसांनीं गराडा दिला. त्या घरांत गणेश घोष, आनंद गुप्ता आणि लोकनाथ बाल यांना अटक झाली. पोलिस त्यांना चितगांवला घेऊन आले. या चंद्रनगरच्या चकमकींत जिबन घोशाल याला पोलिसांची गोळी लागून तो ठार झाला. या धरपकडीनंतर शस्त्रागारावरील हल्ल्याचा खटला नव्यानें सुरू करण्यांत आला.

दोन महिन्यांनीं आजारी असतांनाच अंबिका चक्रवर्ती यांना पकडण्यांत आलें. त्यांच्यावरचा खटला तहकूब करण्यांत आला आणि त्यांना सुरीच्या तुरुंगांत स्थानबद्ध करण्यांत आलें.

रोज नवीन नवीन धरपकडी होत होत्या. माहिती काढण्यासाठीं पोलिसांचे अनन्वित जुल्म चालू होते. क्रांतिकारकांना कळून चुकलें कीं निष्क्रिय राहण्यांत कांहीं अर्थ नाहीं आणि पोलिसांच्या हातीं पडण्यांतहि शहाणपण नाहीं. मास्तर-दानें तुरुंगांतील साथीदारांशीं दळणवळण सुरू केले आणि नवीन बेत तयार होऊं लागले.

३० डिसेंबर रोजी रामकृष्ण विश्वास आणि कालिपद चक्रवर्ती यांनीं चांद-पूर स्टेशनवर इन्स्पेक्टर तारिणी मुकर्जी यास इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिस मि. क्रेग समजून ठार मारलें. कलकत्त्याला त्यांचा खटला चालला. रामकृष्ण विश्वास फांशी गेला आणि कालिपद यास जन्मठेप मिळाली.

१९३१ च्या जून मध्यें चितगांवमध्यें डायनामाइटचा कट उघडकीस आला. शस्त्रें, विजेच्या तारा, स्फोटक द्रव्यें, खंजीर इत्यादि वस्तु तुरुंगांत व तुरुंगाच्या बाहेर सांपडल्या. शिवाय कोर्टाच्या आवारांत आणि शहरांतील इतर प्रमुख ठिकाणीं डायनामाइट पुरून ठेवल्याचें उघडकीस आलें.

हा मोठा कट उघडकीस आल्यावर लोकांचेंच नव्हे तर अधिकाऱ्यांचेंहि धाबें दणाणलें. शस्त्रागारावरील हल्ल्याच्या खटल्यांतील ज्या पांच जणांची जामिनावर सुटका केली होती त्यांचे जामीन तावडतोब रद्द करण्यांत आले आणि त्या आरोपींपैकीं दोघांना डायनामाइट कटाच्या खटल्यांत गोवण्यासाठीं त्यांना या खटल्यांत निर्दोषी ठरविण्यांत आलें. आणखी कांहीं धरपकड झाली. डायनामाइट कटाच्या खटल्यांत एकंदर आठ जणांवर आरोप ठेवण्यांत आला. हा खटला सुद्धां

खास न्याय मंडळापुढें सुरू झाला. अनंतदा व त्याचे साथी यांच्या बरोबर समेट करण्याचा सरकारी अधिकाऱ्यांनीं यत्न केला. समेटाची अट ही कीं सर्व आरोपींनीं गुन्हा कबूल करावा म्हणजे कोणालाहि जबर शिक्षा होणार नाहीं. लोकांना धास्ती वाटली कीं या लोकांना जन्मठेपीच्या शिक्षा होणार. ज्या वेळीं कोर्टाचा निवाडा झाला त्या वेळीं असें आढळून आलें कीं तिघांना तीन वर्षें आणि उरलेल्यांपैकीं कांहींना सहा आणि कांहींना आठ महिने अशा शिक्षा झाल्या. अनंतसिंह आणि गणेश घोष यांच्या जवळ सरकारला स्वतः समेटाचीं बोलणीं करावीं लागलीं त्यामुळें लोकांमध्यें अनंतसिंह आणि गणेश घोष यांच्या सामर्थ्या-बद्दल मोठें कुतुहल निर्माण झालें.

शस्त्रागारावरील हल्ल्याच्या वेळेपासून पोलीस इन्स्पेक्टर असानुल्ला यानें केलेल्या अविचारी दडपशाहीमुळें लोक त्याच्यावर दांत ओंठ खात होते. त्याची खासगी वर्तणूकहि वाईट होती असा प्रवाद होता. लोक म्हणत " ' स्वदेशी '-वाल्यांनीं एवढं केलं, या हरामखोराची खोड नाहीं त्यांना मोडतां येत ? "

१९३१ च्या ऑगस्टमध्यें फूटबॉलच्या क्रीडांगणावर चौदा वर्षांच्या हरिपद भट्टाचार्यानें असानुल्लावर गोळ्यांचा भडिमार केला आणि जागच्या जागीं त्याला निजवला. त्याच जागीं हरिपदला पकडण्यांत आलें. हरिपदवर गुन्हा शाबीत होणारच या विश्वासांत सरकारनें त्याचा खटला ज्यूरी समोर चालविण्यास संमति दिली. रायबहादुर उपेन रॉय चौधरी यांच्या सारखा नांव-लौकिकाचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार सरकारतर्फे आला होता तरी ज्यूरीनें आरोपी निर्दोषी असा निर्णय दिला. पण सरकारनें खटला वरिष्ठ कोर्टाकडे पाठविला आणि ज्यूरीचा निकाल फिरवून घेतला व हरिपदला जन्मठेपीची शिक्षा झाली.

१९३२ च्या १ मार्चला शस्त्रागारावरील हल्ल्याच्या खटल्यांतील निवाडा जाहीर झाला. आरोपींपैकीं १६ जणांना पूर्णपणें निर्दोषी ठरविलें पण बंगाल वट हुकुमाखालीं त्यांना तुरुंगांत डांबण्यांत आलें. अनंतदा व दुसरे बाराजण यांस जन्मठेप, अनंतसिंहाचे बंधु नंदुलालसिंह यांना तीन वर्षें व अनिल बंधु दास यांना ५ वर्षें अशा शिक्षा देण्यांत आल्या. शेवटच्या आरोपपत्रकांच्या वेळीं अनंतसिंह, रजत आणि देवी यांच्या वडिलांच्या सुटका झाल्या.

१९३० पूर्वींच मुलींना या पक्षांत सामील करून घेतलें होतें. शस्त्रागारावरील हल्ल्याच्या वेळेपासून मुली मुलांबरोबर क्रांतिकारक चळवळीमध्यें उत्साहानें भाग घेऊं लागल्या. मास्तरदानें मनाशीं ठरविलें कीं अशाच रीतीनें क्रांतिकारक चळवळीचें एक नवीन आणि प्रेरक अंग आपण जनतेला दाखवूं शकूं.

१९३२ मध्यें धालघाट खेड्यांतील एका जागीं पोलीस आणि दहशतवादी यांच्यांत दुसरी एक चकमक झडली. या चकमकींत निर्मल सेन आणि अपूर्व सेन मारले गेले. सरकार पक्षाकडील कॅप्टन कॅमेरॉन ठार झाला. त्या ठिकाणीं मास्तरदा व प्रीति वद्दादार हेहि होते पण त्यांनीं पोलिसांच्या हातावर तुरी दिल्या. ज्या बाईनें त्यांना आश्रय दिला तिला, तिच्या मुलांना आणि दुसऱ्या दोघांना, दहशतवाद्यांना आश्रय दिला या गुन्ह्याबद्दल प्रत्येकीं चार वर्षांची शिक्षा झाली.

धालघाट प्रकरणा नंतर प्रीतीला भूमिगत व्हावें लागलें. खरें पाहतां प्रीति मास्तरदाला भेटण्यासाठीं धालघाटला आली होती.

२४ सप्टेंबर १९३२ रोजीं पहारताली रेल्वे क्लबवर दुसरा एक हल्ला झाला. प्रीति ही त्यांत पुढारी होती. सरकारी पत्रकाप्रमाणें १३ जणांना जबर जखमा झाल्या व मिसेस सुलिव्हान नांवाची एक स्त्री मरण पावली. परत येतांना प्रीतीनें स्वतः पोटॅशियम सायनाईड घेऊन आत्महत्या केली.

तिच्या खिशांत तिनें स्वतः लिहिलेला एक जबाब आणि त्याच दिवशीं काढलेलें एक हस्तपत्रक मिळालें. त्यांत म्हटलें होतें कीं शस्त्रागारावरील हल्ल्याच्या वेळेपासून जें जें काहीं घडलें व पुढें जें जें कांहीं घडणार आहे ते सगळे सरकारविरुद्ध दहशतवाद्यांनीं १८ एप्रिल १९३० रोजीं पुकारलेल्या युद्धांतीलच प्रसंग आहेत. आपण जोंवर गुलामगिरींत आहों तोंवर या युद्धांत खंड पडणार नाहीं. पहारताली हल्ल्यासंबंधांत ८४ लोकांला पकडलें पण पुराव्याच्या अभावीं सर्वांना सोडून द्यावें लागलें.

नंतर अंबिका चक्रवर्ती व इतर दोघे यांवरील शस्त्रागारावरील हल्ल्याचा पुरवणी खटला चालू झाला. दोन महिने खटला चालल्यावर अंबिकादाला फांशीची शिक्षा झाली. बाकीच्या दोघांपैकीं एकाला जन्मठेप मिळाली आणि दुसऱ्याला तुरुंगांत स्थानबद्ध करून ठेवण्यांत आलें. पुढें वरिष्ठ कोर्टानें अंबिकादाची फांशी-ची शिक्षा सौम्य केली आणि त्यांना जन्मठेप दिली.

यावेळीं मीहि भूमिगत झाल्यें आणि मास्तरदा व त्यांचे साथी यांच्या बरोबर फिरूं लागल्यें. पोलिसांची पाळत अधिक जागरूक व कडक झाली. प्रत्येक खेड्यांत लष्कर ठेवण्यांत आलें आणि त्यांच्यांशीं चकमक उडण्याची भीति दर क्षणाला वाढूं लागली. १९३३ च्या फेब्रुवारींत गैराला खेड्यांत आमचा पोलिसशीं आणखी सामना झाला. आम्ही आमच्या नियोजित ठिकाणीं जात असतां पोलिसांनीं आम्हांला गराडा घातला. दोन तास सामना दिल्यावर मास्तरदा व त्या खेड्यांतला

एक मुलगा व्रजेन सेन हे पकडले गेले. व्रजेनला पुढें ४ वर्षांची सजा झाली. आम्ही बाकीचे निसटलों. शांति चक्रवर्ती व आणखी एक साथी यांना मात्र जबर जखमा झाल्या.

मेच्या १९ तारखेला अन्वारा पोलिस ठाण्याच्या कक्षेतील गैराला या खेड्यांत एक घरांत छपलों असतांनाच सकाळच्या प्रहरीं पोलिसांनीं आम्हाला वेढा दिला. कांहीं वेळ उभयपक्षीं गोळागोळी झाली. पूर्ण तालुकदार हे त्या घराचे मालक. पोलिसांची गोळी लागून ते जागच्या जागीं ठार झाले. त्यांचा धाकटा भाऊ निसी तालुकदार याच्या छातींतून आरपार गोळी जातांना मी प्रत्यक्ष पाहिली. त्यांच्याबरोबरच आमचा दुसरा एक साथी १६ वर्षांचा मनोरंजन दास कामास आला. तारकेश्वर दस्तीदार व मी याच जागीं बंदिस्त झालों. ( या प्रकरणीं सुद्धां घराच्या मालकिणीला चार वर्षांची शिक्षा झाली ).

१९३३ जून मध्यें शस्त्रागारावरील हल्ल्याचा दुसरा पुरवणीखटला चालू झाला. मास्तरदा, तारकेश्वर दस्तीदार व मी असे आम्ही तीन आरोपी होतों. त्यांना फाशीची शिक्षा झाली आणि मला जन्मठेप मिळाली.

यानंतर एका मागून एक सारेच पकडले गेले. शांति चक्रवर्ती, मणी दत्त आणि कालिकिंकर दे यांनीं आजपर्यंत पक्षाचा कारभार सांभाळला होता पण शेवटीं तेहि याच सुमारास पोलिसांच्या हातीं सांपडले.

मग जे अगदीं तरुण कार्यकर्ते होते ते वैतागले. त्यांनीं मास्तरदाच्या धरपकडीचा सूड घेतला. मास्तरदा कुठें लपून आहे याची माहिती गैराला मधील नेत्र सेन यानें पोलिसांना दिली होती त्यालाच या तरुणांनीं २ जानेवारीला गारद केला. त्याच दिवशीं हिमांशु चक्रवर्ती, नित्य सेन, हरेन चक्रवर्ती आणि कृष्ण चौधरी यांनीं क्रिकेटच्या क्रीडांगणावर बॉंब टाकले आणि गोळ्या झाडल्या. त्यांच्यापैकीं कोणीच वयानें सोळा सतरापेक्षां जास्त नव्हतें. हिमांशु आणि नित्य जागच्या जागीं प्राणाला मुकले. हरेन व कृष्ण पकडले गेले. खटला झाला आणि तेहि फांशी गेले.

यानंतर दहा दिवसांनीं म्हणजे १२ जानेवारीला मध्यरात्रीच्या वेळीं सरकारनें सूर्य सेन आणि तारकेश्वर दस्तीदार यांना फांसावर चढविलें. सारा गांव आणि तुरुंग त्यावेळीं लष्कराच्या ताब्यांत होता.

*   *   *   *

या अजिंक्य वीरांना निराशा हा शब्दच ठाऊक नव्हता. सरकारनें दडपशाही करून त्यांचा बीमोड करण्याचा यत्न केला परंतु लोकांच्या हृदयांत त्यांचें स्थान अढळ आहे. तुरुंगाच्या एकांतवासांत नव्या विचारांचा अभ्यास करण्यास त्यांना अवसर मिळाला.

आणि म्हणून ते साम्यवादाकडे आले. साम्यवादी चळवळीमध्यें त्यांना आपल्याच चळवळींतील एकजिनसीपणा, शिस्त आणि निःस्वार्थीपणा आढळला. वैयक्तिक शौर्य, त्याग आणि अढळ श्रद्धा यांच्या सहाय्यानें देशाच्या स्वातंत्र्याची स्वप्नें रंगविणाऱ्या मूठभर स्त्रीपुरुषांच्या जगांतून ते निघाले आणि ज्यामध्यें साऱ्या जनतेला चेतवून तिच्यामध्यें स्वसामर्थ्य आणि स्वत्वाची जाणीव करून द्यावयाची असते अशा साम्यवादानें दाखविलेल्या नव्या आणि विशाल प्रांतात त्यांनीं पाऊल टाकलें.

या स्थित्यंतरांत त्यांना आपल्या क्रांतिकारक गतजीवनाचें सातत्यहि दिसत होतें आणि एका दृष्टीनें खंड पडल्यासारखेंहि वाटत होतें. पूर्वी प्रमाणेंच स्वातंत्र्याचें ध्येय त्यांना नव्या मार्गावर बोलावीत होतें. पण चार दोन शूर वीरांचा गट म्हणून वावरण्याऐवजीं ते आतां जनतेच्या जगांत वावरत आहेत. आपण लोकांचे पुढारी होण्याऐवजीं आपण जी चळवळ चालविली त्या चळवळींतूनच अखिल जनतेची संघटना करण्याचा मार्ग मिळाला पाहिजे हें त्यांना पटलें. जिवाच्या जीवाप्रमाणें असलेलें आपलें ध्येय आणि आत्मदान करण्याची तयारी यामुळें स्वाभाविकच ते साम्यवादाकडे आले.

चितगांवचा गट बंगालमधील दहशतवाद्यांचा सर्वात प्रभावी आणि यशस्वी गट म्हणून ओळखला जातो. त्यांना आणि तुरुंगांत अद्यापिहि त्यांचे जे साथी आहेत त्यांना—नव्हें आम्हीं जे मोकळे आहों आणि ज्यांचा जनतेवरील विश्वास कायमच आहे त्या सर्वांना—जगांतील सर्व क्रांतिवाद्यांना—एकच मार्ग खुला आहे आणि तो म्हणजे साम्यवाद.

---

नगर वाचनालय ता. ........ सातारा.

# सूर्य सेन [ ‘मास्तरदा’ ]

दहशतवादी ( टेररिस्ट ) पक्षाशीं १९२९ मध्यें माझा प्रथम संबंध आला. त्यावेळीं मी ‘मास्तरदा’चं नांव सुद्धां ऐकलेलं नव्हतं. चितगांव शस्त्रागारावरील हल्ल्याच्या थोडे दिवस पूर्वीच मला आमच्या पक्षाच्या एका सभासदानें सांगितलं होतं; “आतां तूं चितगांवला जाशील त्यावेळीं मी तुला आमच्या पुढाऱ्याकडे —सूर्य सेन यांच्याकडे नेईन.”

पण तसा योग आलाच नाहीं. मी चितगांवला जाण्यापूर्वीच १९३० च्या एप्रिल महिन्यांत शस्त्रागारावर हल्ला चढविण्यांत आला. सूर्य सेनच्या नेतृत्वाखालीं झालेल्या या धाडसी हल्ल्याबद्दल सगळ्या वर्तमानपत्रांतून चर्चा चालू होती.

त्यानंतर तीन आठवड्यांनीं आमची उन्हाळ्याची रजा सुरू झाली व मी चितगांवला गेल्यें. अधिकाऱ्यांमध्यें भयंकर खळबळ माजलेली होती. कर्फ्यू ऑर्डरची अंमलबजावणी अत्यंत कडकपणें करण्यांत येत होती. ठिकठिकाणीं पोलिसांचे पहारे नजरेस पडत होते. झडत्यांचें सत्र सुरू होतें. गोऱ्या बायकांचीच काय पण पुरुषांची सुद्धां अंधार पडल्यानंतर गांवांत राहण्याची छाती नव्हती. सबंध रात्र ते बोटींत बसून काढत! अधिकारी वर्ग हादरून गेला होता यांत यत्किंचित सुद्धां संशय नव्हता.

‘मास्तरदा’—सूर्य सेन-विषयीं अनेक अद्‌भुतरम्य कथा प्रचलित होत्या. एकदां ते म्हाताऱ्या माळ्याचा वेश घेऊन पोलिसांच्या गराड्यांतून निसटले; दुसऱ्या एका वेळीं ते संन्याशाचा वेश घेऊन गांवकऱ्यांशीं बोलत असतांना आढळले; एकदां तर ते एका पोलिस अधिकाऱ्याच्या संगतींतच अनेक गांवें हिंडले व तरीहि त्या अधिकाऱ्याला आपण कोणाशीं बोलत आहोंत याची दाद नव्हती! असल्या एक ना दोन, असंख्य गोष्टी मास्तरदाविषयीं ऐकलेल्या होत्या.

खेडेगांवांतले अशिक्षित भोळे लोक म्हणत, मास्तरदांना ‘जादूमंतर’ अवगत आहेत, त्यांना कुणीहि पकडूं शकणार नाहीं; त्यांच्या मनांत येईल तेव्हां ते अंतर्धान पावूं शकतात! ‘मास्तरदा’ म्हणजे साधे माणूस नव्हत याविषयीं कुणाचंच दुमत नव्हतं. आणि खरंच आहे, एक साधासुधा माणूस सर्वशक्तिमान

सरकारला एकसारखं झुलवत ठेवूं शकतो, हें त्या भोळ्याभाबड्या लोकांना पटणं अशक्य होतं.

सुशिक्षित लोकांच्याहि भावना अशाच होत्या. फक्त ते त्या निराळ्या शब्दांत व्यक्त करीत, एवढाच काय तो फरक. ते म्हणतः "कमाल आहे अं मास्तरदाची. पुढारी असावा तर असा. प्लासीच्या लढाईनंतर असा वाघासारखा लढवय्या वीर झाला नव्हता आपल्या देशांत." मास्तरदाविषयीं जेवढी म्हणून माहिती ऐकलेली असेल तेवढी सर्व ते एकमेकांच्या कानांत सांगत. एकाद्यानें मास्तरदाला कुठें पाहिलेलं असेल तर विचारूंच नका. आपण कुठें त्यांना पाहिलं, त्यावेळीं ते कसे दिसले, काय करीत होते, काय बोलले, वगैरे गोष्टी ते खुलवून सांगत. कांहीं लोक तर आपला बडेजाव मिरविण्यासाठीं मास्तरदाची आपली ओळख असल्याचं खोटंच सांगून त्यांच्या भेटीची रसभरित वर्णनं करीत.

मास्तरदांची व त्यांच्या सहकाऱ्यांची माहिती काढण्यासाठीं पोलिसांनीं अनेकांचा अनन्वित छळ केला, पण व्यर्थ. त्यांना पकडून देण्यासाठीं हजारों रुपयांचीं मोठालीं बक्षिसं जाहिर करण्यांत आलीं, तेव्हां लोक तुच्छतेनें हंसून म्हणाले: "पैशाच्या लोभानं सूर्य सेनला पकडून देणारा हरीचा लाल अजून जन्माला यायचा आहे!" कित्येकांना तर त्यांचा मास्तरदांशीं अप्रत्यक्ष सुद्धां संबंध नसतांना देखील पोलिसांचा छळ सहन करावा लागला. पण त्याबद्दल सूर्य सेनला दोष देण्याचं त्यांनीं कधीं मनांतहि आणलं नाहीं. उलट लोक पोलिसांचीच चेष्टा करीत, व पोलिसतपास चालू असतांना ते मनसुराद मौज लुटत. एकदां सूर्य सेन पाटिया गांवांत असल्याची पोलिसांना खबर मिळाली. ताबडतोब बाहेरून तीनचारशें सशस्त्र पोलिसांची तुकडी बोलविण्यांत आली, व त्या तुकडीनें रात्रीं सूर्य सेनच्या घराला गराडा घातला. सकाळ होतांच घराचा मालक बाहेर येतांच पोलिसांनीं त्याला विचारलें: "तुम्ही कोण?" त्या गृहस्थानें उत्तर दिलें: "सूर्य सेन." अधिकाऱ्यांचे डोळे विस्फारित झाले. त्यांनीं विचारलें:

"सूर्यसेन? कोणते सूर्य सेन?" तो गृहस्थ उत्तरला: "मास्तर सूर्य सेन."

पोलिस-अधिकाऱ्यांचा आनंद गगनांत मावेनासा झाला. एवढी मोठी शिकार एवढ्या सहजासहजीं हातीं लागणें म्हणजे थट्टा नव्हती. ताबडतोब चितगांव सी. आय. डी. खात्याला बातमी कळविण्यांत आली. तेथून एक

माणूस सूर्य सेनचा फोटो घेऊन आला. तो फोटो पाहतांच त्या अधिकाऱ्यांचेच चेहरे फोटो काढण्यालायक झाले. त्यांनीं पकडलेला सूर्य सेन हा क्रांतिकारकांचा मेरुमणि सूर्य सेन नव्हता. तो पाटिया गांवचा हेडमास्तर सूर्य सेन होता.

पोलिसांची ही फजीती पाहून गांवचे लोक पोट धरधरून हंसले. ते म्हणाले: "सूर्य सेनला पकडायला निघण्यापूर्वी थोडी अक्कल उसनी आणा म्हणावं पोलिसांना."

★

शस्त्रागारावरील हल्ल्याला एक वर्षाहून अधिक काळ लोटला होता. १९३१ चा जून महिना होता तो. मास्तरदांनीं मला भेटीसाठीं बोलावलें.

रात्रींचा काळोख पसरला होता. झिमझिम पाऊसहि पडत होता. गांवाच्या खूप आंतल्या भागांतील एका घराच्या पुढच्या खोलींत मी मच्छरदाणींत बसल्यें होत्यें. कुणी तरी व्यक्ति आंतून आली व उद्गारली: 'हॅलो!' त्या व्यक्तीमागोमाग दुसरीहि एक व्यक्ति आली. खोलींत मिणमिण जळणाऱ्या चिमणीच्या उजेडांत मला कांहींच स्पष्ट दिसत नव्हतें. ते दोघेजण अत्यंत हळू आवाजांत कांहींतरी कुजबुजत होते. त्यांचें बोलणें ऐकूं येत नसल्यामुळें त्या दोघांपैकीं मास्तरदा कोणते हें प्रथम उमगेचना मला. नंतर मास्तरदा कोण तें कळलें तेव्हां त्यांची खुजी मूर्ति पाहून मी मनांत म्हटलं, कीं 'चित्तगांवचा राजा' म्हणून प्रसिद्ध असलेले मास्तरदा हेच असं सांगूनसुद्धां पटणं कठीणच आहे. त्यांच्या चेहऱ्यावर भव्य, विशिष्ट, असं कांहींच नव्हतं. मी इंटर सायन्सच्या परीक्षेला बसल्यें होत्यें. त्या परीक्षेचे पेपर कसे काय गेले असा त्यांनीं प्रश्न केला, तेव्हां मी पटकन् उत्तरल्यें: "विशेष चांगले नाहीं." त्यांनीं परत प्रश्न केला: "कां? फार काम सोंपविण्यांत आलं होतं का तुझ्यावर?" त्यांच्या आवाजावरून मी ताडलं कीं अभ्यासांत चालढकल केलेली त्यांना आवडत नसली पाहिजे.

मास्तरदांना उजेडण्यापूर्वी परत यायचं असल्यामुळें दोन वाजून गेल्यावर ते जायला उठले. मला परत भेटण्याचं आश्वासन देऊन ते निघून गेले.

मास्तरदांच्या प्रभावी व्यक्तिमत्वानं मी या पहिल्याच भेटींत भारली गेल्यें. त्यांच्या शब्दासाठीं काय वाटेल तें करण्याची माझ्या मनाची तयारी झाली. या भेटीनें मला आनंद तर झाला होताच, पण त्याचबरोबर मास्तरदाविषयीं आदर, आश्चर्य व किंचित् भीतीची भावनाहि माझ्या मनांत निर्माण झाली होती. मी खुद्द मास्तरदांशीं बोलून आल्यें, हें गुपित कुणाला तरी सांगण्यासाठीं मी उतावीळ झाल्यें होत्यें.

अखेर मी माझी सहकारी प्रीति वद्दादार हिला त्या भेटीची हकीकत सांगितली. मास्तरदाविषयीं विचार मनांत आले म्हणजे मला हटकून शरदबाबूंच्या ‘ पथेर दाबे ’ ( पथके दावेदार--‘ भारती ’ ) कादंबरींतील ‘ डॉक्टरदा ’ची आठवण येई व वाटे “ आपले मास्तरदा डॉक्टरदापेक्षांहि थोर आहेत खास. ” मी हें मत प्रीतीला सांगितलं तेव्हां ती म्हणाली: “ बरोबर आहे तुझं म्हणणं. मास्तरदा खरो-खरच डॉक्टरदाहून थोर आहेत, ”

यानंतर कितीदां तरी मी मास्तरदांना भेटल्यें. त्यांच्याविषयीं ऐकलेल्या गोष्टी खऱ्या आहेत अशी माझी या भेटींमध्यें खात्री पटली. एकदां मी त्यांच्याविषयीं प्रचलित असलेल्या अनेक कथा त्यांना ऐकवल्या. मास्तरदा म्हणाले : “ यांपैकीं सगळ्याच गोष्टी खऱ्या आहेत असं नाहीं. पण आपल्या लोकांचं आपल्यावर किती निःस्सीम प्रेम आहे, हें मात्र त्यावरून दिसून येतं. या प्रेमामुळेंच ते आपल्याला पोलिसांच्या स्वाधीन करीत नाहींत. तरीसुद्धां आपण पकडले जाऊं कीं काय अशी त्यांना सारखी भीति वाटत असते, आणि म्हणूनच ते आमच्यांत अद्‌भुत सामर्थ्य आहे अशी श्रद्धा बाळगून स्वतःची भीति दडपून टाकतात.”

★

पुढें १९३१ च्या सप्टेंबर महिन्यांत मी पकडली गेल्यें. दोन महिन्यांनीं मी जामिनावर सुटून बाहेर आल्यें, तेव्हां मास्तरदांकडून मला गुप्तपणें वावरण्याची—परागंदा होण्याची—आज्ञा मिळाली. माझ्या बाबतींत हा निर्णय घेणें त्यांना फार जड गेलें होतें. ते स्वतः १९१८ मध्यें दहशतवादी क्रांतिकारक पक्षांत सामील झाले. त्यांच्या लग्नाच्या दिवशीं रात्रीं त्यांचे ‘ गुरु ’ स्वतः हजर होते पण लग्न करून सुद्धां सूर्य सेन कधींच आपल्या पत्नीच्या सहवासांत राहिले नाहींत. १९२८ मध्यें तिचा मृत्यु झाला. तेव्हांहि ते तिच्याजवळ नव्हते. स्त्रियांचा सहवास क्रांतिकारकांनीं पूर्णपणें वर्ज्य केला पाहिजे असा पक्षाचा नियम होता, आणि त्याची अमल बजावणीहि अत्यंत कडकपणें होत असे. मास्तरदा स्वतःच एकदां मला म्हणाले होते : “ स्त्रिया क्रांतिकारक झाल्या तरी त्यांना परागंदा होऊं द्यावं किंवा नाहीं याचा निर्णय घेतांना मी पुष्कळ विचार केला. पण अखेर त्यांचं शौर्य व चिकाटी यांचा अनुभव आल्यानंतर माझे सर्व विकल्प नाहींसे झाले. ” एकदां एक गोष्ट चुकीची असल्याचें आढळून आलें कीं तिच्यांत बदल करण्याला मास्तरदा नेहमीं तयार असत.

मी मास्तरदांच्या बरोबर परागंदा असतांनाच्या काळांत ते मला अनंत


सिंह व गणेश घोष या दोघांविषयीं अनेक गोष्टी सांगत. त्यांची गोष्टी सांगण्याची हातोटी विलक्षण आकर्षक होती. त्यांतून अनंत सिंह व गणेश घोष यांच्याबद्दल बोलतांना तर ते आपलं अन्तःकरणच त्यांत ओतीत. ते म्हणत : " मला जें कांहीं करणं शक्य झालं, तें त्यांच्यामुळंच. " चितगांवचे लोक म्हणत, " सूर्य सेन आहे तोंवर ते अनंत सिंह व गणेश घोष सारखे शेंकडों वीर निर्माण करतील यांत शंका नाहीं. "

आयर्लंडच्या लोकांनीं ज्याप्रमाणें लढून स्वातंत्र्य मिळवलं, त्याच मार्गानें हिंदुस्थान स्वतंत्र होईल असं मास्तरदांचं ठाम मत होतं. मी त्यांच्याबरोबर असतांनाच डॅन ब्रीनचं " आयर्लंडच्या स्वातंत्र्यासाठीं माझा लढा " या पुस्तकाचीं मी पारायणं केलीं. डॅन ब्रीन म्हणजे मास्तरदांचा आदर्श. आयर्लंडच्या स्वातंत्र्य-लढ्याच्या इतिहासानें त्यांच्या मनावर इतका जबरदस्त पगडा बसविला होता कीं त्यांनीं आपल्या क्रांतिकारक संघटनेचं नांवहि ' आयरिश रिपब्लिकन आर्मी 'च्या धर्तीवरच ' इंडियन रिपब्लिकन आर्मी, चितगांव शाखा ' असें ठेवलें. सूर्य सेन हे त्या शाखेचे अध्यक्ष होते.

★

मास्तरदा म्हणत : " स्वातंत्र्य मिळविणं हें आपलं ध्येय आहे, फांसावर चढून प्राण देणें एवढंच नव्हे. पण आज आपण मूठभर लोक आहोंत, एवढ्याशा लोकांच्या प्रयत्नांनीं स्वतंत्र्य मिळणार नाहीं. परंतु आपल्या क्रांतिकारक कार्यामुळें जनता जागृत होईल, व ती हळूहळू क्रांतीच्या मार्गाकडे आकर्षित होईल. या दृष्टीनेंच आपला त्याग देशाच्या कामीं येईल. "

राजकीय दरोडे घालण्याचा मार्ग मास्तरदांना मान्य नव्हता. पैशाची काळजी करूं नका, असं त्यांचं नेहमींच सांगणं असे. शस्त्रागारावर हल्ला करण्याची तयारी सुरू झाली तेव्हां त्यासाठीं १५००० रुपये लागतील असा अंदाज करण्यांत आला. दरोडे घालण्याला अर्थातच परवानगी नव्हती. तेव्हां जो कोणी सर्वांत जास्त रक्कम आणील त्याला हल्ल्याचे वेळीं सर्वांत पुढें जाण्याचा मान मिळेल, असं ठरविण्यांत आलं. या हल्ल्यांत भाग घेऊन देशासाठीं प्राण देण्यासाठीं आमच्या तरुण सहकाऱ्यांत त्यावेळीं जणू स्पर्धाच लागली होती. श्रीमंत कुटुंबांतील मुलांनीं ५०० पासून ३००० रुपयांपर्यंत रकमा आणल्या. कुणी आपल्या घरचे सगळे दागदागिने आणले. पैसे गोळा करण्याची ही मोहीम जोरांत चालू असतां एक पोरगा मास्तर-दांकडे आला व त्याच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. हा रडतो कशा-



मास्तरदा [ सूर्य सेन ]

नगर वाचनालय
ता. ..........
सातारा.



अंबिका चक्रवर्ती

( वीस वर्षें तुरुंगवास भोगून नुकतेच सुटलेले
कॉ. रमेश चतर्जी यांनीं तुरुंगांत काढलेलें रेखाचित्र )

नगर वाचनालय
ता. ....
सातारा.

साठीं हें कुणालाच कळेना. अखेर त्यानें आपली कहाणी सांगण्यास सुरवात केली. त्याची आई अत्यंत गरीब होती. पैसा असा तिच्याजवळ नव्हताच. त्यानें खूप प्रयत्न केला, पण व्यर्थ! अखेर त्यानें आदल्या रात्रीं आपल्या आईची पेटी फोडून त्यांतील चांदीच्या कंकणांची जोडी काढून आणली होती. तिची किंमतहि फार तर दोनतीन रुपये असेल नसेल. ही हकीकत ऐकून मास्तरदांचे डोळे ओलावले व त्यांनीं हल्ल्याचे वेळीं त्या मुलाला सर्वांत पुढें पाठविण्याचें आश्वासन दिलें.

★

मास्तरदांचें आपल्या सगळ्या सहकाऱ्यांवर अतीशय प्रेम होतें, व ते त्या सगळ्यांची अत्यंत काळजी घेत. त्यांच्यापैकीं कुणाच्या घरच्या अडचणी असत, त्यांतून मार्ग काढण्यालाहि ते त्यांना मदत करीत. गुप्तपणें दिवस काढणें म्हणजे अत्यंत खडतर काम होतें. अनिश्चितता हें तर त्या जीवनाचें वैशिष्ट्यच. पण अशाहि परिस्थितींत खाण्यापिण्याच्या बाबतींत कुणाचे हाल न झाले पाहिजेत असा मास्तरदांचा कटाक्ष असे. ते म्हणतः "मी कंजूषपणा करीन तर पैसे वांचतील हें खरं आहे, पण मला वांचवायचे आहेत ते आपले कॉमरेड्स, पैसे नव्हत."

गुप्त जीवनांत विरंगुळा म्हणून कॉमरेड्स राहात असत तेथें गाण्याचे कार्यक्रम वगैरेचीहि मास्तरदांनीं व्यवस्था केली होती. या करमणुकीच्या कार्यक्रमांत ते स्वतःहि भाग घेत. मास्तरदांची फारशी माहिती नसणाऱ्याला त्यांचा स्वभाव एकलकोंडा असावा असें वाटे, परंतु त्यांच्या सहवासांत राहिल्यानंतर मग मात्र त्यांचा मनमोकळा स्वभाव सर्वांच्या परिचयाचा होई. प्रत्येक क्रांतिकारकानें नेहमीं प्रसन्न व हंसतमुख असलें पाहिजे हा मास्तरदांचा सिद्धांत होता.

मास्तरदा बऱ्याच अंशीं भावनावश वृत्तीचे होते. मृत्युमुखीं पडलेल्या आपल्या कॉमरेड्सविषयीं बोलतांना त्यांचा गळा दाटून येई. पण कामाला निघाल्यावर व विशेषतः संकटांचे डोंगर समोर असले म्हणजे आपल्या भावना पूर्णपणें काबूंत ठेवण्याचा त्यांचा अभ्यास होता.

१९३२ च्या जून महिन्यांत मास्तरदा चितगांवच्या जवळ असलेल्या धालघाट नांवाच्या खेडेगांवांत होते. निर्मल सेन त्यांच्याबरोबर राहात होता. प्रीति वद्दादार त्याचवेळीं त्यांच्या भेटीसाठीं आली होती. कोठून कोण जाणे, पोलिसांना ती बातमी लागली व त्यांनीं घराला गराडा घातला. दोन्ही पक्षांनीं गोळीबार सुरू केला व थोड्याच वेळांत बाहेर कॅप्टन कॅमेरॉन व आंत निर्मलदा जखमी झाले.

( प्रीति कोण याची पोलिसांना माहिती नव्हती. तिच्यावर पकडवॉरंटहि नव्हतें. ) पण निर्मलदाला जखमी अवस्थेंत सोडून जाणें कठीण होतें. निर्मल सेन म्हणजे मास्तरदांचा अतीशय जुना सहकारी. त्याला तसेंच टाकून जाण्याची मनाची तयारी करायची म्हणजे छातीवर दगडच ठेवायला हवा. पण मास्तरदांनीं तें दिव्य पार पाडलें. भावनेचा अतिरेक होऊं दिला तर कार्यनाश होईल ही जबाबदारीची जाणीव ठेवून ते प्रीतीला बरोबर घेऊन तेथून निसटून गेले.

संकटाच्या वेळीं डगमगणें कसें तें त्यांना ठाऊकच नव्हतें. अशा वेळीं ते शांतपणें मार्ग काढीत.

मी पोलिसांच्या हातावर तुरी देऊन परागंदा झाल्यें होत्यें, व भूमिगत जीवनाला नुकतीच सुरवात केली होती. रात्रींच्या वेळीं सगळे गाढ झोंपले होते. पण भयंकर गारठा असल्यामुळें मला झोंप येत नव्हती. अचानक दारावर जोरानें धक्के बसूं लागल्याचें मी ऐकलें व आम्हांला आश्रय देणारी म्हातारी घाबरून आरडाओरड करीत आंत शिरली. मी खिडकींतून डोकावून पाहिलं तों खालीं अंगणांत गुरखा शिपायांचा पहारा ! मी मास्तरदांना उठवलं व टॉर्च शोधूं लागल्यें. मास्तरदांनीं मला टॉर्च न लावण्याची सूचना दिली व इतरांना इशारा देऊन ते सरळ खालीं निघून गेले. त्यावेळीं त्या गुरखा शिपायांनीं आम्हांला अडवलं नाहीं, पण अडवलं असतं तरी त्या प्रसंगाला तोंड देण्याची मास्तरदांची तयारी होती. त्या प्रसंगीं मास्तरदांनीं दाखविलेलं प्रसंगावधान पाहून मी तर थक्कच झाल्यें.

मास्तरदांच्या प्रसंगावधानाच्या मी आणखीहि गोष्टी ऐकलेल्या आहेत. १९२५ च्या सुमारास एका रात्रीं दक्षिणेश्वर येथील बाँबच्या कारखान्यावर पोलिसांनीं छापा घातला. त्याच वेळीं कलकत्त्यांत शोभा बाझारमधील एका तीन मजली इमारतीकडेहि पोलिसांनीं मोर्चा वळवला. मास्तरदा व त्यांचे साथीदार येथें राहात असत, व दक्षिणेश्वरीं काम करीत असत. मास्तरदांची झोंप अत्यंत सावध होती. या प्रसंगींहि पोलिसांचीं पावलं ऐकूं येतांच ते खडबडून उठले व पोलिस खोलींत इतरांना पकडतात तेवढ्यांत ते सरळ त्यांच्या अंगावरून खोलीच्या बाहेर पडले व शेजारच्या घराच्या छपरावर उडी टाकून पसार झाले. सूर्य सेन येथेंच होते, हें पोलिसांच्या ध्यानांत येण्यापूर्वींच ते निसटूनहि गेले होते !

आमच्या सहकाऱ्यांपैकीं मास्तरदा–गुरु–कोण हें फारच थोड्यांना माहित होतें. सूर्य सेनला पाहून तर हेच आमचे मास्तरदा असावेत अशी कुणालाच

[स्टॅम्प] वाचनालय, सातारा.


कल्पना येणें शक्य नव्हतें. निर्मलदांची धिप्पाड शरीरयष्टि पाहून त्यांनाच लोक सूर्य सेन—मास्तरदा—समजत. पण तरीहि मास्तरदांनीं अनेक निरनिराळ्या लोकांचा पाहुणचार झोडला होता. आपल्याला व आपल्या सहकाऱ्यांना आश्रय देणाऱ्यांना उघडपणें कधींच न भेटण्याची मास्तरदा अत्यंत दक्षता बाळगीत.

१९३२ मध्यें मास्तरदांच्या बाबतींत पोलिसतपासाचा जोर कांहीं अंशीं मंदावला होता. दोन वर्षे सतत पाठलाग करूनहि सूर्य सेन हातीं लागत नाहींत तेव्हां ते चितगांव जिल्हा सोडून गेलेच असणार असा पोलिसांनीं कयास बांधल्यामुळें व म्हणून त्यांच्या व्यवस्थेंत जरा ढिलाई झाली होती. पण पहारतली येथें झालेल्या हल्ल्यामुळें व मी व प्रीति नापत्ता झाल्यामुळें मास्तरदा चितगांव मध्येंच आहेत अशी त्यांची खात्री झाली. त्यांनीं पुनः मास्तरदांच्या तपासाला जोरानें सुरवात केली. पुनः बाहेरून सैनिकांची तुकडी बोलविण्यांत आली व खेड्यापाड्यांतून त्यांनीं तळ ठोकले. ही जय्यत तयारी पाहून सर्वांनीं मास्तरदांना चितगांव सोडून जाण्याचा सल्ला दिला. पण ते म्हणालेः " तें शक्य नाहीं. आपली संघटना तयार करण्यासाठींच आपण ही चळवळ करीत आहों ना ? केवळ जीव वांचविण्यासाठीं मला काम सोडून कसं जातां येईल ? "

★

फेब्रुवारी १९३३ ची गोष्ट. एक दिवस मास्तरदांबरोबर आम्ही एका ठिकाणीं कामाला जात होतों. मी पुढें चालत होत्यें. आम्ही थोडेसे चाललों असूं, एवढ्यात आमच्यामागें बंदुकीच्या फैरी झडूं लागल्या. आम्ही पोलिसांच्या जाळ्यांत सांपडलों होतों. आल्या वाटेनें पळून जाण्याच्या उद्देशानें मी माघारीं वळल्यें, तोंच आमच्यापैकीं एक जण हात जायबंदी झाल्यामुळें खालीं कोसळल्याचें मला दिसलें. मी लगेच मास्तरदा झाडींत होते तिकडे वळल्यें. मला पाहून ते म्हणालेः " तुला या रस्त्याच्या खाणाखुणा माहित नाहींत, म्हणून तुझ्यासाठींच मी थांबलों होतों. " नंतर आम्ही वाट काढूं लागलों. पण थोड्याच अंतरावर एका खड्ड्यांत माझा पाय गेला. तेवढ्यांत गुरख्यांनीं आम्हांला गांठलें व त्यांनीं पाठीमागून मास्तरदांच्या कमरेला विळखा घातला. अशा रीतीनें सूर्य सेन पकडले गेले. त्यानंतर पुनः ते माझ्या दृष्टीस पडले नाहींत.

आमच्या जाण्याबद्दलची माहिती पोलिसांना कळविणाऱ्या व्यक्तीला लवकरच

कंठस्नान घालण्यांत आलें. त्याला ही शिक्षा देणाऱ्यांचीं नांवें सगळें चितगांव जाणत होतें, पण त्यांच्या विरुद्ध पुरावा देण्याला कुणीहि पुढें आलें नाहीं.

★

मास्तरदा गुप्तपणें वावरत होते, त्याच्या अखेरच्या दिवसांत त्यांच्या अंतःकरणांत काळजीनें घर केलें होतें. ते म्हणत : "आजकाल आपली शिस्त जरा ढिली पडली आहे अशी माझी भावना आहे. मी पूर्वींइतका कडक राहिलेलों नाहीं. हें बरं नव्हे खास." लोकांना भेटण्याबाबत मास्तरदा पूर्वींइतके कडक निर्बंध ठेवत नव्हते, असं आम्हांलाहि वाटत होतं. अलीकडे कुणाचीहि भेट घेण्याला ते नकार देत नसत. पक्षांतील लोकांची शिस्तहि सैल होत चालली होती व त्यांची वागणूक कांहीं अंशीं बेताल होऊं लागली होती. मास्तरदा म्हणतः "आतां माझे दिवस संपले आहेत!" शेवटीं त्यांनीं आपलें आत्मचरित्र लिहिण्यासहि आरंभ केला होता. आपलें कार्य जो पुढें चालवील त्याला त्यापासून पुष्कळच मार्गदर्शन होईल याच उद्देशानें त्यांनीं तें काम हातीं घेतलें होतें. परंतु तें काम अपुरेंच राहिलें, व त्यांनीं लिहून काढलेला भागहि पोलिसांनीं जप्त केला.

मास्तरदा पकडले गेल्यानंतर तीन महिन्यांनीं मी पकडली गेल्यें. तारकेश्वर दस्तीदार यालाहि माझ्याबरोबर पकडण्यांत आलें. आम्हां तिघांवर बरोबरच खटला भरण्यांत आला. आपल्याला फांशीची शिक्षा होणार असें मास्तरदा गृहीत धरून चालले असल्याचें मी तुरुंगांत गेल्यावर मला आढळून आलें. ते सर्व निरवानिरव करीत होते व आपल्यामागें काम पुढें कसें चालवावें याच्या सूचना देण्याला त्यांनीं आरंभ केला होता. कोर्टांत आरोपीच्या पिंजऱ्यांत बसून ते तारकेश्वरला सर्व समजावून सांगत असत. काय असेल तें असो, पण तारकेश्वर फांसावर जाणार नाहीं अशी त्यांची दृढ भावना होती. तुरुंगांत सुद्धां ते तासन्तास तारकेश्वरशीं बोलत बसत. त्या दोघांना वेगवेगळें ठेवण्यांत आलें होतें व दोघांवरहि कडक पहारा होता. पण मास्तरदांनीं आपल्या कोठडीवर पहारा करणाऱ्या गुरख्यांवर चांगलीच छाप बसविली होती. ते रात्रीं कोठडीची दारें उघडून देत व मास्तरदा तारकेश्वरशीं बोलत असत.

१९३३ मध्यें ऑगस्टच्या १४ तारखेला मास्तरदांना फांशीची शिक्षा सुनावण्यांत आली.

मास्तरदा !

हायकोर्टाकडे व जरूर पडली तर प्रिव्ही कौन्सिलकडे अपील करण्यांत येईल, असें सांगून ते आम्हांला धीर देण्याचा प्रयत्न करीत.

निदान फांसावर जाण्यापूर्वी मला एकदां तरी भेटण्याचेंहि त्यांनीं आश्वासन दिलें होतें.

१३ जानेवारी १९३४ रोजी त्यांना फांशीं देण्यांत आलें.

मला ही बातमी नंतर समजली. पुष्कळ दिवसांनीं राजशाही जेलमध्यें चितगांवच्या राजवंद्यांची माझी गांठ पडली तेव्हां त्यांनीं मला ही बातमी दिली. जेलचे सगळे नियम व परंपरा बाजूला ठेवून सूर्य सेनला मध्यरात्रीं फांसावर चढविण्यांत आलें. त्यांचें शव देखील आप्तेष्टांच्या स्वाधीन करण्यांत आलें नाहीं.

आपल्या कार्याची ज्योत तेवत ठेवण्याची जबाबदारी आमच्यावर टाकून मास्तरदांनीं या जगाचा निरोप घेतला.

मास्तरदा हें जग सोडून गेले हें मला खरेंच वाटेना. पण त्यांना स्मरून मी शपथ घेतली—" तुमची उज्वल परंपरा चालविण्यासाठीं आम्ही आमचें सर्वस्व पणाला लावूं, मास्तरदा ! "

★

सहा वर्षांनंतर १९३९ च्या मे महिन्यांत मी नुकतीच तुरुंगांतून सुटून बाहेर आल्यें होत्यें. एक फेरीवाला म्हणाला :

" सूर्य सेनला त्यांनीं फांशीं दिलें, त्या दिवशीं सूर्य उगवलाच नाहीं ! "

आणखी तीन वर्षांनीं देशावर जपानी आक्रमणाच्या भीतीनें काळे ढग आकाशांत दिसूं लागले, तेव्हां मी चितगांव जिल्ह्यांतल्या शेतकऱ्यांना देशाचें संरक्षण करण्यासाठीं जागृत करण्याकरितां प्रचार करीत हिंडत होत्यें.

जपानी फौजा चितगांवच्या सरहद्दीपासून हांकेच्या अंतरावर येऊन पोंचल्या होत्या, तेव्हां मी मास्तरदा पकडले गेले त्या गांवीं जाऊन पोंचल्यें. त्या गांवचा एक मुसलमान शेतकरी म्हणाला: " जपान्यांना जाऊन मिळायला आम्ही काय डेंडा आहोंत ? ( चितगांवचे मुसलमान हिंदूंविषयीं तुच्छ भावना दाखवायचे वेळीं त्यांना ' डेंडा ' म्हणतात. ) या ' डेंडा ' लोकांनींच सूर्य सेनला पकडवून दिलें. सुभाष बोस सुद्धां तसलाच ' डेंडा ' आहे एक ! "

हे शब्द अजूनहि माझ्या कानांत घुमताहेत. ते मी कधींहि विसरणें शक्य नाहीं.

सूर्य सेनला प्रेरणा देणारी देशभक्तीची भावना अद्यापहि चितगांवमध्यें जागृत आहे. परंतु नफेबाज व काळा बाजारवाल्यांनीं आज चितगांवमध्यें थैमान मांडलें आहे. कंत्राटदार हजारों निराधार स्त्रियांच्या अब्रूचा बाजार मांडून आपलें उखळ पांढरें करून घेत आहेत. या समाजकंटकांचा नायनाट करण्यासाठीं चितगांवला प्रचंड लढा उभारावयाचा आहे. सूर्य सेनच्या जोडीनें काम करणाऱ्या आम्हां साथीदारांना सूर्य सेनच्या चितगांवची ही दशा झालेली पाहून लाजेनें माना खालीं घालाव्या लागत आहेत. परंतु सूर्य सेननें ज्या संग्रामाचें रणशिंग फुंकलें ती लढाई अखेरपर्यंत लढत राहण्याची आम्ही शपथ घेतली आहे. चितगांवची जनता सूर्य सेनला विसरली नांहीं; तिच्याच मदतीनें आम्ही त्याची परंपरा उज्ज्वल करण्याचा निर्धार केला आहे!

---

# अनंत सिंह

मी अगदीं लहान होत्यें त्या वेळीं. राममूर्तींची प्रसिद्ध सर्कस चितगांवला आली होती. एक धिप्पाड माणूस आपल्या अंगावरून हत्ती चालवीत असे. दुसरा एक अजस्र देहाचा पहिलवान भरवेगानें धावणारी मोटारगाडी थोपवून धरी. हे प्रयोग पाहण्यासाठीं चितगांवच्या लोकांची तुफान गर्दी जमायची. एका प्रयोगाच्या वेळीं एका गोऱ्या इसमानें, मोटरीला बांधलेला एक भलामोठा जाडजूड साखळदंड तोडून दाखविला. नंतर त्यानें 'टारझन' च्या ऐटीनें आपली छाती पुढें काढून दंड थोपटले व चितगांवचा कुणीहि माणूस हा प्रयोग करून दाखवूं शकेल काय, असें आव्हान दिलें. एक तरुण तें आव्हान स्वीकारण्यासाठीं पुढें सरसावला. हा कोण तरुण आपल्या जिवावर उदार झाला आहे असें म्हणून लोक आपले श्वास रोखून त्याची कर्तबगारी पाहूं लागले. त्यानें साखळदंड तोडून दाखविला तेव्हां सगळे आश्चर्यानें थक्कच झाले. त्या तरुणाचें नांव **अनंत सिंह.** चितगांव शहरांत दुसऱ्या दिवशीं प्रत्येकजण अनंत सिंहच्या पराक्रमाची स्तुति करीत होता. अनंतसिंहाचें नांव प्रथम त्याच वेळीं माझ्या कानीं आलें.

★

चितगांवमध्यें १९२२ मध्यें आगगाडीवर राजकीय दरोडा घालण्यांत आला व १७००० रुपये लुटले गेले. चितगांवचे लोक म्हणाले: 'अनंत सिंहाशिवाय इतकें धाडस कोण दाखवूं शकणार?' अनंत सिंहाच्या पराक्रमाचे पोवाडे चितगांवच्या घरांघरांतून गाइले जात होते. चितगांवच्या अगदीं जवळच बॉंब तयार करण्याच्या गुप्त कारखान्यावर पोलिसांनीं छापा घातला तेव्हां सशस्त्र क्रांतिकारकांशीं त्यांची झटपट झाली. दुसऱ्या एका झटापटींत एक पोलिस इन्स्पेक्टर ठार झाला. अशा कैक घटनांशीं अनंत सिंहाचें नांव जोडण्यांत येत असे.

रिव्हॉल्व्हरची निशाणबाजी हा अनंतसिंहाच्या हातचा मळ आहे. तो डाव्या उजव्या दोन्ही हातांनीं सारख्याच सफाईनें अचूक नेम धरूं शकतो. अनंत सिंहाचें नांव ऐकलें कीं चितगांवच्या गुंडांना तर धडकीच भरते. त्याचें सामर्थ्य अमर्याद

आहे. त्याचें गुणगान करण्यांत चितगांवचे आबालवृद्ध देहभान विसरून जात. चितगांवच्या माता म्हणतः

" अनंत सिंहासारखा वीर पुरुष लाखांत एक. मला मुलगा होईल तो त्याच्यासारखा असावा हेंच माझं देवाजवळ मागणं आहे. "

१९२९ च्या मे महिन्यांत चितगांवमध्यें एक राजकीय परिषद भरली होती. त्यावेळीं चितगांवच्या रस्त्यांत जिकडेतिकडे खाकी पोशाख घातलेले तरुण हातांत लाठ्या घेऊन हिंडतांना दिसत होते. परिषदेचें गुंडांपासून संरक्षण करण्यासाठीं ही जय्यत तयारी ठेवण्यांत आलेली होती. ते अनंत सिंहाच्या स्वयंसेवक दलांतील सैनिक होते.

या परिषदेचाच एक भाग म्हणून महिला परिषद भरविण्यांत आली होती. कांहीं भेकड गुंडांनीं तेथें जमलेल्या स्त्रियांवर दगडविटांचा मारा केला व ते शेजारच्या घरांत जाऊन लपून बसले. अनंत सिंह तीरासारखा त्या घरांत घुसला व त्यानें त्या गुंडांना जन्माची आठवण राहील असा धडा शिकवला.

पण राजकीय सभा व परिषदांचे संरक्षण करणें एवढेंच अनंत सिंहाच्या स्वयंसेवकांचें काम नव्हतें. समाजांत कोठेंहि अन्याय किंवा जुलुम होत असेल तेथें धांवून जाणें हें त्यांचें ब्रीद होतें. चितगांवला होणाऱ्या जत्रेचा बंदोबस्त ठेवण्याचें काम ते स्वयंस्फूर्तीनें अंगावर घेत. जत्रेला येणारे हजारों स्त्री-पुरुष त्यांना मनापासून आशीर्वाद देऊन परत जात.

★

चितगांवच्या शस्त्रागारावर ता. १८ एप्रिल १९३० रोजीं सशस्त्र क्रांतिकारकांनीं हल्ला केला. पोलिस लाइन्सची होळी करण्यांत आली. तार ऑफिसचें काम बंद पाडण्यांत आलें. रेल्वेच्या रस्त्यावरील रूळ अदृश्य झाले. जिकडे-तिकडे एकच गोष्ट ऐकूं येऊं लागली: " अनंत सिंहाच्या दलाचेंच काम हें."

लोकांचा तर्क फारसा चुकीचा नव्हता.

अनंत सिंह १९२७ मध्यें तुरुंगांतून सुटून आल्यापासूनच त्यानें ही योजना आंखण्यास सुरवात केली होती. १९२५-२६ मध्यें बंगाल ऑर्डिनन्सखालीं सरकारनें **अनंत सिंह, गणेश घोष** व त्यांच्या इतर कांहीं सहकाऱ्यांना स्थानबद्ध करून ठेवलें होतें. १९२० ची असहकारितेची चळवळ अयशस्वी झाल्यानंतर बंगालचे शेंकडों तरुण पुन्हां दहशतवादाच्या मार्गाकडे वळले होते. ही दहशतवादाची चळवळ ठेंचून काढण्यासाठीं बंगाल सरकारनें जंग जंग पछाडलें. या दडपशाहीच्या वेळींच त्यांनीं अनंत सिंह व त्याच्या दोस्तांना



अनंत सिंह



टेग्रा



गणेश घोष

नगर वाचनालय
ता. ..........
सातारा.

पकडून स्थानबद्ध करून ठेवलें. अनंत सिंहाची १९२७ मध्यें मुक्तता होतांच त्यानें चितगांव शस्त्रागारावरील हल्ल्याची योजना हातीं घेतली व सतत तीन वर्षें खपून त्या योजनेची पूर्ण तयारी केली.

१९२७ मध्यें सुटून येतांच अनंत सिंहानें प्रथम शारीरिक शिक्षणाचे वर्ग सुरू केले. तो स्वतःहि बऱ्याच विद्यार्थ्यांना शिकवीत असे. क्रांतीसाठीं तळहातावर शीर घेऊन निघालेल्या तरुणांनीं आपलें शरीर कमावलेंच पाहिजे असें त्याचें ठाम मत होतें. अर्थात् निव्वळ शरीरसामर्थ्यावरच त्याचा भर नव्हता. घोड्यावर बसणें, मोटार चालविणें, लाठी व तलवार चालविणें, बॉक्सिंग, वगैरे प्रकारहि त्या वर्गात शिकविण्यांत येत. तो स्वतः या सर्व गोष्टींत पटाईत होता. त्याच्या निशाणबाजीचीं रसभरित वर्णनें करतांना गांवांतले सर्व लोक रंगांत येत. उडत्या पाखरावर अचूक नेम धरणें, मुलाच्या डोक्यावर फळ ठेवून मुलाला किंचितसुद्धां इजा न होऊं देतां फळ आरपार छेदणें, वगैरे गोष्टींत त्याचा हात धरणारा कोणी नाहीं अशी त्याची ख्याति होती.

महिन्यांतून एकदां अनंत सिंह आपल्या शिष्यांना गांवाबाहेर दऱ्याखोऱ्यांत नेऊन त्यांना पिस्तूल, बंदुका, वगैरेंच्या निशाणबाजीचें शिक्षण देई.

★

कोणतीहि गोष्ट करण्याला आपल्या सहकाऱ्यांना सांगण्यापूर्वी ती स्वतः करून दाखवावयाची हा त्यांच्या आवडत्या ' अनंत दा ' चा बाणा होता. शस्त्रागारावरील हल्ल्याच्या तयारीसाठीं १५,००० रुपये गोळा करण्याचें ठरलें. एके दिवशीं अनंताच्या वडिलांनीं तिजोरी उघडलेली त्याच्या नजरेस पडली. अनंत तेथें गेला व ३००० रुपयांची एक पिशवी उचलून वडिलांना म्हणाला: " हा माझा वांटा मी घेतों, बाबा." ती सर्व रक्कम त्यानें शस्त्रागार हल्ल्यासाठीं आपल्या दलाच्या स्वाधीन केली.

अनंत सिंहानें चितगांवच्या उत्कृष्ट तरुणांना गोळा करून त्यांना मृत्यूला हंसतमुखानें तोंड कसें द्यावें याचें शिक्षण दिलें. पण तो स्वतः मात्र त्यांना मृत्यूपासून वांचविण्यासाठीं अनेक संकटें आपल्यावर ओढवून घेई. चितगांव शस्त्रागारावर हल्ला झाला त्याच्या बरोबर अठरा दिवस पूर्वी असाच एक प्रसंग घडला. अनंत सिंहाच्या घरांतच बॉंब तयार करण्याचें काम चालू होतें. **तारकेश्वर** बॉंब तयार करीत होता व कांहीं सहकाऱ्यांना त्याची माहिती देत होता. अचानक एक मोठा स्फोट होऊन सर्वांच्या कानठळ्या बसल्या. तारकेश्वरचें

तोंड व छाती भाजून निघाली. आणखी एक दोघांनाहि इजा झाली. भर दिवसा हा प्रकार घडला. स्फोटाच्या आवाजामुळें पोलिस कोणत्या क्षणीं येऊन थडकतील याचा नेम नव्हता. बाँब तयार करण्याची सामग्री तात्काळ हालविणें आवश्यक होतें. मृत्युशय्येवर पडलेल्या तारकेश्वरला हालवून सुरक्षित जागीं नेण्याचा प्रश्न तर फारच बिकट होता. तारकेश्वर आग्रहानें म्हणालाः

" मला गोळी घालून सर्वजण निसटून जा. "

अनंत सिंहाचे डोळे पाण्यानें भरून आले. तो उद्‌गारलाः " तें शक्य नाहीं. माझ्या जिवांत जिव असेतोपर्यंत मी तुला वांचविण्याचे प्रयत्न करीत राहीन. लोकांचे प्राण वांचविणें हें माझें कर्तव्य आहे. प्राण घेणें नव्हें ! " त्यानें आपल्या सहकाऱ्यांना सर्व सामान हालविण्याच्या सूचना दिल्या व तारकेश्वरला आपल्या मोटारींत घालून दिवसभर मोटार रस्त्यावर फिरवीत ठेवली. अंधार पडतांच ते आपल्या डॉक्टर मित्राकडे गेले. तारकेश्वरच्या जखमांचा इलाज करण्यांत आला व हळूहळू तो खडखडीत बरा झाला.

★

अनंत सिंहावर चितगांवच्या क्रांतिकारकांची कमालीची भक्ती होती. त्याच्या शब्दासाठीं प्राण देण्याची त्यांची तयारी होती. आणि त्यांच्या या प्रेमाची जाणीव असल्यामुळेंच पुढें अनंत आपणहून पोलिसांच्या स्वाधीन झाला. चितगांव शस्त्रागारावरील हल्ल्यानंतर कित्येक महिने त्यानें पोलिसांच्या हातावर तुरी दिल्या होत्या. पोलिसांना त्याच्या शोधार्थ प्रयत्नांची शिकस्त करून अखेर हात टेकावे लागले होते. पण त्याच्या सहकाऱ्यांनीं नकळत पोलिसांच्या हातांत पुष्कळ पुरावा दिला. अखेर अनंत सिंहानें आपल्या सहकाऱ्यांना सांभाळून घेण्यासाठीं स्वतः पोलिसांच्या स्वाधीन होण्याचें ठरविलें. त्याच्या ज्या सहकाऱ्यांनीं पोलिसांच्या उलटतपासणींत नकळत कांहीं गोष्टी कबूल केल्या होत्या त्यांना इतरांपासून अलग ठेवण्यांत आलें होतें. अनंत सिंहानें तुरुंगांत त्यांची भेट घेतली. तेव्हां त्यांना रडूं कोसळलें, आणि त्यांच्यापैकीं प्रत्येकानें पोलिसांना दिलेले जाब कोर्टांत नाकबूल केले. अशा रीतीनें पोलिसांचा डाव उधळला गेला व कोर्टापुढें एकहि माफीचा साक्षीदार त्यांना उभा करतां आला नाहीं.

अनंत सिंह पोलिसांच्या स्वाधीन झाला ही एक आश्चर्यकारक घटना होती. परंतु त्यांतहि त्याचा प्रचंड आत्मविश्वास व स्वाभिमान दिसून आला. २८ जून

१९३० रोजीं तो कलकत्ता येथें पोलिसांच्या स्वाधीन झाला. त्यापूर्वीं त्यानें गुप्त पोलिस खात्याचे डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल लोमन यांना एक पत्र लिहिलें. या पत्रांत त्यानें लिहिलें होतें :

" मी स्वाधीन होणार आहे तें वैयक्तिक कारणांसाठीं. मला कोठें आश्रय मिळेनासा झाला आहे किंवा मला पश्चाताप होत आहे, असा एक क्षणभरहि गैरसमज करून घेऊं नका. मला पश्चाताप झालेला नाहीं. आश्रयाचाहि प्रश्न माझ्यापुढें उभा नाहीं; बंगालमध्येंच नव्हे तर सबन्ध हिंदुस्थानांत, किंवा हिंदुस्तानच्या बाहेरसुद्धां मी कुठेंहि सुरक्षित राहूं शकतों. "

पोलिसांना वेड लागण्याची पाळी आणणारा अनंत सिंह आपल्या सहकाऱ्यांनीं पोलिसांच्या छळाला व हुशारीला बळी पडूं नये एवढ्या एकाच कारणानें आपणहून स्वाधीन झाला.

अनंत सिंहाच्या व्यक्तित्वानें प्रभावित न होणें ही अशक्य कोटींतील गोष्ट होती. त्याच्या बुद्धीची कल्पकताहि आश्चर्यकारक होती. तुरुंगांत त्यानें कैद्यांवरच नव्हे तर पहारेकऱ्यांवरहि आपली छाप बसविली होती. बाहेरच्या लोकांशीं संबंध ठेवण्याच्या बाबतींत तर त्याचा हातखंडा होता. तुरुंगांत त्याला कागद, पेन्सिल कांहींच देण्यांत येत नसे, पण त्यानें कागद व पुस्तकेंच नव्हे तर शस्त्रास्त्रेंहि मिळविलीं व तुरुंग फोडून पळून जाण्याचा बेत आंखला. एका सहकाऱ्याच्या एका लहानशा चुकीमुळें तो बेत फसला.

मी 'अनंतदा 'ला पाहिलेलं नाहीं. तो तुरुंगांत गेल्यानंतरच माझा त्याच्याशीं संबंध आला. क्रांतिकारकांच्या गोटांत मुलींना घेण्याविरुद्ध त्याचा भयंकर कटाक्ष असे. मुलींशीं संबंध असलेल्या सहकाऱ्यांवरहि विश्वास ठेवण्याला त्याची तयारी नव्हती. तो म्हणत असे : " विश्वास नसलेल्या व्यक्तींपासून चार हात दूर राहिलेलं बरं. त्यामुळें फार तर एका व्यक्तीला अन्याय होईल. पण एका व्यक्तीसाठीं धोका पतकरून कार्यनाश करून घेण्याला माझी तयारी नाहीं. " या तत्त्वाची अंमलबजावणी करण्यांतहि तो अत्यंत कडकपणानें वागे.

अनंत सिंह पोलिसांच्या स्वाधीन झाल्यानंतर त्यानें माझ्याशीं संबंध जोडला तेव्हां मला आकाश ठेंगणें वाटूं लागलें. 'अनंतदा'च्या विश्वासास पात्र होणें हा माझ्या दृष्टीनें जगांतला सर्वांत मोठा मान होता. त्याचा आत्मविश्वास तर इतका जबरदस्त होता कीं त्याच्याशीं संबंध येणाऱ्या व्यक्तीच्या ठायींहि त्या गुणाचा प्रादुर्भाव होत असे. त्यावेळीं मी फार तर १७ वर्षांची असेन. पण आपण सर्व कांहीं करूं शकतों असा मला दांडगा विश्वास होता.

★

चितगांव शस्त्रागाराच्या खटल्यांत अनंत सिंह फांशीं जाणार याविषयीं कुणालाहि शंका नव्हती. त्याचें शेवटचें दर्शन घेण्यासाठीं कोर्टात येणाऱ्या माणसांची रीघ लागली होती.

पण अनंत सिंहाला फांशीची शिक्षा देण्यांत आली नाहीं. त्याला देण्यांत आलेली काळ्या पाण्याची शिक्षाहि जाहीर कोर्टात सांगण्यांत आली नाहीं. अनंतावर लोकांची अलोट भक्ति होती हें सरकार जाणून होतें. त्या खटल्यांतील गोऱ्या न्यायाधिशानें तुरुंगाच्या चार भिंतींच्या आंतच शिक्षा सुनविण्याचें काम उरकलें व तेथूनच विमानांत बसून त्यानें चितगांव सोडलें. एवढा बंदोबस्तहि अपुरा वाटल्यामुळें सकाळपासूनच गांवांत प्रत्येक कोपऱ्यावर सशस्त्र लष्कराचा पहारा बसविण्यांत आला होता व तरुणांना घराबाहेर पडण्याची बंदी करण्यांत आली होती.

मी त्या दिवशीं चितगांव कॉलेजमध्यें रसायनशास्त्राच्या वर्गात बसल्यें होत्यें. दोनतीन मुलांशिवाय इतरांना येणें शक्य झालें नव्हतें.

आमच्या प्रोफेसरांनाहि मध्येंच अडकवून ठेवण्यांत आल्यामुळें येण्याला एक तास उशीर झाला. ते येऊन पोंचतांच म्हणाले: "शस्त्रागारावरील हल्ल्याच्या खटल्यांतील आरोपींचा निकाल लागला." माझे सर्व प्राण पुढचे शब्द ऐकण्यासाठीं अधीर झाले. माझ्या हृदयाची धडधड मला स्पष्ट ऐकूं येत होती. इतर विद्यार्थ्यांचीहि तीच अवस्था झाली होती. प्रोफेसर पुढें म्हणाले: "कुणालाच फांशीची शिक्षा झालेली नाहीं. अनंतसिंहाला सुद्धां नाहीं." आमच्या सर्वांच्या डोळ्यांत आनंदानें अश्रू उभे राहिले. अति आनंदामुळें कुणाच्या तोंडांतून शब्दहि निघेना. कांहीं क्षण स्तब्धतेचे गेल्यावर आम्हांला प्रोफेसर मजकुरांचे शब्द ऐकूं आले: "त्या सर्वांना बोटीनें चितगांवहून हलविण्यांत आलें आहे."

गांवांत प्रत्येकाच्या तोंडीं एकच विषय होता:

"अनंत सिंहाला फाशी झाली नाहीं."

मी घरीं गेल्यावर आजी म्हणाली:

"मी रोज सकाळीं शंकराची प्रार्थना करीत होत्यें: हे प्रभू! अनंत सिंहाचें रक्षण कर. देवाने माझी प्रार्थना ऐकली."

★

मास्तरदा (सूर्य सेन) व इतरांच्या तोंडून मी अनंताच्या शौर्याच्या शेंकडों गोष्टी पुनः पुनः ऐकल्या होत्या. नंतर मला त्याचें आत्मचरित्रहि वाचावयास मिळालें. तो तुरुंगांत तें लिहीत असतांनाच आम्हांला पाठवीत असे. त्याच्या

लिहिण्यांत कृत्रिमतेचा लवलेशहि नव्हता. त्याचें अंतःकरण त्यांत स्पष्टपणें प्रतिबिंबित झालें होतें. तें वाचतांना अनंत प्रत्यक्ष आपल्याशीं बोलत असल्यासारखें वाटे, व त्यांतील एकएक शब्द हृदयाला जाऊन भिडे. अनंतदाचें लेखन वाचून माझी खात्री झाली कीं अंतःकरणाची तळमळ व विषयाशीं तादात्म्यता असली म्हणजेच लेखणींतून उत्कृष्ट लेखन उतरतें.

माझा त्याच्याशीं संबंध आल्यानंतर पुष्कळ दिवसांनीं त्यानें मला कळविलें: " क्रांतिकारक कार्यांत स्त्रियांना स्थान नसलें पाहिजे अशी भ्रामक कल्पना मी आजपर्यंत उराशीं बाळगली होती. त्याबद्दल मला त्यांची क्षमा मागायची आहे. "

★

मास्तरदा सांगत, " निराशा हा शब्दच अनंताच्या खिसगणतींत नाहीं; कोणतेंहि काम हातीं घेतलें कीं तें तडीस नेणें हा त्याचा स्वभावधर्मच आहे. "

अंदमानमधील बऱ्याचशा राजबंद्यांनीं खूप विचार केल्यानंतर व आत्मपरीक्षणानंतर ते साम्यवादाकडे आले. दहशतवादाची निरर्थकता स्वतः अनुभवल्यानंतरच ते इकडे वळले. अनंतदा व त्याच्या सहकाऱ्यांनीं सर्वांत शेवटीं कम्युनिझमचा स्वीकार केला. निराशेनें त्यांना कधींच घेरलें नव्हतें, त्यामुळें आपला मार्ग चुकीचा असल्याचें त्यांना सहजासहजीं पटणें अशक्य होतें. त्यांचे बरेचसे बेत यशस्वी झाल्याचेंहि त्यांनीं पाहिलें होतें. जनतेचें अलोट प्रेम व पाठिंबाहि त्यांच्या वांट्याला आला होता. यामुळें आपला दहशतवादाचा मार्ग चुकीचा असल्याचें मान्य करणें हें त्यांना अतिशय कठीण गेलें. परंतु खूप वादविवाद होऊन कम्युनिझम हाच मानवतेच्या मुक्तीचा मार्ग असल्याची त्यांची पूर्ण खात्री पटल्यानंतर मग मात्र त्यांनीं पुनः मागें जाण्याचा विचारहि मनांत आणला नाहीं.

चितगांववर जपानी विमानांतून बॉंबहल्ले होऊं लागल्यावर अनंत सिंहाला व त्याच्या मित्रांना स्वस्थ राहवेना. तुरुंगाच्या भिंतींआडून त्यांनीं जनतेला संदेश पाठविला व जपानी हल्ल्याला धैर्यानें तोंड देण्याची हांक दिली. चितगांवच्या जनतेच्या दृष्टीनें हा संदेश लाख मोलाचा होता. सरकारहि त्याचें महत्त्व जाणून होतें, म्हणूनच त्यानीं त्या संदेशाच्या हजारों प्रती छापून वांटल्या, पण तो संदेश देणाऱ्या शूर फॅसिस्टविरोधी देशभक्तांना मात्र तुरुंगातच ठेवून साम्राज्यशाहीनें आपल्या नीचपणाची साक्ष दिली आहे.

★

जचें चितगांव अनंत सिंहाचें चितगांव राहिलेलें नाहीं. दुष्काळानं-तरच्या गेल्या दोन वर्षांत चितगांवच्या क्रांतिकारकांची महान् परंपरा नामशेष झाली आहे.

● चितगांवच्या घराघर तून अनंत सिंहाच्या शौर्याच्या गोष्टी ऐकूं येत. आज तींच घरें भ्याडांचें आश्रयस्थान बनलीं आहेत. अनंत सिंहाचें नांव ऐकून चितगांवच्या गुंडांच्या अंगाचा थरकांप होत असे. आज त्याच चितगांवमध्यें गुंडशाहीनें थैमान मांडलें आहे. अनंत सिंहाच्या चितगांवमध्यें त्याच्या व त्याच्या दोस्तांच्या सुटकेसाठीं व त्यांच्या सुरक्षततेसाठीं स्त्रिया मनोभावें शिवाची पूजा बांधीत; त्याच चितगांवच्या स्त्रिया आज सोजिरांच्या व कंत्राटदारांच्या रानटी विषयवासनेला आपल्या अब्रूचे बळी देत आहेत!

● अनंत सिंहाच्या चितगांवमध्यें सर्व तरुणांची एकच महत्त्वाकांक्षा असे—आपण 'अनंतदा' सारखेंच व्हावें हीच! वडील माणसें त्यांना अनंत सिंहाचें अनुकरण करण्याला प्रोत्साहन देत. आज चितगांवचीं कोवळीं पोरें कंत्राटदारांचे दलाल बनून स्त्रियांना कुंटणखाण्यांत पोंचविण्यांत दंग झालीं आहेत! मद्याच्या प्याल्यांत आपली लाज कोळून पिणारे व आपल्याच आयाबहिणींच्या अब्रूवर निखारे ठेवणारे हे आजचे चितगांवचे तरुण देशप्रेमाची व देशभक्तांची कुचेष्टा करण्यांत स्वतःला धन्य मानीत आहेत! वडील माणसांना चितगांवच्या तरुणांचा अभिमान वाटण्याचे दिवस इतिहासांत जमा झाले आहेत. आपण या अधम राक्षसांना व कुलटांना जन्म तरी कशाला दिला, असें म्हणून त्यांचे मातापिता कपाळाला हात लावून धाय मोकलून रडत आहेत!

● चितगांवच्या देशभक्तांचीं अंतःकरणें घोर निराशेनें व्यापून टाकलीं आहेत. अनंत सिंहाच्या आदर्शाकडे पाठ फिरविल्यामुळें दुर्बळ बनलेल्या या देशभक्तांना निराशेच्या भोंवऱ्यांतून बाहेर पडणें अशक्य झालें आहे.

या परिस्थितीमुळें दुःखी झालेले चितगांवच्या आसपासच्या खेड्यांतील लोक आर्तस्वरानें विचारतात : "अनंत सिंह परत केव्हां येणार हें तुम्हीं सांगू शकाल काय?" अनंत सिंह म्हणजे त्यांच्या दृष्टीनें चितगांवच्या वैभवाचें व उत्कर्षाचें प्रतीक आहे. अनंत सिंहाच्या आगमनानंतर कोणतीहि गुंडांची टोळी एक पळभरसुद्धां टिकाव धरूं शकणार नाहीं अशी त्यांची बालंबाल खात्री आहे. अनंत सिंह परत आला म्हणजे तो जनतेच्या सर्व शत्रूंवर वाघासारखा तुटून पडेल हीहि त्यांची खात्री आहे. सोसाट्याच्या वाऱ्यानें पालापाचोळा उडून जातो त्या प्रमाणें काळाबाजारवाले, नफेबाज, कंत्राटदार—हे जनतेचे शत्रू अनंतसिंहाच्या आगमनाबरोबर नाहींसे होतील याबद्दल या गांवकऱ्यांना तिळमात्रहि शंका नाहीं. म्हणूनच ते व्याकुळ चित्तानें पुनः पुनः विचारतातः—"आमचा अनंत सिंह परत कधीं येणार हें तुम्हीं सांगूं शकाल काय?"

ता. सातारा.

# गणेश घोष

अनंत सिंह आणि गणेश घोष! एकाचें नांव काढतांच दुसऱ्याचें नांव डोळ्यांसमोर उभे राहिल्याशिवाय राहात नाहीं. चितगांवचे लोक नेहमीं म्हणत : "दोघांचीं शरीरें जरी वेगळीं असलीं तरी आत्मा एक आहे." आमचे क्रांतिकारक सहकारी म्हणत : "अनंत आणि गणेश ही आदर्श जोडी आहे. एकाच्या उणीवा दुसरा भरून काढतो."

तसें पाहिलें तर गणेशदा कांहीं चितगांवचा नव्हे. तो जेसोरचा. त्याचे वडील कापडाचे व्यापारी म्हणून चितगांवला येऊन राहिले आणि म्हणून गणेशदाचें शिक्षण चितगांवला झालें.

गणेशदा आणि अनंतदा यांचें एकमेकांवर विलक्षण प्रेम होतें. मास्तरद (सूर्य सेन, चितगांव शस्त्रागार कटाचे मुख्य पुढारी, यांना १९३४ मध्यें फांशी देण्यांत आलें.) मला चितगांव शस्त्रागारावरील हल्ल्याच्या वेळची एक गोष्ट नेहमीं सांगत. शस्त्रागारावर हल्ला करण्यासाठीं क्रांतिकारकांचे निरनिराळे गट तयार करून त्या गटांचा एक एक पुढारी नेमण्याचें काम चालू होतें. गणेशदानें एका गटाचें नेतृत्व स्वीकारावें अशी मास्तरदांची इच्छा होती, पण तो म्हणाला, "मला अनंतच्या गटांत घाला. मृत्यूला तोंड देताना अनंत माझ्याबरोबर पाहिजे." आणि त्याची ही मागणी मान्य करणें सर्वांना भाग पडलें.

गणेशदाला मी फक्त दोनदांच बघितलें आहे आणि तें सुद्धां दुरूनच. १९२९ मध्यें आमच्या चितगांवला राजकीय परिषद भरली होती. मोठमोठे पुढारी जमले होते. त्यांचें स्वागत करायला मी स्टेशनवर गेल्यें होत्यें. मी तिथें उभी असतां अकस्मात् माझ्यामागें पावलांचा आवाज आणि 'हॉल्ट!' असा लष्करी हुकुम ऐकूं आला. मी मागें वळून पाहिलें तों स्वयंसेवक एका रांगेत उभे होते. गणेश घोष हा त्या स्वयंसेवकांचा कप्तान होता.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं ८-३० वाजतां टाऊन हॉलमध्यें विद्यार्थ्यांची सभा होती. परंतु आमचा उत्साह इतका दांडगा की आम्ही ७-३० वाजतांच तिथें हजर झालों. मंडपांत सगळा शुकशुकाट होता. अजून कुणीच आले नव्हते.

एकटा गणेश घोष मात्र मंडपाची रखवाली करण्यासाठीं प्रवेशद्वारावर उभा होता. त्याच्या चेहऱ्याला आणि डोक्याला सर्वत्र पट्ट्या बांधलेल्या होत्या. आदल्या रात्रीं गांवगुंडांनीं केलेल्या हल्ल्यांत तो जखमी झाला होता. बाकीच्या सर्व स्वयंसेवकांनीं रात्रीं बराच वेळपर्यंत काम केल्यामुळें त्यांना विश्रांतीसाठीं सुट्टी देण्यांत आली होती; आणि तो स्वतः एकटाच तिथें पहारा देत उभा होता. गुंड पुन्हां केव्हां हल्ला करतील याचा नेम नव्हता; आणि असें असतांहि तो एकटाच, त्या जखमी अवस्थेंत, गुंडांना तोंड देण्यासाठीं तिथें उभा होता. त्याचें तें अचाट धैर्य पाहून मला त्याच्याबद्दल विलक्षण आदर वाटूं लागला.

गणेशदाचा आणि माझा प्रत्यक्ष असा संबंध तो तुरुंगांत गेल्यानंतरच आला. चितगांव शस्त्रागारावरील हल्ल्याचा एक कर्तबगार पुढारी म्हणून मला त्याची माहिती होती. त्याच्या शौर्य-धैर्याच्या गोष्टीसुद्धां मला माहित होत्या, परंतु तुरुंगांत असतांना त्याच्या प्रभावी लेखनशैलीचा आणि कवित्वशक्तीचा मला नव्यानेंच परिचय झाला. तुरुंगांत असतांना तो लढाईंत पडलेल्या हुतात्म्यांची जीवनचरित्रें लिहित असे. जलालाबादच्या लढाईचें ( ता. २२ एप्रिल १९३० ) वर्णन करणारें अतिशय सुंदर काव्य त्यानें लिहिलें होतें. क्रांतिकारकांची प्रखर ध्येयनिष्ठा, त्यांची अढळ श्रद्धा, आणि त्यांचा दांडगा आत्मविश्वास हे त्याच्या लेखनाचे मुख्य विषय असत.

चितगांव कटांतील आरोपींचा खटला चालू असतांना **लोकनाथ बाल** ( अनंत सिंह आणि गणेश घोष यांचा सहकारी ) कोर्टामध्यें गणेशदाचीं कवनें आपल्या खड्या आवाजांत म्हणत असे आणि कोर्टांतील सारे लोक चित्रासारखे स्तब्ध राहून तीं ऐकत असत. तुरुंगाच्या बाहेर असलेल्या आमच्या प्रत्येक सहकाऱ्याला गणेशदाचीं गाणीं पाठ होती. तीं गाऊन ते तरुणांत नवी चेतना निर्माण करीत आणि आपल्या कार्यासाठीं नवे सैनिक मिळवीत.

आज इतकीं वर्षें लोटल्यानंतर गणेशदांचीं सगळीं गाणीं मला आठवत नाहींत, पण **'चितगांव पलटण'** या त्याच्या काव्यांतील जलालाबादच्या लढाईचें वर्णन मात्र मी कधींच विसरूं शकणार नाहीं. जलालाबाद येथें त्यानें आपल्या ५८ सहकाऱ्यांसह पोलिसांशीं जें युद्ध केलें त्याचें स्फूर्तिदायक वर्णन त्यांत केलें आहे.

चितगांव शस्त्रागारावर हल्ला चढवितांना निदान सात दिवस तरी चितगांववर आपला कबजा राहील अशी सर्वांची कल्पना होती. त्या सात दिवसांत

पोलिस लाईनचा नाश करण्यांत येईल, चितगांव विभागांत प्रवेश करण्याचे लष्कराचे मार्ग बंद करण्यांत येतील व सात दिवसपर्यंत चितगांव स्वातंत्र्याचें जीवन कंठूं शकेल असें सर्वांना वाटत होतें. सातव्या दिवशीं चितगांवच्या स्वातंत्र्याचें रक्षण करतां करतां रणभूमीवर देह ठेवण्याची सर्वांची तयारी होती. चितगांवचें हे स्वातंत्र्यकांड राष्ट्राच्या इतिहासांत अमर होईल, हिंदी देशभक्तांना त्यापासून अखंड कालपर्यंत स्फूर्ति मिळेल, असा त्यांचा विश्वास होता.

परंतु सात दिवसपर्यंत त्यांचा चितगांववर ताबा राहूं शकला नाहीं. दुसऱ्याच दिवसापासून त्यांना मृत्यूशीं सामना देण्याची तयारी करावी लागली.

गणेश घोष आणि अनंत सिंह या दोघांनाहि फांशीची शिक्षा होणार अशी सर्वांची खात्री होती. त्यांना फांशी होऊं नये म्हणून चितगांवमधील प्रत्येक व्यक्तीनें आपल्या देवाला संकट घातलेलें होतें. परंतु त्यांना मरणाची भीति नव्हती. त्यांना त्याबद्दल कांहींच वाटत नव्हतें. गणेशदानें ' **बंदी माता** ' नांवाच्या कवितेंत भारतमातेच्या या वीरपुत्रांच्या बलिदानाचें स्फूर्तिदायक वर्णन केलें आहे.

अनंत सिंह आणि गणेश घोष या दोघांचेंहि क्रांतिजीवन एकाच काळांत सुरू झालें, दोघेहि एकत्रच तें जीवन जगले. परंतु दोघांच्याहि दृष्टिकोनांत खूपच फरक होता. अनंतदाचा ईश्वरावर आणि दैवावर बराच विश्वास होता. परंतु गणेशदा ईश्वर, दैव या गोष्टींची काडीइतकीहि पर्वा करीत नसे. तो म्हणत असे, " ही सगळीं दुबळ्या मनोवृत्तींचीं लक्षणें आहेत.स्वतःबद्दल विश्वास नसल्याचें हें चिन्ह आहे. मर्दपणा, कार्याबद्दल एकनिष्ठ भक्ति आणि आत्मविश्वास हीच यशाची गुरुकिल्ली आहे. "

याच्या उलट अनंतदाची गोष्ट होती. एकदां त्यांनीं मला कांहीं तांतडीच्या कामासाठीं कलकत्त्याला पाठविण्याचें ठरविलें. एक दिवसाचा उशीर सुद्धां अत्यंत घातक ठरला असता. तरीहि अनंतदा म्हणाला, " आपण तिला शुक्रवारीं पाठवूं. गुरुवार हा आपल्याला वाईट दिवस असल्याचें नेहमीं अनुभवाला आलें आहे. कालारपोल लढाईच्या दिवशीं गुरुवारच होता आणि त्या दिवशीं आपल्याला आपले चार साथी गमवावे लागले. "

परंतु गणेशदाला एका क्षणाचाहि विलंब मान्य नव्हता. तो म्हणाला, " आपण आपल्या कार्यक्षमतेनें आठवड्यांतील प्रत्येक दिवस शुभदिन बनविला पाहिजे. "

आज गणेश घोष कम्युनिस्ट पार्टीचा सभासद आहे. चितगांव बंडाचा क्रांतिकारक पुढारी लेनिन-स्तालिनच्या क्रांतिकारक पक्षांत सामील झाला आहे.

अनंतदाप्रमाणेंच त्यालाहि जन्मठेपेची शिक्षा झाली. तिथें त्यानें आपल्या जुन्या धोरणाचें आणि अनुभवांचें पुन्हा परीक्षण करावयाला सुरवात केली. तो स्वभावतःच बुद्धिवादी होता. आधुनिक जगाच्या विकासाचा अभ्यास करतां कम्युनिझम शिवाय तरणोपाय नाहीं असें त्याला दिसून आलें आणि त्यानें कम्युनिझमचा अंगिकार केला.

१९३९ मध्यें मी स्वतः तुरुंगाच्या बाहेर आल्यें तेव्हां सगळें जगच मुळीं बदललेलें आहे असें मला आढळून आलें. जगांतील या प्रचंड उलथापालथीमुळें मी अगदीं बावरल्यासारखी झाल्यें होतें. या नव्या जगांत आपलें स्थान कोणतें तें मला कळेना.

अशा वेळीं तुरुंगांतून अनंतदा आणि गणेशदा यांचीं पत्रें मला मिळूं लागलीं. तीच जुनी प्रभावशाली भाषाशैली, फक्त त्यांचा विषय आतां बदलला होता. त्यांत ते आमच्या जुन्या कार्याचें आणि अनुभवांचें विवेचन करून दाखवीत आणि कम्युनिस्ट मार्गाशिवाय दुसरा मार्ग नाहीं हें स्पष्ट करून दाखवीत. त्यांच्या पत्रांनीं माझ्या मनांतील गोंधळ नाहींसा झाला आणि मी कम्युनिस्ट पार्टींत दाखल झाल्यें.

आज चितगांवची थोर परंपरा जळून खाक होत आहे. चितगांवचे लोक साध्या माणुसकीला सुद्धां पारखे होत आहेत. अशा वेळीं गणेशदाची चितगांवला अत्यंत आवश्यकता आहे. समाजकंटकांवर त्वेषानें तुटून पडणारी त्याची लेखणी चितगांवांतून नष्टप्राय होऊं पाहणाऱ्या सामाजिक नीतिमत्तेला पुन्हा चितगांवच्या जीवनांत पूर्वीचें स्थान प्राप्त करून दिल्याशिवाय राहणार नाहीं.

---

नगर वाचनालय, सातारा.

# अंबिका चक्रवर्ती

चितगांव शस्त्रागार कटाच्या बऱ्याच पुढाऱ्यांना मी कधींच बघितलें नव्हतें. अंबिकादा हे त्यांपैकींच एक होते. मी जेव्हां चितगांवच्या क्रांतिकारक गटाला मिळाल्यें तेव्हां अगदींच लहान मुलगी होत्यें. आमच्या पार्टींतले बाकीचे लोक सुद्धां अगदींच तरुण होते; आणि त्या सर्वांना अंबिकादांनीं एवढी लांबलचक दाढी कां वाढविली याचें कोडें पडलें होतें. अंबिकादांची दाढी हें त्यांचें खास वैशिष्ट्य होतें.

चितगांवमध्येंच 'अनुशीलन पार्टी' या नांवाचा दुसरा एक क्रांतिकारकांचा गट होता. त्यांच्या पुढाऱ्यांपैकीं चारुविकास दत्त नांवाच्या पुढाऱ्याचा एक पाय लंगडा होता. त्यामुळें अनुशीलन पार्टीचे लोक रस्त्यांत दिसले कीं आमचे लोक एल. पी. ( लेम पार्क--लंगडें पार्क ) असें ओरडायचे. त्यांनासुद्धां याचें उट्टें काढण्याची संधी अंबिकादांच्या दाढीनें दिली होती. ते आम्हांला पाहून ओरडत : 'बीअर्ड स्क्वेअर' ( दाढी चौक ). ज्या अंबिकादाच्या दाढीनें आम्हांला हें टोपण नांव प्राप्त करून दिलें होतें, त्या अंबिकादांना पाहण्यास जर आम्ही उत्सुक असलों तर त्यांत नवल नाहीं.

★

मी मास्तरदांच्या बरोबर गुप्तपणें काम करीत असतांना मी त्यांना नेहमीं अंबिकादांची माहिती विचारीत असे. ते म्हणायचे, " अंबिकाबाबू सारखा कणखर वृत्तीचा क्रांतिकारक विरळाच. सुख किंवा दुःख यांच्या योगें ते कधीं क्षणभर सुद्धां विचलित होत नाहींत. त्यांच्यांत भावनाप्रधानतेचा अंश सुद्धां नाहीं. काम करण्याच्या बाबतींत ते कधींहि कुचराई करणार नाहींत किंवा निष्काळजी असणार नाहींत. अर्थातच त्यांना दुसऱ्यानें केलेली कामांतील कुचराई किंवा निष्काळजीपणा मुळींच खपत नाहीं. चितगांव शस्त्रागारावरील हल्ल्याच्या वेळीं मला त्यांच्या या वृत्तीचा अनुभव आला. शस्त्रागारावरील छाप्याचें काम आटोपतांच त्या छाप्यांत भाग घेणारांनीं पोलिसांच्या बराकींवर हल्ला करणारांच्या मदतीला जावें असें ठरलें होतें. त्याप्रमाणें शस्त्रागारावरील हल्ला यशस्वी तर झाला, परंतु

या यशानें हुरळून जाऊन आमच्या लोकांनीं तिथेंच विजय साजरा करायला सुरवात केली. अंबिकाबाबूंना ही गोष्ट आवडणें शक्यच नव्हतें. त्यांनीं तावडतोब त्यांची कानउघाडणी केली, आणि पोलिस-बराकींकडील तुकडीच्या मदतीला जाण्यासाठीं सांगितलें. अंबिकाबाबूंच्या बोलण्यानें सगळेच शरमिंदे झाले आणि ताबडतोब आपल्या नव्या कामावर निघून गेले.

★

अंबिकादाच्या धाडसाच्या, शौर्याच्या आणि प्रसंगावधानाच्या अनेक आश्चर्यकारक गोष्टी मी ऐकल्या आहेत. १९२४ सालची कीं २६ सालची गोष्ट आहे. नक्की साल मला आतां आठवत नाहीं. चितगांवच्या बहाद्दर हाटांतील एका घरांत मास्तरदा, अंबिकादा आणि इतर कांहीं क्रांतिकारक बॉम्स तयार करीत होते. पोलिसांना कशी बातमी लागली कुणाला ठाऊक, पण त्यांनीं एकदम घराला गराडा घातला. त्यांनीं निसटून जाण्याचा प्रयत्न केला परंतु पोलिसांनीं गोळ्या झाडायला सुरवात केली. आंतील आमच्या लोकांनींहि पिस्तुलांनीं जबाब द्यायला व अर्धवट तयार झालेले बॉम्स फेंकायला सुरवात केली. थोड्याच वेळांत क्रांतिकारक पुढें व गोळ्या झाडणारे पोलिस मागें अशी शर्यत सुरू झाली. परंतु अंबिकादांचा पाय घसरून ते जवळच्या एका नाल्यांत पडले. जेव्हां त्यांना बाहेर काढण्यांत आलें तेव्हां ते बेशुद्ध होते आणि त्यांच्या अंगावर गोळ्यांच्या इतक्या जखमा होत्या कीं ते जिवंत आहेत कीं मेले याचाच पत्ता लागत नव्हता. त्यांना सरकारी इस्पितळांत पाठविण्यांत आलें आणि तिथें त्यांची प्रकृति सुधारल्यावर कोर्टांत उभें करण्यांत आलें.

परंतु पोलिस कांहीं त्यांच्यावर आरोप शाबीत करूं शकले नाहींत. त्यांनीं सांगितलें कीं मी त्या रस्त्यानें जात होतों आणि पोलिसांच्या गोळ्या मला लागल्या. याला पुरावा म्हणजे ज्या वेळीं पोलिसांनीं गराडा घातला त्यावेळीं मी मुळीं दुसरीकडेच होतों. अंबिकाबाबूंचें चितगांवमध्यें इतकें वजन होतें कीं चितगांवमधील अत्यंत प्रतिष्ठित समजले जाणारे लोक त्यांच्या बाजूनें साक्ष द्यायला आले आणि शेवटीं पोलिसांना त्यांना सोडून देणें भाग पडलें.

चितगांव शस्त्रागारावरील हल्ल्यानंतर जलालाबाद टेकडीवर जी लढाई झाली तींत अंबिकादांना अत्यंत गंभीर अशा जखमा झाल्या. त्यांच्या डोक्याला गोळी लागलेली होती. ते मेले या समजुतीनें त्यांच्या इतर सहकाऱ्यांनीं त्यांना तसेंच मागें टाकलें होतें. परंतु ते मेले नसून बेशुद्ध झाले होते. रात्रीच्या

थंड वाऱ्यामुळें ते शुद्धीवर आले तेव्हां आपण अगदीं अशक्त झालों आहोंत असें त्यांना आढळून आलें. एक इंच सुद्धां इकडचे तिकडे हलणें शक्य नव्हतें. आपण जिवंत आहोंत किंवा नाहीं याचीच त्यांना शंका होती. इतक्या जखमा झाल्यानंतर जिवंत राहणें अशक्यच होतें. कदाचित आपण भूत बनलों असूं ! त्यांनीं हात पाय हालवून बघितलें. डोक्याला हात लावला तों जखमेमुळें अशा कांहीं वेदना झाल्या कीं जिवंत असल्याची त्यांना एकदम खात्री पटली. ह्या जखमा आणि हें दुःख पूर्णपणें सत्य होतें. त्यांत भुतांचा कांहींच संबंध नव्हता. त्यांनीं उठण्याचा प्रयत्न केला, पण ते इतके निःशक्त झाले होते कीं पुन्हां खालीं कोसळले आणि गडगडत खालच्या डबक्यांत पडले. त्यांतून मोठ्या कष्टानें उठून त्यांनीं गांवाकडे यायला सुरवात केली.

परंतु अंबिका चक्रवर्ती जलालाबादच्या लढाईंत पडल्याची बातमी सर्वत्र पसरली होती आणि गांवांतील लोकांचीहि तशीच समजूत होती. अशा अवस्थेंत एक दिवस एकाएकीं आम्हांला कळलें कीं पातिया खेड्यांत अंबिका बाबूंना पकडण्यांत आलें. अंबिकादा जिवंत आहेत हें ऐकून आम्हांला किती आनंद झाला तें सांगतां यायचें नाहीं. कांहीं दिवसांनीं मास्तरदांनीं आम्हांला त्याबद्दलची सर्व हकीकत सांगितली.

जलालाबाद टेकडीवरून अंबिकादा निघाल्यानंतर बऱ्याच दिवसांनीं पोलिसांनीं एका घराला गराडा घातला. त्याच्या शेजारच्या घरांतच अंबिकादा लपलेले होते. त्यांच्या जखमा अजून भरून आलेल्या नव्हत्या. त्यांना ही बातमी कळतांच ते घराजवळच्याच लहानशा तळ्यांत जाऊन लपले. सबंध एक दिवस आणि एक रात्र त्यांनीं पाण्यांत राहून काढली. फक्त त्यांचें नाक तेवढें पाण्याच्या वर होतें. आधींच ते आजारी व अशक्त होते. या प्रकारामुळें त्यांना थंडीची बाधा झाली आणि थुंकीबरोबर रक्त बाहेर पडूं लागलें. त्यांची ही अवस्था पाहून सगळ्यांनाच काळजी वाटूं लागली. त्यांना क्षयरोग झाला अशी जवळ जवळ सगळ्यांचीच खात्री झाली. परंतु अंबिकादा आपल्याला कांहीं गंभीर स्वरूपाचा विकार झाला आहे हें मान्य करायलाच तयार नव्हते. आपल्या सहकाऱ्यांनीं आपल्या आजाराचा बाऊ करून आपली काळजी करीत बसावें हें त्यांना मुळींच सहन होत नव्हतें. त्यांच्या प्रकृतीमुळें तर ते विशेषच चिडचिड करूं लागले होते. अशा परिस्थितींत त्यांच्या सहवासांत राहून त्यांची शुश्रूषा करणें हें खरोखरच कठीण काम होतें. परंतु त्याच बरोबर त्यांची शुश्रूषा करणें हेंहि तितकेंच आवश्यक होतें. शेवटीं फुतुदाला

( तारकेश्वर दस्तीदार ) त्यांच्या शुश्रूषेसाठीं नेमण्यांत आलें, कारण तो अंबिकादांचा फारच आवडता मित्र होता.

आपल्याला कांहींच झालें नाहीं हा अंबिकादांचा हट्ट एवढा जबरदस्त होता कीं त्यांना दिलेल्या फळांतील कांहीं फळें खाण्याचा ते फुतुदाला सारखा आग्रह करीत. आपल्याला क्षय झाला नाहीं हें सिद्ध करून दाखविण्याचा त्यांचा निश्चय होता. फुतुदा त्यांची नाना प्रकारें समजूत घालण्याचा प्रयत्न करी परंतु कित्येकदां त्याचा नाइलाज होई. मग तो त्यांच्या प्लेटमधील कांहीं फळें आपल्या प्लेट मध्यें काढून घेई आणि तीं न खातां खिडकींतून फेंकून देई. अंबिकादा खालीं अंथरुणावर पडलेले असल्यामुळें ही गोष्ट त्यांच्या लक्षांत येत नसे.

लवकरच त्यांना पकडून तुरुंगांत पाठविण्यांत आलें. अजून त्यांच्या थुंकीबरोबर रक्त पडतच होतें. तुरुंगाच्या डॉक्टरनें सुद्धां त्यांना क्षय झाला असाच निर्णय दिला आणि त्यामुळें त्यांचा खटला पुढें ढकलण्यांत आला. या वेळीं चितगांव शस्त्रागार कटांतील इतर आरोपींवरील खटला जवळ जवळ संपत आला होता म्हणून अंबिकादांवर वेगळा खटला भरण्याचें ठरवून त्यांना सुरीच्या तुरुंगांत पाठविण्यांत आलें.

जेव्हां त्यांच्या खटल्याला सुरवात झाली तेव्हां मी गुप्त रीतीनें राहात होत्यें. मी जेव्हां त्याबद्दल मास्तरदांजवळ गोष्ट काढली तेव्हां ते म्हणालेः ' अंबिकाबाबूंना फांशीची शिक्षा होणें शक्य नाहीं. ज्या माणसानें इतके वेळां मृत्यूला झुकांडी दिली तो याहि वेळेस मृत्यूवर मात केल्याखेरीज राहाणार नाहीं.' चितगांवच्या सर्वसाधारण जनतेची सुद्धां तीच अपेक्षा होती.

अंबिकादांच्या चौकशीसाठीं नेमलेल्या खास कोर्टानें त्यांना फांशीची शिक्षा सुनावली. परंतु हायकोर्टानें अपीलांत ती रद्द करून जन्मठेप केली. अंबिकाबाबूंच्या वकिलानें पुढीलप्रमाणें बचाव दिला होता :

अंबिकाबाबू मेले असें सरकारकडून जाहीर करण्यांत आलें होतें. शस्त्रागारावरील हल्ल्यानंतर ज्यांचा शोध लावण्याच्या खटपटींत पोलिस होते त्यांच्या यादींत त्यांचें नांव नव्हतें. अंबिकाबाबू मरण पावले असाच सर्वांचा समज होता. अर्थातच त्यांना शिक्षा देणें शक्य नव्हतें. याशिवाय शस्त्रागार कटाच्या आरोपींवर जे आरोप ठेवण्यांत आले ते अंबिकाबाबूंविरुद्ध करण्यांत आले नव्हते. अर्थातच त्या गुन्ह्यासाठीं त्यांना फांशीची शिक्षा देणें हें बेकायदेशीर आहे.

★

गेलीं पंधरा वर्षें ते तुरुंगांत आहेत. तुरुंगांतील जीवनामुळें त्यांची प्रकृति अधिकच ढांसळली आहे. त्यांच्या औषधपाण्याची योग्य व्यवस्था झाली नाहीं तर ते फार दिवस जगणार नाहींत असें नुकत्याच तुरुंगांतून सुटलेल्या कॉमरेड-स्चें म्हणणें आहे. हल्लीं ज्या परिस्थितींत ते आहेत ती लक्ष्यांत घेतली तर ते आणखी थोडे महिने तरी जगूं शकतील किंवा नाहीं याचा संशय आहे.

स्वतःच्या आश्चर्यकारक इच्छाशक्तीमुळें आणि धाडशीपणामुळें या खंद्या क्रांतिकारकानें आतांपर्यंत कित्येक वेळां मृत्यूला चुकविलें आहे. परंतु आतां तो पूर्वींचा तारुण्याचा जोम त्यांच्यांत शिल्लक राहिलेला नाहीं. त्यांचें शरीर अगदींच दुबळें झालें असून मृत्यूचा हल्ला जोरदार आहे. या युद्धांत या वेळीं ते जिंकतील किंवा नाहीं हें सर्वस्वीं आपल्यावर अवलंबून आहे.

त्यांच्या सुटकेसाठीं जर आपण जोरदार चळवळ उभारली तर त्यामुळें त्यांना आनंद होईल, त्यांचें धैर्य द्विगुणित होईल, मृत्यूशीं झगडण्यासाठीं त्यांच्या अंगीं नवा जोम निर्माण होईल, आणि पंधरा वर्षें तुरुंगाच्या भिंतीआड असलेला हा वयोवृद्ध योद्धा पुन्हां आपल्यांत परत येईल.

# सावित्री देवी

सन १९३२ च्या जून महिन्याची तेरावी तारीख. या दिवशीं शस्त्रागार हल्ला प्रकरणांतील फरारी क्रांतिकारक व सरकारी लष्कर यांची समोरासमोर लढाई झाली. तींत दोघे क्रांतिकारक ठार झाले. त्यांनींहि आपल्यापरी याचा बदला घेतला व सरकारी फौजेचा प्रमुख कॅप्टन कॅमेरॉन याला ठार केलें. ही चकमक ढालघाट नामक खेड्यांत एका गरीब ब्राह्मणाच्या घरांत झाली. वृद्ध घरधनी अगोदरच निवर्तलेला होता. त्याची विधवा पत्नी, मुलगा व एक विवाहित मुलगी येवढीं माणसें घरीं राहात होतीं. या चकमकीनंतर ती बाई व तिचा मुलगा आणि मुलगी या तिघांनाहि अटक झाली.

कांहीं काळ गेल्यानंतर मला असें कळलें कीं मुलगी माफीची साक्षीदार झाली. पण पोलिसांनीं कितीहि आमिषें दाखविलीं तरी ती बाई व तिचा मुलग या दोघांकडून मात्र पोलिसांना एका अक्षराची सुद्धां माहिती मिळाली नाहीं. या दोघांबद्दल आम्हांला अतिशय कौतुक व आदर वाटला. शिक्षण नाहीं, घरांत अठराविश्वे दारिद्र्य, असें असतांहि या दोघांना सोन्यारुप्याचा मोह कसा टाळतां आला ? नाहीं नाहीं ते अनन्वित हाल त्यांना निधड्या छातीनें कसे सहन करतां आले ? त्या खेड्यांत तर भांडकुदळ म्हणून या बाईची ख्याति होती. पण ' स्वदेशी ' वाल्या मुलांमुलींबद्दल तिच्या हृदयांत अमर्याद प्रेमादर होता म्हणूनच तिला असल्या भयंकर यातनांना व छळणुकीला तोंड देतां आलें हें आमच्या चटकन लक्षांत आलें. आमच्या दृष्टीनें ती एक आदरणीय महिला ठरली. तिला आम्ही ' देवी ' मानूं लागलों.

यानंतर आणखी तीन महिन्यांनीं पहारतली क्लबाजवळ मला पुरुषवेषांत अटक झाली. आणि माझ्या अटकेनंतर एका आठवड्याच्याच अवधींत त्याच ठिकाणाहून पहारतली क्लबावर प्रीतीच्या नेतृत्वाखालीं हल्ला झाला. माझ्या अटकेनंतर माझी तुरुंगांत रवानगी झाली.

तुरुंगाचें फाटक ओलांडून मी आंत स्त्रियांच्या वॉर्डांत जात होत्यें येवढ्यांत एक काळीसांवळी मध्यमवयस्क विधवा धांवतच मजकडे आली आणि मला

विचारूं लागली : " तूं ' स्वदेशीवाली ' का ? " तिच्या सगळ्या अंगावर—तोंडावर व सगळ्या अवयवांवर गळवें झाल्यामुळें ती अगदीं विद्रूप दिसत होती. तिच्या प्रश्नानें मी थक्कच झाल्यें; मी नुसतें तुटकपणें ' हो ' असें उत्तर देऊन जमादारणीच्या पाटोपाठ माझ्या कोठडींत गेल्यें.

पण ती बाई माझा पिच्छा सोडीना. एकसारखी पोलिसांबद्दल कांहींतरी बडबडत ती शेवटपर्यंत माझ्या मागोमाग आली. मला तिनें पोलिसांबद्दल इशारा दिला. तिनें सांगितलें, " ते तुला छळतील, तुझे हाल हाल करतील, पण तरी सुद्धां तूं त्यांना कांहींहि सांगतां कामा नये हं. ते तुला फांशी द्यायची सुद्धां धमकी देतील, पण तूं बिलकुल शरण जाऊं नकोस. "

पोलिसांच्या छळामुळें तिचें डोकें जरा बिघडलें होतें; पण तरीसुद्धां तिचें धैर्य कधींहि ढळलें नाहीं, तिच्या मनाचा खंबीरपणा कायम राहिला—फरक इतकाच झाला कीं तिच्या मनांतला दबलेला संताप व त्वेष ती वेगवेगळ्या मार्गांनीं व्यक्त करीत असे. आणि पोलिसांच्या वर्तनाविषयीं ती एक कविताहि म्हणत असे :

" मानभावि लोक हे जवळ येउनि बैसती
दावुनी धाक बातमी काढुनी घेती
अन् अखेर शेवटीं जिवानिशीं मारती "

तुरुंगांत तिचा भयंकर छळ झाला. पण ती आपल्याच विचारांत दंग असे आणि बाकी कशाकडेहि यत्किंचितसुद्धां लक्ष देत नसे. पण ज्या ज्या वेळीं मला कुणी ऑफिसांत भेटायला येई त्या त्या वेळीं ती हटकून मला भेटत असे आणि पोलिसांच्या क्लृप्त्यांपासून मला सावध राहायला सांगत असे. कांहीं काळ गेल्यावर मी जामिनावर सुटल्यें तेव्हां मला कळलें कीं ती व तिचा मुलगा रामकृष्णा या दोघांना चार वर्षें सक्तमजुरीची शिक्षा देण्यांत आली.

यानंतर महिन्याभरानें मी भूमिगत झाल्यें आणि मला पुन्हां अटक झाल्यानंतर शस्त्रागारहल्ल्याच्या पुरवणी खटल्यांत मला जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा मिळाली. मी दीड वर्ष निरनिराळ्या तुरुंगात काढल्यानंतर मला आमची बुढी ' माशिमा ' मिदनापूर जेलमध्यें भेटली. आतां सुद्धां ती पूर्वीप्रमाणेंच मला पोलिस व तुरुंगाचे अधिकारी यांच्या पासून सावध राहण्याचे उपदेशपाठ अनेकवार देत असे.

तिच्या अंगचें धाडस, कणखरपणा व उत्साह हे गुण अजूनहि जसेच्या तसे कायम होते. आपल्याला जें हक्कानें मिळायला पाहिजे तें मिळविण्यासाठीं ती अजूनहि तुरुंगाच्या अधिकाऱ्यांशीं कसोशीनें लढत असे. तुरुंगाच्या नियमांची व कायदेकानूंची तिनें कधीं क्षितीच बाळगली नाहीं. आपल्याला जें कांहीं लागेल तें मिळालेंच पाहिजे अशी तिची मागणी असे. कित्येक वेळां तुरुंगाच्या अधिकाऱ्यांना शरण यावेंच लागे; नाहींतर ती कांहींएक ऐकायलाच कबूल नसे. तुरुंगाच्या नियमांप्रमाणें म्हाताऱ्या बाईला ज्या ज्या शिक्षा देतां येत असत, त्या त्या सगळ्या ती हूं का चूं न करतां भोगत असे; पण आपला हेका तिनें कधींहि सोडला नाहीं. तसें पाहिलें तर तिच्या मागण्याहि फार नव्हत्या : तिला ' आतप ' तांदूळ लागे; कारण आमच्या देशांत विधवा स्त्रियांना दुसऱ्या कसल्याहि जातीचा तांदुळ चालत नाहीं. तिला ताज्या भाज्या लागत; नातेवाईकांना पाठविण्यासाठीं तिला एक पोस्टकार्ड लागे. किंवा त्याच तुरुंगांत दुसरीकडे ठेवलेल्या तिच्या मुलाची मुलाखत तिला हवी असे.

मी तिला रडतांना कधींहि पाहिलेलें नाहीं. मात्र मास्तरदा, निर्मलदा, प्रीति व रामकृष्णदा हे तिच्या घरीं राहिलेले लोक मागाहून मेले आणि त्यांच्या बद्दल ती ज्या ज्या वेळीं बोलूं लागे त्या त्या वेळीं तिच्या डोळ्यांतून आंसवांची धार लागे.

तुरुंगांत असतांनाच तिचा मुलगा क्षयरोगानें मेला. तो तिसऱ्या वर्गातला कैदी होता आणि त्याला कोलू घाणीवर सक्तीनें काम करायला लावीत असत. या कामाचा ताण आणि तिसऱ्या वर्गात मिळणारी एकंदर वाईट वागवणूक यांच्यापायीं तो खचला आणि अवघ्या दोनच महिन्याच्या आजारीपणानंतर हा गरीब बिचारा मुलगा ' गॅलपिंग टी. बी. ' ला बळी पडला.

मुलाच्या आईनें एकसारख्या अर्जविनंत्या करूनहि सहा महिनेपर्यंत तिला त्याची मुलाखत घ्यायला परवानगी मिळाली नाहीं. तुरुंगाचे अधिकारी खोट्या सबबी सांगत असत—ते सांगत असत कीं 'तुरुंगाच्या नियमांचा भंग केल्याबद्दल तुझ्या मुलाला अंधार कोठडीची शिक्षा झालेली आहे म्हणून तुला त्याच्या मुलाखतीची परवानगी देतां येत नाहीं. '

मुलगा मरावयाच्या अगोदर अवघा एक आठवडा आधीं तिला त्याची भेट घेऊं देण्यांत आली. पहारेकरी जेव्हां तिला ऑफिसांत येण्यासाठीं बोलवायला आला तेव्हां तिचा आनंद गगनांत मावेना. तिला अशी आशा वाटूं लागली कीं

आतां आपल्या शिक्षेची मुदत संपलेलीच आहे. तेव्हां आपल्याला सोडण्यापूर्वी आपली बदली करून आपल्याला चितगांवच्या तुरुंगांत पाठवितील.

तिच्या मुलाबद्दल आम्हांला कांहींच खबर कळलेली नव्हती. पण थोडक्याच वेळानें ती ऑफिसांतून परत येत असतांना तिचें मोठमोठ्यानें रडणें आम्हांला ऐकूं आलें. तिनें आम्हांला सांगितलें: " माझ्या मुलाची प्रकृति चिंताजनक आहे. कुणी जर त्याच्यासाठीं जामिन राहायला तयार असेल तर सरकार त्याला सोडायला कबूल आहे." मुलानें आपल्या मामाला तार करण्याबद्दल आईला सांगितलें होतें. कदाचित मामा येऊन आपल्याला सोडवून घेऊन जाईल अशी त्याला आशा होती. आपण तुरुंगांतून सुटलों कीं आपण अगदीं खडखडीत बरे होऊं असा त्यानें आईला निर्वाळा दिलेला होता.

मुलगा आणि आई दोघांजवळ प्रत्येकीं फक्त चार चार आणे होते. म्हणून दोघांचे मिळून आठ आणे झाले. पण तारेला खर्च कमींत कमी बारा आणे लागतो. तुरुंगाचे अधिकारी स्वतः तारेचा खर्च द्यावयाला तयार होईनात. आमचे पैसे ऑफिसांत ठेव म्हणून ठेवलेले होते, त्यांतूनहि तारेचा खर्च करावयास ते मंजुरी देईनात. त्यांनीं तिला फक्त एक पोस्टकार्ड दिलें आणि तें लिहून तिनें घरच्या माणसांना धाडलें. कार्डाचें कांहीं उत्तरच आलें नाहीं. कुणी भेटायलाहि आलें नाहीं. रोजच्या रोज 'माशिमा' मुलाकडे जाई; रोजच्या रोज मुलगा आशेनें आईला विचारत राही: 'मामा आले का ?' मरावयाच्या आदल्या दिवशीं त्यानें आईला सांगितलें: " कुणी येतंयसं दिसत नाहीं. मी मेल्यावर माझ्या मागं तुझा संभाळ करायला कुणीच नाहीं. तूं तुरुंगांतून सुटल्यावर नातेवाइकांकडे जाण्यांत कांहीं अर्थ नाहीं. मी मेल्यावर तूं इतरांशीं भांडूं नको हं." दुसऱ्या दिवशीं मुलगा मेल्याची बातमी आली. या बातमीनें तिची कंबरच खचली. तिला आयुष्यांतल्या धकाधकीचा अनुभव भरपूर होता. पण आपल्या संकटकाळीं आपलेच नातेवाईक आपल्याला सोडून जातील हा अनुभव तिला पूर्वीं कधींहि आलेला नव्हता.

पण थोड्याच दिवसांच्या अवधींत तिनें आपल्या मनाचें समाधान करून घेतलें. तिनें मला एका बाजूला बोलावून घेऊन हळूंच सांगितलें: " मी तुरुंगांतून सुटका झाल्यावर दुसरीकडे कुठं कुठं जाणार नाहीं; मी आपली स्वदेशीवाल्यांच्याच संगतींत राहीन."

' स्वदेशीवाल्यां ' विषयीं तिचा एक मजेशीर सिद्धांत होता. तिच्या मतें ते प्रामाणिक, धर्मनिष्ठ व विश्वासू लोक असून त्यांच्यावर संकट आणूं पाहाणारावर दसपट संकटें कोसळतील असें ती म्हणे. चितगांवचा ' डी. आय. बी. ,' इन्स्पेक्टर जोगेन्द्र गुप्ता, हा क्षयरोगानें मेला, ही बातमी मी तिला एके दिवशीं सांगितली. यावरून आपल्या सिद्धान्ताला बळकटी आल्याची तिची खात्री झाली.

राजबंद्यांना वाईट रीतीनें वागविण्याबद्दल हा जोगेन्द्र गुप्ताच फार कुप्रसिद्ध होता. त्यांतल्यात्यांत ढालघाट गांवीं क्रांतिकारकांना आश्रय देण्याच्या आरोपावरून शिक्षा झालेल्या कैद्यांचे तो जे हाल करी त्यांना तर सीमाच नव्हती. पोलिस खात्यांत नोकरी करणाऱ्या सगळ्या लोकांना व विषेशतः जोगेन्द्र गुप्ताला लवकर मरण येवो असें ' माशिमा ' देवा जवळ मागणें मागत असे. तुरुंगांत असतांनाचा तिचा हा कार्यक्रम मी कितीतरी वेळां पाहिला. या जोगेन्द्र गुप्तानेंच तिच्याकडून क्रांतिकारकांची सगळी माहिती काढून घेण्यासाठीं तिला मोठमोठ्या रकमांचें आमिष दाखविलें होतें. आणि असल्या आमिषांच्या व इतर मोहांच्या जोरावरच त्यानें तिच्या मुलीला माफीची साक्षीदार व्हावयाला तयार केलें होतें. तो मेला ही बातमी ऐकतांक्षणीं ती म्हणाली—" हें होणार हें मला ठाऊक होतंच. स्वदेशीवाल्यांवर जर संकट आणलं तर संकट आणणाऱ्याला रक्त ओकून मरण येणार; तें कालत्रयीं टळायचं नाहीं. "

मुलाच्या मृत्यूनंतर कांहीं महिन्यांनीं तिची सुटका झाली. मी तुरुंगांतच राहिल्यें. मागाहून मला अशी बातमी कळली : ती आपल्या गांवीं परत गेली पण तिथें तिचे नातेवाईक तिला नीट वागवीत नव्हते आणि चरितार्थासाठीं तिला अपरिमित कष्ट उपसावे लागत होते. तिनें आपल्या जुन्या घरजागेवर कशीबशी एक झोंपडी उभारलेली होती व तिथें ती भिक्षा मागून अगर गांवकऱ्यांच्या दानधर्मावर जगत होती.

मी तुरुंगांतून सुटून आल्यावर ती मला भेटावयाला चितगांवीं आली. तिनें आपल्या दुर्दशेची कहाणी मला सांगितली आणि विचारलें : " मला एखादं काम द्याल का ? म्हणजे निदान माझ्या एक वेळच्या जेवणाची तरी सोय होईल." मला तिला आश्वासन कसलेंच देतां आलें नाहीं. पण मी आमच्या जिल्ह्यांतल्या कॉम्रेड्सनां मात्र सांगून ठेवलें कीं हिच्यासाठीं आपण कांहींतरी केलेंच पाहिजे; हिनें पूर्वीं केलेली बहुमोल कामगिरी आपल्याला विसरतां येणारच नाहीं.

आम्ही तिला अधूनमधून मदत करीत असूं. मी तिच्या खेड्यावर तिला

भेटावयास जात असें. इतर लोक तिला किती वाईट रीतीनें वागवीत असत याच्या हकीकती तिच्या तोंडून ऐकावयाला मिळत. तिच्या या हालअपेष्टांच्या बाबतींतील आमच्या स्वतःच्या बेपर्वाईची मला शरम वाटे व त्यामुळें मी अस्वस्थ होत असें.

मग ढालघाटला नारी समितीची एक शाखा सुरू झाली आणि 'माशिमा' तिच्यांत दाखल झाली. पण नारी समितीला तिच्या रोजच्या जेवणाची तरतूद करतां येईना. तिची स्थिती इतकी खालावलेली होती कीं तिला सुद्धां घांसभर अन्नासाठीं दुष्काळांतल्या अन्नछत्रांत यावें लागत असे. पण मेहनतीनें मिळविल्या-शिवाय कांहींहि खावयाचें नाहीं असा तिचा निर्धार होता. आपले हातपाय धड आहेत तोंवर आपण काम करणार असा तिचा बाणा होता. म्हणून दररोज त्या अन्नछत्राभोंवतीं जमलेल्या उपाशी लोकांचा स्वयंपाक करण्याचें काम ती स्वतःच करूं लागली.

अन्नछत्र बंद झाल्यावर ती ढालघाट येथें नारीसमितीनें चालविलेल्या बाल दुग्धमंदिरांत येऊं लागली. तिथें सुद्धां ती आतां स्वयंपाक करते आणि या मजुरीच्या मोबदल्यात अन्न घेते.

आमच्या कार्याला तिचा पाठिंबा असतो. तिला कम्युनिझमचें कांहींहि ज्ञान नाहीं. तिला येवढेंच ठाऊक आहे कीं आमचें आमच्या देशावर प्रेम आहे, आम्ही आमच्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं झगडलेलों आहोंत, सर्वांच्या सुखशांती-साठीं आम्ही लढलों आहोंत. कम्युनिझम अगर दहशतवाद यांचा तिला अर्थहि कळत नाहीं. पण जनतेची सेवा करणाऱ्यांची बाजू ती आदरून घेते.

अशा रीतीनें आम्हीं तिला पुन्हां आमच्यांत परत आणली. तिच्या बाबतींत आम्ही हलगर्जीपणा केला व बेपर्वाई दर्शविली तरीहि ती कांहीं आमच्यापासून दूर झाली नाहीं. जनतेवर भक्ति असलेल्या लोकांच्या अंगीं आढळणारें नैसर्गिक देशप्रेम तिच्या हृदयांत भरपूर आहे. आणि याचा प्रत्यय आम्हांला पदोंपदीं येत असतो.

———

पाने-११४
८८९६५
वर्ष-६४
किं-१.४०

# सुहासिनी गांगुली

सन १९२९ साली मी मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यें आणि बेथ्यून कॉलेजांत अभ्यास करण्यासाठीं कलकत्त्याला आल्यें. तिथें दर वर्षी 'कॉलेज डे' साजरा करायची प्रथा असे. कॉलेजांतल्या माजी व चालू विद्यार्थ्यांचें संमेलन या दिवशीं भरत असे आणि सगळ्यांचाच तरुणपणींचा आनंद व उत्साह जागृत होई व त्यांना कॉलेजबद्दल अभिमान वाटे.

त्या वर्षीच्या 'कॉलेज डे' प्रसंगीं इतर अनेक निरनिराळ्या व नवनवीन विद्यार्थ्यांच्या मेळाव्यांत मला पुतुदी ( सुहासिनी गांगुली ) प्रथम दिसली. ती उंच व सणसणीत असून तिच्या चर्येत इतरांवर छाप पाडण्याचा गुण होता. तिनें काळ्या कांठाची साधी साडी नेसलेली होती. ती दिसायला एखादी प्रसिद्ध राजकीय कार्यकर्ती दिसते अशी माझी समजूत झाली. ती नृपेन्द्र बानर्जी यांची चुलतबहीण आहे असें मला सांगण्यांत आलें. नृपेन्द्र बानर्जी हे चितगांवच्या सरकारी कॉलेजचे व्हाइस-प्रिन्सिपॉल होते. १९२१ च्या चळवळींत त्यांनीं आपल्या सरकारी नोकरीचा राजीनामा दिला होता आणि चितगांवच्या तरुण मंडळींत त्यांच्या नांवाचा गौरव होत असे. या शिवाय १९२९च्या मे महिन्यांत चितगांव शहरीं भरलेल्या राजकीय परिषदेचे ते अध्यक्ष होते. या परिषदेबरोबर विद्यार्थ्यांचा वक्तृत्वसमारंभ झाला, त्यांत मला विशेष चांगलें बोलतां आलें नाहीं तरी देखील नृपेन्द्रजींनीं मला एक 'शिफारस-पत्र' दिलें होतें. म्हणून मला त्यांची विशेष आठवण राहिलेली होती. अर्थात् पुतुदीबद्दल मला अगदीं पहिल्या पासूनच आदर वाटत असे आणि त्या दिवशींच्या संमेलनांत मी तिची ओळख करून घेतली.

यानंतर, विद्यार्थिनींच्या संस्थांच्या कामकाजासंबंधांत मी पुतुदीला कित्येक वेळां भेटत असे. ती भेटली कीं माझ्याशीं प्रेमानें बोले व माझ्या अभ्यासाबद्दल विचारपूस करी, वसतिगृहांत व कलकत्त्यांत मला एकंदरींत कसें काय करमतें याचीहि चौकशी करी. मी घर सोडून इतक्या दूर प्रथमच वसतिगृहांत राहायला आल्यें होत्यें आणि कलकत्त्यांतहि मी नवखीच होत्यें. म्हणून तिनें माझ्या बारीक सारीक गोष्टींची प्रेमानें विचारपूस केलेली मला फार

आवडत असे. तिच्याशीं बोलतांना आपण आपल्या थोरल्या 'दिदी'शीं गप्पा मारणारी धाकटी बहीण आहोंत असें मला वाटे.

चितगांवच्या शस्त्रागारावर क्रांतिकारकांचा हल्ला झाला तेव्हां आम्हां सगळ्या जणींमध्यें खूपच खळबळ उडाली मग पुतुदी मात्र अगदीं पहिल्यासारखी शांत ती शांतच—अगोदरच्या शिरस्त्यानुसार अधून मधून आम्हांला भेटायला यायचा क्रम तिनें मुळींच सोडला नव्हता. तिच्या वागणुकींत दिसण्याजोगा फरक झालेला नव्हता. मात्र कधीं कधीं ती चितगांवबद्दल विचारपूस करी, तिथल्या क्रांतिकारकांची चौकशी करी. आणि मला अनेक प्रकारच्या मरोरंजक हकीकती सांगून ती माझें मन आनंदी ठेवण्याची खटपट करी. चितगांवबद्दल तिला पुष्कळच माहिती आहे असें मला आढळून आलें. मी त्या वेळीं मनाशीं ह्मणत असें—'पुतुदीची मी एकटीच कांहीं लाडकी नाहीं. सगळेच चितगांवचे क्रांतिकारक तिचे लाडके आहेत एकूण.' मला थोडीशी घरची ओढ लागत असे. अशा वेळीं हीहि आम्हां चितगांववाल्या मुलीं-पैकींच आहे असें मला वाटत असे.

मग एके दिवशीं सकाळीं आम्हांला बातमी कळली कीं गणेश घोष, आनंदा गुप्ता, आणि शस्त्रागारावरील हल्ल्याचे इतर पुढारी यांना चंद्रनगर येथें अटक करण्यांत आली. या धरपकडीच्या अगोदर पोलिसांबरोबर झालेल्या चकमकींत जीवन घोशाल ठार झाला आणि या क्रांतिकारकांना आश्रय दिल्याबद्दल शशधर आचार्य व त्याची पत्नी सुहासिनी देवी यांना अटक करण्यांत आली.

त्या वेळीं मी चितगांवला होत्यें आणि ही 'सुहासिनी देवी' म्हणजेच आमची पुतुदी, अशी अफवा माझ्या कानांवर आली. सी. आय. डी. अधिकाऱ्यांनीं माहिती काढायसाठीं पुतुदीचा भयंकर छळ केला अशीहि दाट वदंता होती. त्यांनीं तिच्या बोटांच्या नखांत सुया टोंचल्या आणि इतरहि अनेक प्रकारें हाल हाल केले. तिला म्हणे या छळापायीं वेड सुद्धां लागलें पण तरी देखील तिनें त्यांना कसलीहि दाद लागूं दिली नाहीं. अशा रीतीनें दोन महिने छळल्या-नंतर सुद्धां तिच्याकडून कांहींच बातमी काढतां येईना म्हणून तिला सोडून देण्यांत आलें असें माझ्या कानांवर आलें.

१९३१ च्या फेब्रुवारी अगर मार्च महिन्यांत मी आमच्या क्रांतिकारक कार्याच्या निमित्तानें कलकत्त्याला आल्यें होत्यें. तिथें एके दिवशी संध्याकाळीं 'लेडीज पार्क' मध्यें अनपेक्षितपणें पुतुदीची व माझी दृष्टादृष्ट झाली. पहिल्या प्रथम मी स्तंभितच झाल्यें आणि काय बोलावें हेंच मला सुचेना. मग माझ्या लक्षांत आलें कीं

मी कलकत्त्याला आल्याचें पुतुदीनें कुणाकडून तरी ऐकलें असेल आणि माझी गांठ पडेल या आशेनेंच ती पार्कमध्यें आली असावी. कुणालाहि संशय येणार नाहीं अशा रीतीनें क्रांतिकारक मुलींना एकमेकींशीं बोलत बसतां येईल अशीच ती जागा होती. मग मी माझ्या मनांतले सगळे प्रश्न तिला विचारले. तिच्या बद्दल मी कितीतरी अफवा ऐकलेल्या होत्या आणि त्यामुळें अनेक बाबतींत मला जबरदस्त शंका वाटत होत्या. त्या सगळ्या शंका मी तिच्यापुढें मांडल्या. माझा पहिला प्रश्न असा होताः "मी असं ऐकलं कीं तुझं डोकं फिरलं होतं म्हणे ?" पुतुदीचें शशधर आचार्यांशीं लग्न झालें आहे ही बातमी खरी नसेल असें मला वाटलें होतें. पण तिच्या भांगांत शेंदूर व हातांत लोखंडी कंकण हीं सौभाग्यचिन्हें मला दिसलीं. म्हणून मी तिला विचारलें: "तूं लग्न केव्हां करून घेतलंस ? मला वाटलं तुझ्या लग्नाची ही सगळी बातमी बनावट असेल." एका बाबतींत मात्र माझी खात्री होती: पोलिसांनीं तिला क्रूरपणें छळलें असेल याबद्दल मला शंका नव्हती. म्हणून या संबंधांत मी तिला कांहींएक विचारलें नाहीं. फक्त तिचीं नखें तुटलेलीं बोटें मात्र मी हातांत घेतलीं.

पुतुदी हंसली व किंचित उपरोधिक स्वरांत म्हणाली, 'मी लग्न करून घेतलंय हें तुला ठाऊक नव्हतं ? अन् पोलिसांनीं माझा छळ केला अगर माझं डोकं फिरलं हें तुला कुणीं सांगितलं ?' माझ्या मनाचा अधिकच गोंधळ झाला आणि मी बेचैन झाल्यें. काय काय आहे आणि काय काय नाहीं याचा मला उलगडाच होईना. गणेश घोष यांना व इतरांना तुरुंगांत नेऊन देण्यासाठीं तिनें कांहीं पत्रें दिलीं तीं घेऊन मी तिथून निघून आल्यें.

१९३३ सालीं मला शिक्षा झाली आणि मला हिजलीच्या खास तुरुंगांत पाठविण्यांत आलें. दुसऱ्या वर्गातल्या स्त्री-राजबंद्यांसाठीं हा तुरुंग राखून ठेवलेला होता. पहांटे तिथें पोंचल्यावर मी तुरुंगाच्या फाटकांतून आंत गेल्यें तों तिथल्या राजबंदींमध्यें मला किती तरी जुन्या ओळखीच्या स्त्रिया भेटल्या. बराकींच्या वाटेवरच मी त्यांच्याशीं गप्पा मारायला सुरवातहि केली. मग पुतुदी आली— पहिल्यासारखीच हंसतमुख. तिनें सांगितलें कीं बिनादी, शान्ति व इतर मुली माझी वाटच पहात आहेत. [ बिनादी ( वीणा दास ) हिला कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीदान प्रसंगीं बंगालचा गव्हर्नर स्टॅन्ले जॅक्सन याच्या खुनाचा प्रयत्न केल्याबद्दल नऊ वर्षांची शिक्षा झालेली होती. आणि शान्तीला कोमिल्ला येथील खुनाच्या खटल्यांत जन्मठेप मिळालेली होती. त्या वेळीं या दोघीहि

हिजली जेलमध्येंच होत्या. आणि १९३१ सालीं पुतुदीलाहि इथेंच स्थानबद्ध करून ठेवण्यांत आलें. ]

तुरुंगांतील एकंदर वातावरण पुतुदीनें मला थोडक्यांत समजावून सांगितलें : स्थानबद्ध राजबंद्यांचें एकमेकींशीं वर्तन कसें आहे, शिक्षा झालेल्या राजबंद्यांशीं त्यांचें वर्तन कसें आहे, त्यांना एकमेकींविषयीं काय वाटतें, वगैरे वगैरे. मग ती म्हणाली : ' तूं इथं नवखीच आहेस, अन् तुला कदाचित कांहीं अडचणी येतील, म्हणून हा सगळा खुलासा मी तुझ्याजवळ केला. इथल्या वेगवेगळ्या गटांच्या घोंटाळ्यांत तूं सांपडूं नयेस अशी माझी इच्छा आहे. सगळ्या परिस्थितीचा शांत मनानं नीट विचार कर अन् मग आपल्याला काय करायचंय तें तुझं तूंच ठरव. चितगांवचं नांव राखायची जबाबदारी आहे तुझ्यावर. " पुतुदी व इन्दुदी ( अनन्त सिंहाची बहीण ) यांच्या तोंडून मी असें ऐकलें होतें कीं अनंतदा, गणेशदा आणि चितगांवच्या क्रांतिकारकांच्या एकंदर गटानें तुरुंगांत सुद्धां आपल्या वैयक्तिक व राजकीय वर्तनानें सर्वांचा आदर संपादन केलेला आहे.

पुतुदी आम्हां सगळ्याच जणींना 'दिदी'च्या म्हणजे थोरल्या बहिणीच्या जागीं होती. ती आमच्या सुखसोईंची व तब्बेतीची अत्यंत कसोशीनें काळजी घेई. त्या वेळीं आम्हीहि लहानच होतों. आम्ही अगदींच बेजबाबदारपणें वागत असूं. आम्हाला घराची ओढहि लागलेली असे. आणि आम्ही आमच्या सगळ्या तक्रारी व मागण्या घेऊन पुतुदीला भंडावून सोडत असूं. आमच्या सगळ्या माकडचेष्टा ती खपवून घेई आणि वर म्हणे : " तुम्ही लहान मुली जर आंबट तोंडं करून कुढत बसलांत तर आम्हांला अगदींच एकलकोंडं वाटेल. "

पुतुदीला तिच्या फरारी जीवनांतल्या हकीकती सांगायला लावायची एकहि संधि मी सोडत नसे. गणेशदा व त्यांचे इतर सहकारी चंद्रनगर येथील गुप्त स्थळीं कसे राहात असत, काय काम करीत असत, ते कसे पकडले गेले, या साऱ्या गोष्टी ती सांगत असे. त्यांच्यासाठीं आपण स्वयंपाक कसा करीत असूं हेंहि ती सांगे. अशाच गप्पा सांगतां सांगतां एके दिवशीं ती म्हणाली: " इथं हिजलीच्या तुरुंगांत आपल्याला मटण मिळतं तेव्हां तें मला खावंसं वाटतच नाहीं. आमच्या चंद्रनगरच्या गुप्त जागीं एक कॉम्रेड राहात होता त्याची मला अशा वेळीं आठवण होते. आम्हांला अटक व्हायच्या थोडंसंच आधीं त्याला एक दिवस मटणाची मेजवानी हवी झाली. महिना अखेर जवळ आलेली होती म्हणून मी त्याला पुढच्या

महिन्याची खर्ची माझ्या हातीं पडेतोंवर धीर धरायला सांगितलं. पण महिना अखेरीलाच आम्हाला अटक झाली अन् त्याला दिलेलं वचन पूर्ण करायची संधि मला कधींच मिळाली नाहीं." हा मटग मागणारा कॉम्रेड म्हणजे जीवन घोषाल. पोलिसांनीं त्यांच्या गुप्त ठिकाणावर छापा घातला त्यांत तो ठार झाला.

हिजली कँपांत पुतुदी म्हणजे आमचा एक मोठाच आधार होता. तिचें एकेक बोलणें आम्ही ऐकूं लागलों म्हणजे आम्हांला असें वाटे कीं ही सगळ्या क्रांतिकारकांची शाहणी, शांत व अनुभवी अशी थोरली बहीण असून ती आपल्या सारख्या बहीण भावांबद्दलच नितांत प्रेमानें व सहानुभूतीनें बोलत आहे.

पण हिजली कँपांत देखील तिला स्वतःचें अंतःकरण उघडें करून दाखवायला लावण्यांत मला यश आलें नाहीं. स्वतःच्या अडीअडचणींची वाटाघाट इतरांबरोबर करणें तिला कधींच आवडत नसे. आपल्या अडचणींना आपण तोंड द्यायचें व त्यांचा निरास आपला आपणच करायचा असा तिचा बाणा असे.

कुणी तरी फारच आग्रहानें तिच्या लग्नाच्या बातमीबद्दल जर बोलणें काढलेंच तर मात्र ती माझ्याजवळ सांगे: "कल्पना! अशी अगदीं लहान मुलासारखी कशी ग तुझी समजूत? माझं लग्न झालेलं आहे असं मी एकदां सांगितल्यावर मग मी विवाहित स्त्रीसारखंच नको का वागायला?"

मला फक्त तीनच महिने पुतुदीच्या सहवासांत राहायला मिळालें— मागाहून माझी रवानगी राजशाही जेलमध्यें करण्यांत आली.

१९३९ सालीं मी तुरुंगांतून सुटल्यावर पुन्हां तिची माझी भेट झाली. याच्या एक वर्ष अगोदर तिची सुटका झालेली होती आणि तिची पूर्वींचीच वृत्ति अजूनहि कायम होती. आतां ती कलकत्ता कॉर्पोरेशनच्या एका शाळेंत मास्तरीण होती. म्हातारी आई व एक बहीण यांचा संभाळ ती करीत होती.

आमच्या दहशतवादी क्रांतिकारक तरुण मंडळींपैकीं कांहींजण मला येऊन भेटत नि सांगत: "कल्पनादी! तूं आतां पुन्हां पहिल्या सारखीच आमच्या बरोबर काम करायला येणार ना? तूं येणार अशी आमची खात्री आहेच म्हणा!" दुसरे कुणी असेंहि सांगत: "अनंतदा व गणेशदा यांचीं पूर्वींचींच मतं अजूनहि तशींच कायम आहेत हें ठाऊक आहे ना तुला? आपल्या चितगांवच्या गटापैकीं फक्त दोघे तिघेच काय ते बंडखोर निघाले व कम्युनिस्ट झाले, अन् त्यांना अनंतदानं हांकलून पण दिलं. तूं चितगांव गटाशीं इमान राखून आम्हांलाच पाठिंबा देणार

ना ?" त्यांच्यांतलाच एकजण तर म्हणालाः "कुठल्या गटांत सामील व्हायचं हें अजूनहि तूं ठरवलं नाहींस ही केवढी लाजिरवाणी गोष्ट ! तूं तुरुंगात सहा वर्षं राहून केलंस तरी काय ? (पण मागाहून मलाहि कळलें कीं अनंतदा स्वतःच कम्युनिस्ट झाला आहे) अनंतसिंह व त्याचे सहकारी देखील कम्युनिस्ट झाले आहेत म्हणे. पण त्यांनीं लेखी मात्र कांहींच कळविलेलं नाहीं. तें कांहींहि असो. तूं आम्हांलाच येऊन मिळणार याबद्दल माझी तर खात्रीच आहे मुळीं."

मी सगळ्यांना एकच उत्तर दिलेंः "मला काम करायला तरी लागूं द्या—म्हणजे मग मी कशा प्रकारचं काम करत्यें व कुणाबरोबर करत्यें हें तुमचं तुम्हांलाच दिसेल." मला मोठीच काळजी लागून राहिलीः अनंतसिंहाविरुद्ध 'बंड' करणारे असे हे 'चितगांव गटांतले' लोक आहेत तरी कोण कोण ? आणि तिकडे तर म्हणे अनंतदा स्वतःच कम्युनिस्ट झालेला आहे—आणि त्यानें लेखी मात्र कांहींच कळविलेलें नाहीं ! आणि मी "कोणत्या पक्षांत" सामील होणार याबद्दल येवढा गोंधळ कशाला माजवायला हवा ? तुरुंगांत असतांना असले प्रश्न मला चुकून सुद्धां कधीं सुचले नव्हते—मला येवढेंच ठाऊक होतें कीं बाहेर पडल्यावर आपल्याला दुप्पट उत्साहानें पुन्हां काम चालू करावें लागेल आणि पहिल्यापेक्षां जास्त काळजीपूर्वक व जास्त कष्टाचें काम करावें लागेल.

या वेळीं देखील पुतुदीच पुन्हां माझ्या मदतीला धांवून आली. तिनें सांगितलें : "अनेक प्रकारचे लोक तुला आपापल्या पक्षोपपक्षांच्या कलागतींत ओढायला बघतील. तुला भलभलत्या गोष्टी सांगतील. अनंतसिंह व त्याचे सहकारी हे पूर्ण विचाराअंतीं कम्युनिस्ट झाले आहेत. कुणीहि 'बंड' केलेलं नाहीं. सगळ्यांत उत्तम मार्ग ह्मणजे सर्व गोष्टी तूं स्वतःच्या डोळ्यांनीं बघून घे, अभ्यास कर, अन् मग तुझा तूंच काय तो निश्चय कर. अनंतदा व इतर सगळी मंडळी यांच्याबद्दलची एकंदर बातमी झुमकूकडून तुला मिळेल."

झुमकू हा माझा चुलत भाऊ—चितगांव शस्त्रागार हल्ल्याच्या खटल्यांत त्याला जन्मठेपीची शिक्षा झालेली होती. पण त्याचें वय अगदींच लहान होतें म्हणून आणखी दोघांसमवेत त्याला १९३९ सालींच सोडण्यांत आलें.

मग मी चितगांवला परत गेल्यें व कम्युनिस्ट पार्टी बरोबर कार्य सुरू केलें. पुतुदीला आपला बराचसा वेळ घरच्या उद्योगांत खर्चावा लागत होता, म्हणून तिला पार्टींत दाखल होतां येईना. पार्टीची एक सन्माननीय दोस्त या नात्यानें ती यथाशक्ति सर्व प्रकारची मदत करूं लागली. आम्ही पहिल्या प्रथम जेव्हां

कम्युनिस्ट पार्टींत आलों तेव्हां आम्ही व आमचे सहकारी मिळून एका लहानशा गटांत गुरफटून गेलों. पण पुतुदीनें बाहेरच्या जगांतील सर्व प्रकारच्या लोकांशीं निकटचे स्नेहसंबंध कायम ठेवले. सगळ्या राजकीय गटांतील कार्यकर्त्यांशीं तिनें स्नेहाचीं नातीं कायम राखलीं. १९४२ च्या ऑगस्ट महिन्यांत तिला पुन्हां अटक झाली. पोलिसांनीं तिच्या घराची झडती घेतली तेव्हां त्यांना एका कॉंग्रेस-कार्यकर्त्याचें पत्र तिच्याकडे मिळालें.

तीन वर्षांनंतर पुतुदी सुटून आली आहे. या मुदतींत चितगांवच्या जीवनांत घडून आलेल्या भयंकर उलथापालथी प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय आकळतां येणें शक्य नाहीं. जिकडे तिकडे निराशेचें साम्राज्य पसरलें आहे. सभ्य वर्तनाचे सगळे नियम धाब्यावर बसविण्यांत आले आहेत. समाजाच्या सर्व थरांतल्या स्त्रिया लाजिरवाणें जिणें जगत आहेत. चितगांवच्या स्त्री जातीचें दुःखी व पतित जीवन पुतुदीच्या विशाल हृदयाला चरका बसविल्याखेरीज राहणार नाहीं. चितगांवला त्याचें जुनें वैभव परत मिळवून देण्यासाठीं आम्हीं चालविलेल्या लढ्यांत तिच्या मनाचा थोरपणा व दिलदारपणा, तिचा अथांग प्रेमळपणा व सर्व दुःखांवर मात करणारा तिचा शांतपणा आम्हांला प्रचंड सामर्थ्य मिळवून दिल्याखेरीज राहणार नाहीं.

---

# प्रीति

पहारताली रेल्वे स्टेशनच्या नजीकच रेल्वे अधिकाऱ्यांचा एक क्लब आहे. दर शनिवारीं रात्रीला रेल्वेचे गोरे अधिकारी आपल्या बायकांसह नाचासाठीं आणि पिण्यासाठीं तिथें जमत असत.

१९३२ च्या २४ सप्टेंबर रोजीं शनिवार होता आणि गोरे अधिकारी नित्याप्रमाणें मजा करण्यासाठी जमले होते. नाच, गाणें, पिणें आणि खिदळणें चालू होतें. परंतु ९ वाजण्याच्या सुमारास हें हसणे खिदळणें एकाएकीं बंद पडलें आणि त्या ऐवजी बॉंबसच्या स्फोटांचा आणि गोळीबाराचा आवाज ऐकूं येऊं लागला. आतांपर्यंत मजा मारीत असलेले गोरे अधिकारी खिडक्यांतून उड्या मारून पळण्याचा प्रयत्न करूं लागले, परंतु त्यांना घाबरून खिडक्यांपासून मागें परतावें लागलें. पंधरा मिनिटेपर्यंत हा प्रकार चालू होता, त्यानंतर पुन्हां सर्वत्र शांतता झाली. क्लबमध्यें जखमी होऊन पडलेल्यांचें विव्हळणें ऐकूं येई तेवढेंच काय ते.

आठ क्रांतिकारकांनीं प्रीतीच्या नेतृत्वाखालीं या क्लबवर हल्ला चढविला होता. हल्ला चढविणारांपैकीं सर्वजण सुखरूप परत आले. कुणाला एवढासा ओरखडा सुद्धां आला नाहीं. परत आली नाहीं काय ती प्रीतीच ! क्लबपासून केवळ १० यार्डांच्या अंतरावरच तिचें प्रेत सांपडलें. तिने पोटॅशियम सायनाईड हें जलाल विष घेतलें होतें. बॉंबच्या तुकड्यानें तिच्या छातीवर भयंकर जखम झाली होती आणि त्यांतून वाहणाऱ्या रक्तानें तिचा शर्ट पार भिजून गेला होता.

आजपर्यंत पुष्कळ पुरुष देशासाठीं फांसावर चढलें आहेत. पुष्कळ पुरुषांनीं लढतां लढतां रणांगणावर देह ठेवले आहेत. परंतु अशा प्रकारच्या लढाईत भाग घेऊन आपले प्राण देशासाठीं अर्पण करणारी प्रीति वद्दादार ही पहिलीच स्त्री होय. १९३० मध्यें कांहीं तरुणी क्रांतिकारक चळवळींत सामील झाल्या होत्या, परंतु त्या वेळेपर्यंत तरी त्यांनीं प्रत्यक्षपणें कुठल्याहि लढाईंत भाग घेतल्याचें माहित नाहीं.

प्रीतीनें आपले प्राण अर्पण केल्यामुळें हिंदी स्त्रियासुद्धां पुरुषांप्रमाणेंच आपल्या देशासाठीं वाटेल तो स्वार्थत्याग आणि वाटेल तें कठीण कार्य करूं

शकतात अशी जनतेला प्रथमच स्पष्ट जाणीव झाली. प्रीतीच्या मृत्यूनें त्यांची याबद्दल खात्री पटवून दिली. दहशतवाद्यांनीं स्वीकारलेल्या मार्गावर कांहीं लोक टीका करीत असतात, त्यांचा मार्ग चुकीचा होता असें म्हणतात. पण प्रीतीचा मार्ग चुकीचा होता कीं बरोबर होता याची चितगांवच्या जनतेला पर्वा नाहीं. देशासाठीं आपले प्राणसुद्धां अर्पण करणारी ती आपलीच शूर वीर मुलगी होती असेंच ते मानतात. तिच्याबद्दल बोलतांना 'प्रीतीनें मरण पत्करलें, पण ती पोलिसच्या हातीं कांहीं लागली नाहीं,' असे आदराचे उद्गारच ते नेहमीं काढीत असतात.

पहारतालीच्या हल्ल्याच्या वेळीं मी तुरुंगांत होत्यें. केवळ एक आठवड्यापूर्वींच मला पकडण्यांत आलें होतें. पहारतालीकडे पुरुषवेषांत जात असतां मी त्यांच्या हातीं सांपडल्यें. मी तिकडे कां जात होते याचें गूढ उकलता उकलता त्यांची अक्कल गुंग झाली होती. मी ज्या परिस्थितींत त्यांच्या हातांत सांपडल्यें तीमुळें त्यांचा संशय जागृत झाला होता, परंतु माझ्याविरुद्ध कोणताहि निश्चित असा आरोप कांहीं त्यांना करता येईना.

२५ सप्टेंबरला सकाळीं पोलिसखात्याच्या स्पेशल ब्रँचचा इन्स्पेक्टर माझ्याकडे आला आणि म्हणाला, " नशीब ! अगदीं ऐन वेळेला आम्ही तुला वाचवूं शकलों." तो काय म्हणतो तेच मला समजेना. थोड्या वेळाने दुसरा एक अधिकारी आला आणि म्हणूं लागला, " तुझ्यासारख्या मुलीला आम्ही मृत्यूच्या दाढेंतून वाचवुं शकलों हें आमचें मोठें भाग्यच समजलें पाहिजे." पुन्हा तेंच ! त्यांना काय सांगायचें होतें तें कुणीच स्पष्ट बोलेना. आणि मी तर काय झालें तें कळावें म्हणून अगदीं उतावीळ झाल्यें होत्यें. अखेर स्पेशल ब्रँचच्या इन्स्पेक्टरनें खरी गोष्ट सांगितली. तो म्हणाला, " प्रीति काल मरण पावली. तिनें पहारताली क्लबवर छाप घातला आणि नंतर पोटॅशियम सायनाईड घेतलें. नशीब आमचें की आम्ही तुला अगोदरच पकडलें. नाहीं तर तूं सुद्धां त्याच मार्गानें गेली असतीस. प्रीतीच पोशाख सुद्धां अगदीं तुझ्यासारखाच होता– "

इन्स्पेक्टर सारखा बडबडत होता. मला दुखविण्याचा त्याचा उद्देश नसला तरी मला त्याची ती बडबड असह्य होऊं लागली. मी आपल्या कोठडींत येऊन पडल्यें. प्रीति माझी जिवलग मैत्रीण होती. सूर्य सेनच्या क्रांतिकारक पक्षांत सामील झालेल्या चार मुलींपैकीं आम्ही दोघीच राहिलों होतों. बाकीच्या केव्हांच पार्टी सोडून गेल्या होत्या.

मला पकडलें त्याच्या आदल्याच रात्रीं आम्हां दोघींनाहि बरोबरच पहारतालीच्या लढ्यांत भाग घ्यावयाचा आहे अशी बातमी मला कळली होती आणि

त्या प्रमाणें सर्व तयारी करून घरून निघण्याची मला सूचना मिळाली होती. मला पुन्हां घरीं परतण्याचा प्रसंग येऊं नये म्हणूनच ही सूचना दिलेली होती. प्रीतीनें माझ्या अगोदरच घर सोडलें होतें व जवळ जवळ दीड महिनापर्यंत ती अज्ञातवासांत होती. त्या दीड महिन्याच्या काळानंतर तिची माझी पहिली भेट झाली ती याच दिवशीं.

आम्ही समुद्रकिनाऱ्यावर गेलों आणि कांहीं वेळ निशाण मारण्याची प्रॅक्टिस केली. त्यानंतर कांहीं वेळ गाणीं गायल्यावर आम्ही परतलों. फुतुदा आमचा पुढारी होता. प्रत्यक्ष लढ्यांत भाग घेण्यापूर्वी पुनः एकदा मला घरीं जाणें भाग आहे असें त्यानें सांगितलें. कारण पहारताली क्लबवर घालावयाच्या छाप्याची पूर्वतयारी अजून पूर्ण व्हावयाची होती व त्याला आणखी कांहीं दिवस तरी लागले असते. तेवढ्या काळांत मी अदृश्य झाल्यें आहे असें जर पोलिसला आढळून आलें असतें तर त्यांना आमचा संशय आला असता. मला घर सोडून जाण्याला बंदी करण्यांत आलेली होती आणि पोलिसची माझ्यावर सारखी नजर होती. अर्थातच माझें अदृश्य होणें फारच धोक्याचें होतें.

फुतुदाच्या या म्हणण्याला प्रीतीनेंहि दुजोरा दिला आणि त्यामुळें मी तिच्यावर फार चिडल्यें. माझी घरीं परतण्याची इच्छा नव्हती. घरीं परतल्यें तर मी पकडली जाईन आणि मग मला लढ्यांत भाग घेतां येणार नाहीं याबद्दल माझी पक्की खात्री होती. गेल्या कांहीं दिवसांपासून स्पेशल ब्रँचचा इन्स्पेक्टर रोज घरीं येऊन मी घरीं आहे कीं नाहीं याची चौकशी करीत असे. मी घरीं नाहीं हें आतांपर्यंत त्याच्या खात्रीनें लक्ष्यांत आलें असेल आणि बंदीहुकुम मोडला म्हणून मला पकडण्यासाठीं तो माझ्या शोधांत असेल अशी माझी खात्री होती. शेवटीं मी घरीं जावें आणि जर तसाच कांही धोका आढळला तर तसेंच पुन्हां परत यावें असा निर्णय घेण्यांत आला. मला एक पिस्तुलहि देण्यांत आलें. पोलिसांनीं पकडण्याचा प्रयत्न केलाच तर त्याचा उपयोग करून आपली वाट मोकळी करून घ्यावी असें ठरलें. प्रीति मला पोंचविण्यासाठीं बरीच दूरपर्यंत आली. वाटेंत ती एखाद्या आजीबाईप्रमाणें मला उपदेश करीत होती. तसें पाहिलें तर ती माझ्यापेक्षां दोनच वर्षांनीं मोठी होती आणि आम्ही दोघीहि त्या मानानें अगदींच कोंवळ्या पोरी होतों. असें असतांना तिनें वडिलकीचा आव आणावा याची मला फार चीड आली.

१७ सप्टेंबरला सकाळीं मी घराजवळ पोंहचतांच व्हरांड्यांत पोलिस माझी

वाटच पाहात आहेत असें मला आढळून आलें. मी तावडतोब परत फिरल्यें त्यावेळीं जरीं मी सुटल्यें तरी त्याच दिवशीं रात्रीं प्रीतीच्या लपण्याच्या जागीं पोंहचण्याचा प्रयत्न करीत असतां मला पकडण्यांत आलें. आतां तर मी प्रीतीवर खूपच चिडल्यें होत्यें. तीं माझी जिवलग मैत्रीण होती, तिनें जर मला निरोप पोंहचविण्याची व्यवस्था केली असती तर मी अशी जाळ्यांत सांपडल्यें नसत्यें.

त्यानंतर सात दिवसपर्यंत हेच विचार माझ्या डोक्यांत घोळत होते. मी प्रीतीला क्षमा करायला मुळींच तयार नव्हत्यें. मला वाटत होतें कीं तिनें मला दगा दिला. आणि आतां–एकाएकीं तिच्या मृत्यूची बातमी माझ्या कानावर आदळली. मी कल्पनासुद्धां करूं शकत नव्हत्यें अशा गोष्टीची. मी जर त्या वेळीं तिच्याबरोबर असत्यें तर मी तिला कधींच आत्मघात करूं दिला नसता.

कांहीं दिवसांनंतर मास्तरदांनीं मला सांगितलें कीं बायकासुद्धां पुरुषांप्रमाणें आपल्या देशासाठीं लढूं शकतात आणि मरूं शकतात हें दाखविण्यासाठीं प्रीतीनें जीव दिला. परंतु मला हें कधींच पटलें नाहीं. ती जिवंत परत आली असती तर अधिक कार्य करूं शकली असती असाच माझा विश्वास होता.


प्रीतीची आणि माझी ओळख आम्ही दोघी लहान असतांनाच झाली. आम्ही दोघी एकाच शाळेंत जात असूं. ती वरच्या वर्गात होती आणि मी तिच्या एक वर्ष मागें होत्यें. शाळेंतील बॅडमिंटन कोर्टावर आमची दोघींची गट्टी जमली. आमच्या शाळेंत असा एक नियम होता कीं मुली ५ व्या वर्गात जातांच त्यांना बॅडमिंटन खेळण्याचा हक्क प्राप्त होई. परंतु वरच्या वर्गातील मुलांना जरूर पडेल तेव्हां आम्हांला कोर्ट मोकळें करून द्यावें लागे. अशा परिस्थितींत आम्हाला हक्क असून सुद्धां फारसें खेळायला मिळत नसे. यावर उपाय म्हणून मी मधल्या सुटींतच बॅडमिंटन खेळायला सुरवात केली. या वेळीं माझ्याबरोबर खेळायला फक्त प्रीतीच तयार असे. अर्थातच ती माझी सर्वात आवडती मैत्रीण बनली.

वरच्या वर्गात गेल्यावर आम्ही दोघींनींहि 'गर्ल गाईड्स्' मध्यें आपलीं नांवें नोंदविलीं. दुसऱ्या पक्षाचे ( ब्रिटिशांचे ) सर्व डावपेंच आपल्याला माहित असणें आवश्यक आहे, ते आपली शक्ति वाढविण्याकरतां उपयोगी पडतील, असें आम्हांला वाटत होतें आणि म्हणूनच आम्ही 'गर्ल गाईड्स्' मध्यें सामील झालों. अर्थातच तिथें आम्हाला 'परमेश्वर आणि राजा' यांच्याशीं एकनिष्ठ राहण्याची शपथ घ्यावी लागत होती. आणि त्या शपथेंतील 'परमेश्वर व राजा'



प्रीती वद्दादर

नगर वाचनालय
ता. ........
सातारा



प्रीतीचे माता-पिता

चितगांव, १९४३

फोटो : सुनील जाना

यांऐवजीं ‘ परमेश्वर आणि मातृभूमि ’ असा शब्द घालण्यांत यावा असें आम्हाला वाटत होतें.

आमच्या घरची राहणी पूर्णपणें हिंदी पद्धतीची असते, आम्ही फक्त स्वदेशी वस्तूच वापरतों, असें प्रीति मला सांगत असे. त्याच्या उलट आमच्या कुटुंबानें पूर्णपणें पाश्चात्य राहणीचा अंगीकार केलेला होता आणि आमच्या घरांत परदेशी वस्तूंचा सर्रास उपयोग होत असे. अर्थातच या गोष्टीमुळें प्रीती-पेक्षां आपण किती तरी कमी दर्जाचे आहों असें मला वाटत असे.

परंतु एकंदरीनें पाहतां या काळांत आम्हांला आमच्या भविष्याची कस-लीच स्पष्ट कल्पना नव्हती असेंच म्हणावें लागेल. कधीं कधीं आपण फार मोठे शास्त्रज्ञ झालों आहोंत अशीं स्वप्नें आम्ही बघत असूं, तर कधीं कधीं झांशीच्या राणीच्या उदाहरणानें आमचीं मनें आकर्षित केलीं जात. कधीं कधीं आम्ही स्वतःला निडर क्रांतिकारकांच्या भूमिकेंतहि रंगवीत असूं. कित्येक वेळां तर आम्ही असाहि निर्धार केला कीं कलकत्ता विद्यापीठाची ‘रायचंद प्रेमचंद शिष्य-वृत्ती ’ आपण पटकवायचीच. ( विद्यार्थ्यांना परदेशी अभ्यासाला पाठविण्यासाठीं कलकत्ता विद्यापीठानें ठेवलेली ही सर्वात वरच्या दर्जाची शिष्यवृत्ती आहे. ) परंतु प्रीती म्हणायची कीं जर आपल्याला मॅट्रिकमध्यें शिष्यवृत्ती मिळाली नाहीं तर आपल्याला मुळीं कलकत्त्याला शिकण्यासाठीं जाणेंच शक्य व्हायचें नाहीं. कलकत्त्याला शिकायला जाणें हें फारच खर्चाचें काम होतें, आणि प्रीतीचे आई-वडील तर फारच गरीब. तिचे वडिल म्युनिसिपल कचेरींत कारकून असून त्यांचा पगार सारा ५० रुपये होता.

प्रीतीनें अशी भीति व्यक्त केली कीं मग आम्हां दोघींनाहि वाईट वाटे. आपल्याला कलकत्त्याला जायला मिळावें अशी प्रीतीची फार इच्छा होती. कारण त्या वेळीं कलकत्ता विद्यापीठ म्हणजे सगळ्या पूर्वेचें भूषण होतें. परंतु अखेर तिची भीतीच खरी ठरली. प्रीति बाकीच्या विषयांत हुशार असली तरी तिचें गणित फार कच्चें होतें आणि अखेर त्यामुळें तिला स्कॉलरशिपला मुकावें लागून कलकत्त्याऐवजीं डाका विद्यापीठाचा मार्ग पत्करावा लागला.

पुढच्याच वर्षी मीहि मॅट्रिक पास झाल्यें व पुढील अभ्यासासाठीं कलक-त्त्याला गेल्यें. तिथें मी विद्यार्थिनी संघांत सामील झाल्यें आणि व्यायाम शाळेंत लाठी व तरवार चालविण्याचें शिक्षण घेऊं लागल्यें. प्रीतीनें सुद्धां डाक्क्याच्या ‘दिपाली संघ’ या राष्ट्राभिमानी संस्थेंत आपलें नांव दाखल केलें होतें व ती सुद्धा लाठी-काठीचें शिक्षण घेत होती.

सुटीच्या दिवसांत आम्ही चितगांवला आलों तेव्हां तिथें आमचा व चितगांवच्या क्रांतिकारकांचा प्रथम संबंध आला. आमच्या बरोबर आणखी दोन मुली होत्या. त्या शाळेंत असल्यापासून प्रीतीच्या मैत्रिणी असल्या तरी प्रीतीचा त्यांच्यावर मुळींच विश्वास नव्हता. ती नेहमीं म्हणायची, 'त्या अगदींच हळव्या आहेत. त्या आपल्याला सोडून जातील अशी मला भीति वाटते.' भित्रेपणाचा एवढासा मागमूस सुद्धां तिला खपत नसे. एकदां बंगाल सरकारच्या शिक्षणाधिकाऱ्यानें पाठविलेल्या एका सर्क्युलरविरुद्ध चितगांवच्या सर्व शाळा कॉलेजांनीं हरताळ पुकारण्याचें ठरविलें. त्या वेळीं आम्हांला सुटी असल्यामुळें आम्ही घरीं आलेल्या होतों. आम्ही चौघींनींहि हरताळांत भाग घेण्याचें ठरवून खस्तगीर स्कूलच्या दरवाजावर निरोधन केलें. त्याचा परिणाम असा झाला कीं आम्हांला शाळेंत येण्याला बंदी करण्यांत आली. बाकीच्या दोन मुलींनी कसें तरी करून आपल्यावरील बंदी उठवून घेतली. तेव्हां प्रीति म्हणायची, 'यांनीं खात्रीनें माफी मागितली असली पाहिजे.'

१९३२ च्या मे महिन्यांत प्रीति मास्तरदांना—सूर्य सेन—भेटायला ढालघाट प्रदेशांतील एका खेड्यांत गेली होती. संध्याकाळच्या सुमारास कॅप्टन कॅमेरॉनच्या नेतृत्वाखालीं पोलिसांनीं घराला गराडा घातला. पोलिसांनीं मशिनगनचा मारा सुरू केला. आमच्या लोकांनीं सुद्धां पिस्तुलांनीं त्यांना जबाब द्यायला सुरवात केली. प्रीतीला यापूर्वी असल्या प्रसंगाचा कधींच अनुभव नव्हता. पण ती डगमगली नाहीं. थोडक्याच अवकाशांत तिनें स्वतःला सांवरलें आणि तीसुद्धां पिस्तुल चालवूं लागली. चकमकींत कॅमेरॉन जागचे जागीं ठार झाला. आणि आमच्यापैकीं निर्मलदाला जबर दुखापत झाली. कॅमेरॉन मेल्यामुळें पोलिसांच्या तुकडींत गोंधळ माजला. आमच्या लोकांना हुकूम मिळाला, 'तावडतोब पसार व्हा!'

परंतु प्रीति जागची हलेना. इतका वेळपर्यंत निर्भयपणें पोलिसांवर गोळ्या झाडणारी प्रीति आतां पार बदलून गेली होती. आपल्या जखमी सहकाऱ्याला सोडून तिला जाववेना. संकटाची प्रीतीला भीति वाटत नव्हती, परंतु आपल्यामुळें कुणी संकटांत फसावें हें सुद्धां तिला मानवणें शक्य नव्हतें.

कसें तरी करून प्रीतीला त्या ठिकाणाहून काढण्यांत आलें व घरीं रवाना करण्यांत आलें. मागाहून त्या घरांत प्रीतीचे कपडे सांपडले. परंतु पोलिसला तिचा संशय आला नाहीं. या शांत आणि निरुपद्रवी दिसणाऱ्या मुलीचा क्रांतिकारकांशीं कांहीं संबध असेल अशी कल्पना सुद्धां पोलिसांच्या डोक्याला शिवली नाहीं.

त्या प्रकारानंतर प्रीतीला शहरांतच परंतु एखाद्या सुरक्षित जागीं ठेवण्यांत यावें असा मास्तरदांचा निरोप आला. त्याप्रमाणे प्रीतीनें घर सोडलें. तिनें घर सोडल्या दिवसापासून पोलिसांचा माझ्यावरील पहारा अधिक कडक झाला. घरांतील लोकांची शिस्तहि एकदम कडक झाली. प्रीतीला हें कळतांच तिनें घरीं परतण्याचें ठरविलें. ती मला म्हणाली, 'कल्पना, माझ्यामुळं तुला पकडण्यांत यावं अशी माझी इच्छा नाहीं. मी आपल्या घरीं जात्यें आणि सुरक्षिततेसाठीं दुसरी कांहीं तरी व्यवस्था करत्यें.'

आणि त्याप्रमाणें मास्तरदांनीं सगळी व्यवस्था केली व लवकरच प्रीति गुप्त रीतीनें काम करूं लागली. ता. ५ जुलै रोजीं स्पेशल ब्रँचचा इन्पेक्टर तिला अटक करण्यासाठीं म्हणून तिच्या घरीं गेला तों ती त्याला अदृश्य झालेली आढळली. लागलीच तो आमच्या घरीं आला आणि माझ्यावरील पहारा अधिकच कडक करण्यांत आला. तो मला म्हणाला, "किती सौम्य दिसायची ती मुलगी, बोलून चालून सुद्धां अगदी गरीब दिसायची. ती इतकी चलाख असेल अशी मला कल्पनासुद्धां आली नाहीं. चांगलेंच बनविलें कीं तिनें आम्हांला !"

परंतु प्रीतीने पोलिसच्या डोळ्यांत धूळ फेकण्याचा तो कांहीं एकच प्रसंग नव्हता. शस्त्रागार हल्ल्यांतला आमचा सहकारी रामकृष्ण विश्वास हा त्यानंतर फरारी होता. त्याला पकडण्यांत आल्यावर चांदपूर खुनाच्या खटल्यांत त्याला फांशीची सजा सुनावण्यांत आली. तो कलकत्त्याच्या तुरुंगांत असतांना प्रीति ४० वेळां त्याची मुलाखत घेऊन आली. परंतु पोलिसला तिचा पत्ता लागला नाहीं. कलकत्त्याला ती ज्या वसतिगृहांत राहात होती त्याच्या सुपरिंटेंडेंटला सुद्धां तिच्या चळवळीचा कधीं पत्ता लागला नाहीं. जेव्हा प्रीतीनं ढालघाटमध्यें लिहिलेला रामकृष्ण विश्वास वरील लेख पोलिसला सांपडला तेव्हां कुठें त्याना ही गोष्ट कळली.

रामकृष्णाच्या मृत्यूनंतर प्रीति प्रत्यक्ष लढ्यांत भाग घेण्यासाठीं फारच उतावीळ झाली होती. त्यानंतर तिची मास्तरदांशी मुलाखत झाली आणि तिथें निर्मलदा तिच्या डोळ्यादेखत मरण पावल्यामुळें तिला आणखी एक धक्का बसला. कधीं कधीं मास्तरदा म्हणत कीं तिच्या या दोन अतिशय आवडत्या सहकाऱ्यांच्या मृत्यूमुळेंच कदाचित् तिच्या डोक्यांत आत्महत्येचा विचार आला असावा. ते म्हणतः "आत्मघातावर माझा मुळीच विश्वास नाहीं. परंतु ती जेव्हां अखेरचा निरोप घ्यायला आली तेव्हां तिनें जवळ जवळ जबरदस्तीनेंच माझ्याजवळून विष काढून घेतलें. तिचा युक्तिवाद सुद्धां बिनतोड होता. पोलिसांच्या जाळ्यांत सांप-

डलें तर त्याची जरूरच पडेल असे ती म्हणाली; आणि मग मला नकार देणेंच अशक्य झालें."

देशासाठीं स्वतःच्या आणि दुसऱ्याच्याहि प्राणावर उदार होणाऱ्या प्रीतीचें अंतःकरण अतिशय कोमल होतें. १९३० सालची गोष्ट. पूजेच्या सणांत मी प्रीतीकडे जेवायला गेल्यें होत्यें. आमच्यापैकीं कुणी मटणासाठीं बकरा मारूं शकेल किंवा नाहीं याची आम्ही चर्चा करीत होतों. मी म्हणाल्यें, "मी सहज मारूं शकेन. त्यांत काय मोठेंसें आहे ?" प्रीति म्हणाली, "त्यांत भिण्यासारखें कांहीं नाहीं परंतु आपल्याच्यानं कांहीं त्या गरीब निरुपद्रवी प्राण्याला मारणं होणार नाहीं." तिचें हें बोलणें ऐकून कुणी तरी तिला विचारलें, म्हणजे ? "तुला अगदीं अहिंसेच्या मार्गानें लढायचें आहे वाटतें देशासाठीं ?" या प्रश्नाला प्रीतीनें दिलेलें उत्तर अजून मला आठवतें. ती म्हणाली, "मी देशासाठीं स्वतःचे प्राण द्यायला तयार आहे. त्याचप्रमाणें जरूर पडलीच तर दुसऱ्याचेहि प्राण घ्यायला मी मागेंपुढें पहाणार नाहीं. परंतु अशा गरीब निरुपद्रवी प्राण्याला उगाच मारणं मला शक्य नाहीं." दोन वर्षांच्या आंतच प्रीतीने आपले हे बोल प्रत्यक्ष कृतींत उतरवून दाखविले.

प्रीतीच्या वडिलांचें तिच्यावर अतिशय प्रेम होतें आणि त्यांच्या सगळ्या आशाआकांक्षा तिच्यावरच केंद्रित झालेल्या होत्या. आर्थिक परिस्थिती अनुकूल नसतांना सुद्धा त्यांनीं तिला शक्य तितकें चांगलें शिक्षण दिलें होतें. ती सुद्धां तशीच बुद्धिमान होती आणि त्यांच्या स्वार्थत्यागाचें तिनें चीज केलें. अभ्यासाप्रमाणेंच लिहिण्याच्या बाबतींतहि प्रीति प्रवीण होती. तिनें अज्ञातवासांत असतांना जें कांहीं लिहिलें त्यांतील उतारेच्या उतारे लोक उद्धृत करीत.

प्रीतीची कार्यनिष्ठा अपूर्व होती. तिची घरची परिस्थिती कधींच चांगली नव्हती. तिचे वडील एक साधे कारकून होते. ते आपला सगळा पगार प्रीतीच्या स्वाधीन करीत आणि तीच घरचा खर्च करी. एकदां आम्ही तिच्या घरीं बसून पार्टी-पुढील आर्थिक अडचणींचा विचार करीत होतों. मास्तरदांना त्याच दिवशीं ५०० रुपये पाहिजे होते. ४५० कसे तरी जमा करण्यांत आले. आणखी ५० चीच कसर होती. प्रीति सरळ आंत गेली आणि तिनें ५० रुपये आणून आमच्यापुढें ठेवले. आम्हांला तिची परिस्थिती माहित असल्यामुळें आम्ही तिला पैसे मागितले नव्हते. अर्थातच हे पैसे कुठून आणले म्हणून आम्ही तिला विचारलें. ती म्हणाली, "कालच

बाबांचा पगार झाला. बाबा सर्व पैसे माझ्या जवळच देतात. तेच सर्व पैसे मी तुम्हांला देत आहें." आम्ही पैसे घेण्याचें नाकारलें. कारण तसें केलें असतें तर तिच्या घरांत एक पैसाहि शिल्लक उरला नसता आणि कुणी पैशाबद्दल विचारल्यावर तिला पैसे देतां आले नसते तर घरांत एकच गोंधळ माजून तिच्याबद्दल भलताच गैरसमज निर्माण झाला असता. परंतु प्रीति ऐकेना. ती म्हणाली, "मीच घरची सगळी व्यवस्था बघत्यें. मी सांभाळिन सगळं कांहीं. तुम्ही काळजींत आपला वेळ घालवूं नका. कसलाहि गैरसमज निर्माण व्हायचा नाहीं घरांत. बाबांचा माझ्यावर पूर्ण विश्वास आहे. त्यांनी विचारलंच तर सांगेन कीं पैसे मी खर्च केलेत म्हणून. मी कुठल्याहि चांगल्या कामाशिवाय पैसे खर्च करणार नाहीं अशी त्यांची खात्री आहे. आणि म्हणूनच तर ही झीज सोसण्यांत जास्तच स्वारस्य आहे." परंतु तिच्या या युक्तिवादाचा आमच्यावर कांहींच परिणाम झाला नाहीं; आणि आमच्यापैकीं कुणीच ते पैसे घेण्याला रुकार देईना तेव्हा तिला एकदम रडूंच कोसळलें. ती म्हणाली, "आम्ही गरीब म्हणूनच ना तुम्ही आमचे पैसे घेत नाहीं? कार्याबद्दलची आमची निष्ठा प्रकट करण्याची संधी सुद्धां तुम्ही मला देणार नाहीं ? "

प्रीतीच्या वडिलांचें जसें प्रीतीवर प्रेम होते तसाच तिला सुद्धां आपल्या वडिलांचा फार लळा होता. वडिलांची गोष्ट निघाली कीं बोलतांना तिचा चेहरा कसा तळपूं लागे. प्रीति बी. ए. होण्यापूर्वींच तिच्या वडिलांची नोकरी गेली, आणि कुटुंबाचा सर्व भार तिच्या अंगावर पडला. तिनें एका हायस्कुलांत शिक्षकाची नोकरी पतकरली आणि कांहीं शिकवण्या करायला सुरुवात केली. अशा रीतीनें ती, आई, वडील, आणि चार लहान भावंडें यांचें पोषण करूं लागली, आपल्या मृत्यूनें आपल्या सर्व कुटुंबाचीच वाताहत होईल याची तिला पूर्ण जाणीव होती. पण तरी सुद्धां तिनें आपल्या देशासाठीं प्राण द्यायला मागेंपुढे पाहिलें नाहीं. तिच्या आई वडिलांखेरीज किती तरी असंख्य आईवडिल या अभागी देशांत होते. त्यांचें दुःख दूर करण्यासाठीं झगडणारी मुलगी त्यांना नव्हती. प्रीति त्यांची मुलगी झाली. त्यांच्यासाठीं तिनें प्राण दिले.

प्रीतीचे आईवडील अजून जिवंत आहेत. वडिल तर पार खचूनच गेले आणि त्यांची शुद्ध हरपली. आई मात्र खंबीर. तिनें स्वतः कुटुंबाचा भार अंगावर घेतला. ती सुईणीचें काम शिकली आणि कसा तरी कुटुंबाचा डोलारा

तिनें उभा ठेवला. प्रीतीसारखी देशाकरतां प्राण देणारी मुलगी आपल्या पोटीं जन्माला आली याचा तिला अभिमान वाटतो. प्रीतीच्या वडिलांचें दुःख मात्र अजून आटलें नाहीं. मला बघितलें कीं त्यांना प्रीतीची आठवण होते. आम्हीं करीत असलेल्या दुष्काळनिवारणाच्या कार्यांत ते शक्य तेवढें लक्ष्य घालीत. ते नेहमीं म्हणत, " आज माझी मुलगी असती तर तिच्या मदतीनें आम्ही किती तरी जास्त काम करूं शकलो असतो. "

चितगांवची जनता प्रीतीला किंवा तिनें केलेल्या त्यागाला विसरणें शक्य नाहीं. एखादा परदेशी मनुष्य चितगांवमध्यें आला कीं लोक त्याला प्रीतीचे वडील दाखवितात आणि सांगतात, ' आमच्या देशासाठीं आपले प्राण अर्पण करणाऱ्या पहिल्या स्त्रीचे हे वडील आहेत. '

# मणी दत्त

सन १९३२ चा जून महिना. कॅप्टन कॅमेरॉनच्या खास पुढारीपणाखालील पोलिस तुकडीनें ढालघाट येथें फरारी क्रांतिकारकांच्या एका गटाला वेढा दिलेला होता. आमच्या बाजूचे दोघेजण—निर्मलदा आणि अपूर्व—या चकमकींत ठार झालेले होते. मास्तरदा ( सूर्य सेन—चितगांवच्या क्रांतिकारकांचा पुढारी ) व प्रीति वद्दादार हीं दोघें पोलिसांची फळी फोडून निसटून गेलीं. प्रीति आपल्या घरीं तर नीटपणीं परत गेली—पण पुढें तिचें काय करायचें हा एक प्रश्नच होता. प्रीतीचा संबंध ढालघाट प्रकरणाशीं आहे हें पोलिसांना ठाऊक आहे का नाहीं हें कळायला मार्ग नव्हता. तिनें घरींच राहायचें म्हणजे तिचा ठावठिकाणा पोलिसांना नक्कीच कळणार. पण सगळ्या बाजूंनीं वेढ्याचा फांस जास्त जास्त घट्ट होत असतांना तिला घरीं राहूं देणें शहाणपणाचें होतें का ? याच्या उलट, तिला फरारी हो म्हणून सांगणें हें तरी बरोबर होतें का ?

काय केलें तर काय होईल याचा विचार करीत, पुढचे बेत आंखायच्या खटपटी करीत, मी व प्रीति तिच्या खोलींत तासचे तास घालवीत असूं. प्रीतीनें फरारी व्हावें, याखेरीज दुसरा मार्गच नाहीं, असा आम्ही दोघींनीं विचार केला. म्हणून तिनें पुढें यासाठीं काय काय तजविजी करायच्या तें मी तिच्याशीं ठरवायच्या खटपटींत होत्यें.

त्या वेळी आमच्या इतर सहकाऱ्यांपासून आम्ही अलग पडलों होतों. पण तेवढ्यांत प्रीतीची धाकटी बहीण अचानक आली आणि तिनें आम्हांला सांगितलें कीं प्रीतीला भेटायला कुणी तरी आलें आहे. प्रीतीच्या खोलीलगतच्या एका जुन्या पडक्या गोठ्यांत आम्ही निवांतपणीं बोलणें करण्यासाठीं गेलों.

नवीन आलेला इसम काळा व उंच होता. त्यानें सरळ मुद्यालाच गांठ घातली. त्यानें सांगितलें, “ मास्तरदाकडून आलोंय मी. तुमचं कसं काय चाललंय हें बघून यायला सांगितलंय मला त्यानं. तुमची ( प्रीतीची ) एकंदर हालहवाल काय आहे हें त्याला कळलं म्हणजे मग तो तुमच्या सुरक्षिततेसाठीं काय काय बंदोबस्त करायचा तें ठरवील. ” आम्ही आमचा विचार त्याला सांगितला. त्यानें आमचें म्हणणें

ऐकून घेतलें आणि लगेच तो जायला निघाला—एक शब्दहि अधिक बोलला नाहीं. त्याला निरोप देतांना मी सांगितलें: "मास्तरदाला सांगा कीं एका महत्वाच्या कामासाठीं मला त्याला भेटायचं, तेव्हां जागा ठरवा म्हणावं." टालघाट प्रकरणानंतर आमच्यांतले कांहीं लोक पकडले गेले आणि दहा बारा दिवस पर्यंत मास्तरदाशीं संबंध जोडायचीं आमचीं सगळीं साधनें बंद पडलीं. म्हणून त्याच्याशीं नियमित संबंध जोडायसाठीं सत्वर तरतूद करणें अगत्याचें होतें. पण या पाहुण्यानें 'हो' अगर 'नाहीं' कांहींच सांगितलें नाहीं. आमचा निरोप त्यानें ऐकला क नाहीं, निदान तो त्याला कळला तरी का, याची सुद्धां आम्हांला खात्री वाटेना. त्यानें नुसतें एकदां माझ्याकडे वर मान करून पाहिलें आणि गर्रदिशीं वळून तो चालता झाला.

त्या वेळीं मी फारच गोंधळून गेल्यें. अजून मला आठवतो तो प्रसंग. त्याचें वर्तन विचित्र तर होतेंच. तसा तो बुद्धीनें मंद मुळींच दिसत नव्हता; उलट चलाख व बुद्धिमानच दिसे. पण एखाद्याशीं आपण बोलायचें व त्याच्याकडून आपल्याला जबाब कांहींच मिळायचा नाहीं, असा प्रसंग मात्र माझ्या आयुष्यांत तो पहिलाच होता. मला काळजी वाटूं लागली—माझ्या हातून त्याची कांहीं आगळीक तर नसेल झाली? याबद्दल मी प्रीतीजवळ बोलल्यें तेव्हां ती म्हणाली: "अग त्याचं काय येवढं मनावर घेत्येस? तो तसलाच आहे. तो आधींच फार अबोल; अन् निर्मलदा नि अपूर्व गेल्यासुळं त्याला धक्काच बसल्यासारखं झालंय."

या प्रकारानंतर पांच महिन्यांनीं मी पण फरारी झाल्यें. आतांपर्यंत, म्हणजे फरारी व्हायच्या अगोदर, माझीं नेहमींचीं कामें मी करीत असतांना, माझी फक्त एका कॉम्रेडशीं ओळख झालेली होती—तो म्हणजे शान्तिदा. इतर कुणाची चौकशी करायची खटपट मी केलीच नव्हती. "अवश्य असेल तेव्हांच माहिती करून घ्यावी—" हा क्रांतिकारक कार्यातला सर्वमान्य नियमच आहे. या कार्यात अति चौकसपणाला कधींच उत्तेजन देत नाहींत. म्हणून माझी दुसऱ्या कुणाशींच ओळख नव्हती.

मी शारोआताली गांवीं एका गुप्त ठिकाणीं मास्तरदा व फुतुदा ( तारकेश्वर दस्तीदार ) यांच्या बरोबर राहत होत्यें. एक दिवस फुतुदा म्हणाला, 'आज आपण सगळींच एका ठिकाणीं पार्टीला जाणार आहोंत. तिथं आपल्याला सगळे मुख्य मुख्य क्रांतिकारक भेटतील. ठिकठिकाणीं विखुरलेले फरारी सुद्धा तिथं येणार आहेत. आपल्या पुढच्या कामकाजाची रूपरेखा मास्तरदा त्यावेळीं

नगर वाचनालय, सातारा.



नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

मणी दत्त [ १९४५ ]



कल्पना दत्त [ १९३२ ]

समजावून सांगेल. फरारी कार्यकर्ते कुठं कुठं राहाणार, त्यांचे निरनिराळे गट कसे तयार करायचे याबद्दलहि मास्तरदा आपल्याला सांगेल.'

"तिथं 'जमीनदार' येणार आहे." त्याची टकळी चालूच राहिली: "अन् तलवारकर सुद्धां. अग हो, सांगायचं राहिलंच. 'लेक्चरर' देखील येणार आहे—तुझ्या ओळखीचा आहे तो." हा 'लेक्चरर' कोण हें माझ्या मुळींच लक्षांत येईना. पण विचारायचें कसें ? हीं सगळीं टोपणनांवें आहेत हें मला ठाऊक होतेंच. ज्याचा जो विशेष गुण असेल तें टोपणनांव त्याला द्यायचें; किंवा एखाद्या विशिष्ट घटनेशीं ज्याचा निकट संबंध आला असेल त्याला त्या घटनेवरून टोपणनांव द्यायचें—मास्तरदाची ही रीत मला माहित होती. पण खूप खूप विचार करूनसुद्धां मला माझ्या ओळखींतल्यांपैकीं एकहि कार्यकर्ता फार बोलणारा व 'लेक्चरर' या पदवीला लायक असा कांहीं केल्या आठवेना.

असो. आम्ही त्या पार्टीला गेलों. तिथें २५-२६ जवान हजर होते. प्रीतीच्या घरीं भेटलेला तो अबोल पाहुणा थेट माझ्या पुढ्यांतच बसलेला मला दिसला. त्यानें स्मित करून मला नमस्कार केला. फुतुदा माझ्या शेजारींच बसलेला होता. त्याच्या कानांत मी कुजबुजल्यें—"या कॉम्रेडला मी चेहऱ्यावरून ओळखत्यें—याचं नांव नाहीं मला ठाऊक." फुतुदा उत्तरला–"अग हाच तर 'लेक्चरर'—त्याच्याबद्दल मी तुला अगोदरच बोललोंय, आठवतं तुला ?"

मी थक्कच झाल्यें. इतक्या अबोल माणसाला 'लेक्चरर' नांव तरी कसं द्यायचं ? मग फुतुदानें मला त्याची हकीकत सांगितली.

सारोआताली हायस्कुलांतल्या दहाव्या इयत्तेंत (शेवटच्या वर्गात) लेक्चररचा पहिला नंबर होता. चितगांव शहरांतले सगळे उत्तमोत्तम विद्यार्थी क्रांतिकारक चळवळींत हटकून यायचे—आमची पार्टी त्यांच्यावर लक्ष ठेवून असे. आमच्या गटांतल्या एका मुलानें लवकरच बातमी आणली कीं हा मुलगा मास्तरदाची भेट घेण्यासाठीं फारच उत्सुक झालेला आहे. भेटीची वेळ व जागा ठरली.

... झाडांच्या एका दाट राईच्या कडेला फुतुदा या मुलाला भेटला. फुतुदा त्याच्याशीं बोलत होता आणि मास्तरदा झाडांच्या आडोशाला उभा राहून दोघांचें संभाषण ऐकत होता. फुतुदानें मुलाला विचारलें, "तुला क्रांतिकारक कार्य करावंसं कां वाटतं ? हें कार्य करायचं म्हणजे काय करायचं हें तुला ठाऊक आहे का ? तूं कुठच्या मर्यादेपर्यंत स्वार्थत्याग करायला तयार आहेस ? मास्तरदाला भेटायसाठीं तूं इतका उत्सुक कां आहेस ? "वगैरे वगैरे. हा मुलगा या प्रश्नांचीं उत्तरें देऊं

लागला -- पण सरळ साध्या भाषेंत तो उत्तरें देईना. उत्तरादाखल त्यानें संस्कृत श्लोकांतले उतारे, तसेंच बंगाली व इंग्रजी कविता म्हणून दाखविल्या; आणि बोलला तो सुद्धां अभिजात साहित्यिक बंगालींतच. आपण एका 'थोर' पुढाऱ्याशीं बोलत आहोंत, मग साध्या भाषेंत जर आपण त्याच्याशीं बोललों तर त्याच्याबद्दल आपल्याला आदर नाहीं असेंच नाहीं का दिसणार? शिवाय हा आपल्या आयुष्यांतला अत्यंत महत्वाचा प्रसंग — या प्रसंगीं आपल्या हृदयांतील भावनांची प्रचंड खळबळ व्यक्त करण्याचें सामर्थ्य आपण अभ्यासलेल्या उत्तमोत्तम वाङ्मयांतच असणार. त्याचा अभ्यास फार चांगला होता आणि गद्यपद्य वेंचे त्याला तोंडपाठ येत असत.

इकडे मास्तरदा पोट धरधरून हंसत होता. फुतुदाचें बोलणें संपल्यावर मास्तरदा म्हणाला "ए हा खरोखरीचाच लेक्चरर दिसतोय हं." त्या दिवसापासून त्याला 'लेक्चरर' हें टोपण नांव मिळालें.

'लेक्चरर'च्या आईबापांची फारच गरीबी होती. त्याचें खरें नांव होतें मणी दत्त. तो काशियाश गांवचा राहणारा. त्याच्या आईबापांना आपल्या अभ्यासू मुलाचा अभिमान वाटे. आपला मुलगा मोठा होईल, नोकरी धरील, मग आपली कष्टदशा संपेल, अशी आशा त्यांना वाटत होती. या कुटुंबाची स्थिति किती दुर्धर होती याची प्रत्यक्ष कल्पना त्यांच्या घरीं जाऊन पाहीपर्यंत मास्तरदा व फुतुदा या दोघांनाहि नव्हती.

मास्तरदानें आपल्या घरीं आलें पाहिजे असा 'लेक्चरर'नें हट्टच धरलेला होता. एके दिवशीं पडत्या पावसांत रात्रीं मास्तरदा त्याच्या घरीं गेला. घर म्हणजे एकच खोली होती. छप्पर गळकें होतें. स्वयंपाकाच्या जागेंत वरून छपराच्या भागांतून पाऊस सरळ आंत येत होता. सगळी मंडळी सारी रात्र याच स्वयंपाकघराच्या एका कोंपऱ्यांत कुडकुडत बसून राहिली होती. त्यांनीं मास्तरदाला बैठकीच्या जागेंत रात्रभर मुक्काम करायला लावला आणि आपल्याजवळचें एकुलतें एक कांबळें त्याला पांघरायला दिलें. मास्तरदाला आश्रय दिल्याबद्दल त्यांना अभिमान व धन्यता वाटली. पुढें तर ही चंद्रमौळी झोपडी म्हणजे मास्तरदाला लपायला एक अत्यंत सुरक्षित जागा होऊन राहिली होती.

'पहारताली' प्रकरणानंतर 'लेक्चरर'हि शाळा सोडून फरारी झाला. अभ्यासांत नांव मिळवायच्या महत्वाकांक्षेवर पाणी सोडतांना त्याला फार जड गेलें. पण त्याबद्दल त्यानें खेदाचा एकहि उद्गार काढलेला कुणाच्याच ऐकिवांत नाहीं.

कधींतरी गप्पा गोष्टींत त्याचें आपल्या आईबापांवरील गाढ प्रेम उघड होत असे.' पण याच्या पलीकडे स्वतःबद्दल तो कांहींहि बोलत नसे.

'लेक्चरर'ची ही हकीकत सांगून फुतुदा शेवटीं म्हणाला—"आम्ही त्याला 'लेक्चरर' म्हणतों खरे, पण आतां तो पुस्तकी भाषेंत मुळींच नाहीं हं बोलत!'

त्या पहिल्या भेटीनंतर मग कामाच्या निमित्तानें मला त्याचा चांगला परिचय झाला. त्याची भूतदयेची भावना अत्यंत सखोल होती. तो म्हणे–" मी जर क्रांतिकारक झालों नसतों, तर मी साधु झालों असतों. लोकांच्या हालअपेष्टा मला बिलकुल बघवत नाहींत. फुतुदानं मला क्रांतिकारक मार्ग पतकरायच्या कामीं मदत केली. म्हणूनच माझी त्याच्यावर इतकी भक्ति आहे." त्याचें म्हणणें अगदीं खरें होतें. कुणाच्याहि हालअपेष्टांची हकीकत ऐकली कीं त्याच्या डोळ्यांत पाणी उभें राही.

या त्याच्या गुणामुळेंच संकट समोर असलें म्हणजे असामान्य शांतपणा व आश्चर्यकारक प्रसंगावधान राखण्याची कला त्याला साधलेली होती. भयंकर संकट ओढवलें असतांनाचें त्याचें वर्तन मी त्याच्या बरोबर राहून पाहिलें असल्यामुळें अत्यंत आदरानें त्याचे पाय धरावेत असेंच मला अक्षरशः वाटतें.

१९३४ च्या फेब्रुवारींत गोइरोला गावीं मास्तरदा पोलिसांच्या हातीं सांपडला त्या दिवशींची 'लेच्चरर'ची कामगिरी मला ठळकपणें आठवते. त्या दिवशीं तो आमच्या बरोबरच होता.

रात्रींचे साडेनऊ झालेले होते. जेवणानंतर आम्ही पूर्वी ठरविलेली एक भेट घ्यायला चाललों होतों. पण आम्ही ज्या घरांतून बाहेर पडलों, त्याला पोलिसांनीं अगोदरच गराडा घातलेला होता, व त्यांना संशय येऊन त्यांनीं आमच्यावर गोळीबार केला. आम्ही त्याच पावलीं परत फिरलों व उलट दिशे-कडील एका कंपौंडावरून उड्या मारून एका घराभोंवतालच्या बागेंत शिरलों. मी जोरांत धांवून मास्तरदाला गांठलें. सगळीकडे अंधारगुडुप व थंडीचा कडाका होता. मी मास्तरदाचा हात घट्ट धरून अतिशय सावधपणें चांचपडत चालल्यें होतें—तेवढ्यांत मी अचानक पाय घसरून एका डबक्यांत पडल्यें. त्यांत गळ्याइतकें पाणी होतें. पाण्यांत आणखी कुणीतरी आहे हें मला आवाजावरून कळलें. माझी पाण्यांतील खळबळ ऐकून तो आणखी जवळ येऊन विचारूं लागला: "मास्तरदा का ? या इकडून या." मी सांगितलें मी आहे, तेव्हां तो म्हणाला : " असं होय ! मग या इकडे, मला घट्ट धरा, अन् आपण

इथून बाहेर पडूं या. " आमच्या मस्तकांवरून रायफलींचा गोळीबार चालू होता. गोळ्या जवळजवळ आमच्या कानाला चाटूनच सूंसूं करीत जात होत्या. त्यांची उष्णता मला जाणवत होती. अशा धुमश्चक्रींत प्राण वांचणं बहुतेक अशक्यच दिसत होतं. निदान एखादी गोळी तरी लागणारच असं वाटत होतं. पण 'लेक्चरर' अगदीं पुतळ्यासारखा शांत होता. "आपण या डबक्यांतून बाहेर पडलंच पाहिजे"—याच्या पलीकडे तो कांहींएक बोलला नाहीं. डबक्याचा कांठ कडातूट होता. जरा वेळ वर चढायची धडपड करून आम्ही एकदांचे बाहेर निघालों. "

मग त्यानें सांगितलें— "आपण त्या झुडुपांच्या आडोशाला गेलं पाहिजे—नाहींतर गोळ्या खाऊन आपल्या अंगाची चाळण होईल." पण क्षणार्धात आम्हांला कळून चुकलें कीं हीं वेळूचीं झुडुपें रायफलीच्या गोळीबारापुढें आमचा बचाव करायला उपयोगी पडण्याजोगीं नव्हतीं. मग 'लेक्चरर' नें हुकुम केला— "जमिनीसरपट पडून रहा." जमिनीसरपट पडल्या पडल्या आम्हांला अवघ्या दहाबारा फुटांवरून काळ्या काळ्या आकृति आमच्याकडे येत असलेल्या दिसूं लागल्या. त्यांना कोण अडवणार? आतां काय करायचें? आमच्या जवळ फारसा दारूगोळाहि शिल्लक राहिलेला नव्हता. 'लेक्चरर' नें एका मिनिटांत नवी युक्ति सुचवली. "तूं एका बाजूला गोळ्या झाड, अन् मी दुसऱ्या बाजूला गोळ्या झाडतों. आपण दोघं एकदम गोळ्या झाडूं लागलों तर गोळ्या फार वेळ पुरायच्या नाहींत." मी कांहींएक न बोलतां त्याच्या हुकुमाप्रमाणें काम चालविलें.

मध्यंतरीं क्षणभर पोलिसांचा गोळीबार थांबला.—निसटून जायला हीच वेळ योग्य होती. पण आम्ही धांवत धांवत त्या बागेलगतच्या डबक्यापर्यंत जातों तेवढ्यांत इशाऱ्याचा गोळीबार सुरू झाला. आमच्या हालचालींची माहिती या गोळीबारावरून पोलिसांना कळली. 'लेक्चरर' नें पुन्हां हुकूम केला— "आपण या तळ्यांत लपून बसलं पाहिजे. फक्त नाक तेवढं वर ठेवून तोंडानं पाण्यांत श्वास सोडायचा—नाहींतर पलीकडच्या कांठावरच्या सोल्जरांना आपला श्वास ऐकूं जाईल." तलावाच्या पैलतीरावरून सोल्जरांचा जड श्वास आम्हांला ऐकूं येत होता.

एक तासभर पाण्यांत लपून राहिल्या नंतर आम्ही निसटून जाण्याचा शेवटचा प्रयत्न करीत होतों. आम्ही कांठावर आलों तेव्हां 'लेक्चरर' नें मला पुन्हां नीट खबरदारी घेण्याबद्दल बजावलें–"डोकं वर उचलायचं नाहीं. आपल्याला जमिनीसरपट रांगत जायचंय. धोक्याचा भाग संपला कीं लगेच आपण धांवायला

लागूं." त्यानें रिकामीं काडतुसें फेंकून देऊन नवीं काडतुसें आमच्या पिस्तुलांत भरलीं. मग त्यानें जमिनीसरपट कसें रांगायचें हें मला दाखविलें. लष्करी पद्धतीनें कसें सरपटत जायचें हें त्याला कधींच शिकायला मिळालेलें नव्हतें हें मला मागाहून कळलें. पण त्या तसल्या गोंधळांत केवळ माझी नड लक्षांत घेऊन त्यानें ही विद्या मला शिकवायसाठीं एक उत्तम प्रभावी रीत शोधून काढली. वास्तविक मी त्याच्या अगोदरपासून क्रांतिकारक कार्य करीत होत्यें. पण यानें येवढें आश्चर्यकारक प्रसंगावधान आणि असला खंबीर व्यवहारीपणा कुठून मिळविला असेल, असा विचार राहून राहून माझ्या मनांत येऊं लागला.

हत्यारी पोलिसांच्या वेढ्यांतून निसटायला आम्हांला एक तास लागला— पण 'लेक्चरर' नेंच आम्हांला सुरक्षित बाहेर आणलें. धोक्याच्या भागांतून आम्ही बाहेर आलों मात्र–लगेच त्याचा निग्रही शांतपणा व पोलादी निर्धार ढळूं लागला. त्याला भयंकर वाईट वाटूं लागलें. तो काळजीनें हैराण झाला. तो मला सांगूं लागला–" मी मास्तरदाला सोल्जरांच्या वेढ्यांतच सोडून आलों. तूं इथंच थांब. मी परत वेढ्यांत जाऊन त्याला सोडवून घेऊन येतों." आतां त्याची समजूत घालायची बारी माझ्यावर आली. अंमळशानें तो म्हणाला—" तुझ्या बाबतींतली एक जबाबदारी माझ्यावर आहेच. तूं आहेस स्त्री, अन् त्यांत पुन्हां तुला या गांवाची खडान् खडा माहिती नाहीं. तुला जर सुरक्षित जागीं मी पोंचवलं नाहीं तर या धोक्याच्या भागांतून तुला सोडवून आणायची सगळी मेहनत व्यर्थ ठरेल."

त्या गांवाची सगळी माहिती त्याला तरी धड कुठें होती ? पण जरा वेळ इकडे तिकडे धडपड करून आम्ही शेवटीं एकदांचे निसटलों तिथून.

पण मास्तरदा व इतर जखमी कॉम्रेड्स पोलिसांच्या तावडींत सांपडले ही बातमी ऐकून 'लेक्चरर' आणखीच कष्टी झाला. त्यांना सोडविण्यांत अपेश आल्याचा सारा दोष तो स्वतःवरच घेऊं लागला. त्या दिवसापासून पुढें केव्हांहि मास्तरदाचा विषय निघाला कीं तो म्हणे—" आम्ही सगळेजण सहीसलामत निसटलों. पण ज्याला सोडवणं अत्यंत जरूरीचं होतं त्याला मात्र आम्ही सोडवूं शकलों नाहीं."

संकट समोर असतांना 'लेक्चरर'चा धीर सुटला असा प्रकार कधींच घडलेला कुणालाहि ठाउक नाहीं.

आणखी एका अशाच प्रसंगीं ‘ लेक्चरर ’, मी व आणीक एक कॉम्रेड असे तिघेजण फरारी असतांना आम्हांला गांवांत येणें भाग पडलें. आम्ही सर्वानींच वेषांतर केलेलें होतें. आम्ही लुंग्या, पंजाबी, असा मुसलमानी पोशाक घातलेला असल्यामुळें आम्हांला कुणीच ओळखणें शक्य नव्हतें. तिनीसांजेच्या सुमारास आम्ही एका तलावाच्या कांठावर रेंगाळत होतों. तेवढ्यांत कांहीं खटारेवाले तिथें आले ते थेट माझ्याकडे येऊन माझी विचारपूस करूं लागले. आम्हांला संशय आला. जो मुलगा आम्हांला इथें भेटायला येणार होता त्यानें दगलबाजी केली असावी असें आम्हांला वाटलें. नाहींतर बाकीचे दोघेजण सोडून नेमकें मलाच कसें त्यांनीं चौकशीसाठीं गांठलें ? ते थंडीचे दिवस होते आणि आम्ही सर्वांनीं नखशिखान्त शाली पांघरलेल्या होत्या. माझे केंस लपविण्यासाठीं मी डोक्याला फेटा बांधलेला होता. पण वरून शाल असल्यामुळें ते दिसूं शकतच नव्हते.

‘लेक्चरर’नें लगोलग पुढचें धोरण आंखलें. त्यानें त्या लोकांना दमदाटी दिली व सरळ दोन्ही मुटींनीं त्यांना बुकलायला सुरवात केली. त्यांना तसेच अडवून धरून त्यानें आम्हांला पळ काढायचा इशारा दिला. एका हातांत टॉर्च, दुसऱ्या हातांत पिस्तुल, हमरस्त्यांतून धांवत सुटायचें — हा साराच प्रकार चमत्कारिक होता. तेवढ्यांत ते खटारेवाले “ चोर ! ” “ चोर ! ” म्हणून ओरडत सुटले. आम्ही थोडे दूर गेलेले पाहतांच ‘ लेक्चरर ’नें खटारेवाल्यांना तसेंच सोडून दिलें, आणि तो स्वतःच “ चोर ! चोर ! ” म्हणून ओरडत आम्हाला गांठायसाठीं धांवत सुटला. या ओरडा आरड्यावरुन आजूबाजूच्या लोकांना असें वाटलें कीं ‘ चोर ’ आमच्यापुढें पळत असावेत व आम्ही त्यांचा पाठलाग करीत आहोंत. आणि म्हणून सगळे लोक आमच्याहि पुढें धांवत सुटले आणि आमच्याबद्दलचा संशय दूर झाला. या साऱ्या गोंधळांतच आम्ही एक गल्ली गांठली व एकदांचे निसटलों.

‘ लेक्चरर ’ चांगला ताडमाड उंच आहे. सहा फूट. पण तो दिसायला इतका शांत व निरुपद्रवी दिसतो कीं येवढा भयंकर आडदांडपणा तो करूं शकेल याची मला कल्पनाहि नव्हती. पण त्या दिवशीं त्यानें पांचसहा तगड्या गाडीवाल्यांना एकट्यानें अडवून धरलें.

मी फरारी असतांनाच्या बहुतेक काळांत ‘ लेक्चरर ’ माझ्या सोबतीला असे. पण पोलिसांचा पाहरा जसजसा कडक होऊं लागला तसतसे आम्ही

एकमेकांपासून जास्त जास्त पांगून राहूं लागलों. म्हणजे एकाला अटक झाली तरी सगळ्या गुप्त संघटनेला धोका येऊं नये. म्हणूनच मला अटक झाली तेव्हां ' लेक्चरर ' इतरत्र होता व निसटूं शकला.

१९३४ सालीं मी राजशाही तुरुंगांत असतांना मणी दत्तास शिक्षा झाल्याची बातमी मला ऐकायला मिळाली. पोलिसांच्या वेढ्यांतून निसटून जात असतांना अटक होऊन त्याला हत्यारांच्या कायद्याखालीं दहा वर्षांची सजा मिळाली.

जवळ जवळ अकरा वर्षांनंतर तो पुन्हां आमच्या चितगांवीं आला आहे. ह्या क्रांतिकारकाला जें करतां येणार नाहीं असें कांहींहि असणें शक्य नाहीं असें आम्ही आमच्या जुन्या चितगांवीं असतांना म्हणत असूं. पण आजचें कार्य फारच अफाट वाढलें आहे आणि मार्गांत अडथळेहि अनेक पटींनीं जास्त झाले आहेत. आमचें जुनें चितगांव आतां जिवंतच नाहीं. आमच्या चितगांवच्या एकंदर समाजांतच अफाट परिवर्तन झालें आहे. आमच्या काळीं चितगांवची एकंदर तरुण पिढी ज्वलंत देशप्रेमानें भारलेली असे. आणि या मजबूत पायावरच क्रांतिकारकांनीं सामाजिक न्यायावर आधारलेलें स्वातंत्र्य संपादन करण्यासाठीं प्रचंड योजना उभारल्या होत्या. पण आज ? आज चितगांवची पाक जनता नादान व समाजविरोधी वृत्तींपायीं डागळलेली आहे.

या नादानपणाच्या कर्दमांतून आमच्या तरुणांना निर्मळ मार्गावर आणण्याचें कार्य आज चितगांवची कम्युनिस्ट पार्टी मोठमोठ्या संकटांशीं झुंजून पार पाडीत आहे. मणी दत्ताच्या सुटकेमुळें कम्युनिस्ट पार्टीचा एक अमोल लढवय्या परत मिळाला येवढी संकुचित दृष्टि आपण ठेवतां कामा नये. चितगांवचा वैभवशाली पूर्वकाळ व शौर्यशाली भविष्यकाळ यांच्या दरम्यान सध्याच्या अधःपातांवरून आम्ही एक पूल बांधायच्या उद्योगांत आहोंत आणि मणी दत्ताची सुटका ही या पुलाचें प्रतीक ठरणारी आहे.

पाने-११८
८८१६५
५-६५
कि-१.५०
भवानी

# स्वदेश रॉय

आज चितगांव मध्यें ठेकेदार म्हटला कीं लोकांच्या मनांत एक प्रकारचा तिरस्कारा निर्माण होतो. ठेकेदार बघितला की तो नजरेला पडूं नये म्हणून लोक दुसरीकडे बघूं लागतात. आंणि म्हणतात ' घुबड कुठला ! '

आजच्या ठेकेदारांनीं सगळ्या समाजाला आपल्या लोभीपणाच्या आगींत बळी देण्याचें ठरविलें आहे. आपल्याच देशबांधवांची बेइज्जत करण्यांत त्यांना विशेषच आनंद होतो. त्यांना आपल्या आया बहिणींच्या अब्रूचा व्यापार करायला शरम वाटत नाहीं. परदेशी सैनिकांपुढे कुत्र्यासारखी ते लाळ घोटीत असतात. आज त्यांची प्रत्येक कृति आमचा अभिमान दुखावणारी आणि आमची बेइज्जत करणारी आहे.

परंतु १५ वर्षापूर्वीचा काळ निराळा होता. त्यावेळी ठेकेदार झाला तरी त्याच्या अंतःकरणांतील माणुसकीची आणि देशाभिमानाची ज्योत विझलेली नव्हती. त्यावेळी सुद्धा चितगांवमध्यें पुष्कळ ठेकेदार होते आणि बंगालच्या पूर्व सरहद्दीवरील डोंगराळ भागांत वसलेल्या या गांवाला सुंदर आधुनिक शहराचें रूप देण्याचें कार्य करीत होते.

स्वदेश रॉय हा अशांपैकीच एक ठेकेदार होता. तो पब्लिक वर्क्स डिपार्टमेंटच्या एका ओव्हरसीअरच्या हाताखाली घरें बांधण्याचे काम करीत असे. त्याचें वयहि फार नव्हतें. फार तर २२-२३ वर्षाचा असेल तो त्या वेळी. चितगांवच्या क्रांतिकारक संघटनेचा तो सभासद नव्हता. परंतु १९२८ मध्यें ज्या वेळीं अनंत सिंहने आपल्या क्रांतिकारक गटाची संघटना करायला सुरवात केली त्यावेळीं चितगांव आणि त्या भोवतालचा प्रदेश, त्याची ठेवण, कुठे कुठे ब्रिटिशांनी आपली शक्ति केंद्रित केली आहे, इत्यादि गोष्टींची माहिती मिळवायला त्याने सुरवात केली. स्वदेश रॉय हा इमारती बांधणारा ठेकेदार असल्यामुळे आणि क्रांतिकारकांबद्दल त्याला सहानुभूति असल्यामुळें चितगांव आणि त्याभोंवतालच्या प्रदेशाचे नकाशे बनविण्यासाठीं अनंतसिंह त्याची मदत घेऊ लागला. अशा रीतीने स्वदेशचा आणि क्रांतिकारक पक्षाचा संबंध आला. परंतु त्याला पक्षाचा सभासद असें कधीच करून घेण्यांत आले नव्हते.

परंतु स्वदेश मात्र स्वतःला निव्वळ सहानुभूति बाळगणारा समजत नसे तर आपणहि या चळवळीचे एक घटक आहोत अशीच त्याची भावना

होती. आणि या भावनेने प्रेरित होऊनच तो कित्येकदा स्वतः होऊन फारच महत्वाच्या सूचना करीत असे. त्याने अनंतदाला सुचविलेल्या कित्येक योजना फारच मोलाच्या ठरल्या आहेत.

चितगांवच्या शस्त्रागारावर हल्ला करण्याच्या काही दिवस अगोदरची गोष्ट. त्या काळांत क्रांतिकारक लोक ज्या प्रकाराने वावरत होते त्यावरून स्वदेशची खात्री झाली कीं काही तरी प्रचंड योजना आंखली जात असून लवकरच ती अमलांत येणार. परंतु तरी सुद्धा त्याने एका चकार शब्दाने कुणाला काहीं विचारलें नाही. जी गोष्ट तुम्हांला सांगितलेली नाही तीबद्दल प्रश्न विचारणें हें क्रांतिकारक शिस्तीच्या विरुद्ध होते.

चितगांव शस्त्रागार हें एका टेकडीवर होते.ता. १८ एप्रीलला रात्रीं ६-७ क्रांतिकारक एका मोटारींत बसून त्या टेकडीच्या बाजूने निघाले. शस्त्रागारापासून थोड्याच अंतरावर गाडी एकाएकी थांबली. स्वदेशचें घर शस्त्रागाराजवळच होते. त्याच्या दृष्टीला गाडी पडली. काय प्रकार आहे हें पाहाण्यासाठीं तो बाहेर आला. कांहीजण गाडींतून खाली उतरून ती पुन्हा सुरु करण्याची खटपट करीत होते परंतु स्वदेशने तेव्हा कसलाच प्रश्न विचारला नाहीं. अनंतदा आणि त्याचे सहकारी पुष्कळदा मोटारींतून गांवाबाहेर लढाईचा अभ्यास करण्यासाठीं जात असत आणि त्यावेळीं ते खाकी गणवेशहि घालीत. आजचाहि प्रकार तसाच असेल असें मानून स्वदेश चूप राहिला.

इतक्यांत एकाच्या कमरेचे पिस्तुल खालीं पडले. त्याने चपळाई करून ते उचललें व परत आपल्या कमरपट्ट्यांत लपविले. परंतु स्वदेशच्या नजरेंतून ही गोष्ट निसटली नाही. तरी सुद्धां तो काहीं न बोलता मुकाट्याने घरीं परतला, आणि मोटर पुढे चालू लागली.

तो घरीं पोंहचतो न पोंहचतो तोच त्याला गोळीबाराचा आवाज आणि ' वंदे मातरम् ' च्या घोषणा ऐकू आल्या. एका क्षणांत स्वदेशच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला. इतके दिवस प्रत्येक जण ज्या गोष्टीची वाट पाहत होता तो क्षण उगवला होता. लढाईला सुरवात झाली होती. अनंतदा आणि त्याचे सहकारी यांच्या त्या रणगर्जना होत्या. एक एका गोष्टीचा अर्थ आता त्याला स्पष्ट होऊ लागला. थोड्या वेळापूर्वीच एकाच्याजवळचें पिस्तुल खाली पडलेले त्याने पाहिलें होते. यापूर्वी सुद्धा क्रांतिकारक खाकी गणवेशांत रस्त्यांतून हिंडत, परंतु अशा वेळीं शस्त्र जवळ न बाळगण्याचा त्यांना हुकुम होता, आणि तो नियम अगदी कडकपणें अमलांतहि आणला जात असे. कारण गणवेशांतील लोक चटकन डोळ्यांत भरत आणि पोलिसांकडून एखादे वेळीं झडती घेतली

जाण्याचा संभव असे. प्रत्येकाला या नियमाची जाणीव होती. असें असताहि ज्या अर्थी आज क्रांतिकारक उघडपणे शस्त्रें घेऊन निघाले होते त्या अर्थी त्यांची योजना प्रत्यक्षांत आणण्याची वेळ येऊन ठेपली असली पाहिजे.–लढ्याची सुरवात झाली असली पाहिजे !

लढ्याची सुरवात झाली ! हा विचार मनांत येताच स्वदेश टेकडीच्या बाजूने धांवत सुटला. आपल्या अंगावर एक धोतर आणि बनियन याशिवाय कांही नाही याची सुद्धा त्याला शुद्ध राहिली नाही. त्याने आखलेले नकाशे आणि योजना यांचा त्या क्षणाला प्रत्यक्षांत उपयोग होत होता. अशा वेळी त्याला मागे राहणें शक्य नव्हते.

धांवत धावतच तो टेकाडाच्या पायथ्याशीं येऊन पोंहचला. टेकाडाच्या शिखरावर शस्त्रागार होते. तो वर चढू लागणार इतक्यांत वरून आवाज आलाः

"कोण आहे ? थांब !"

त्याच्या चेहऱ्यावर टॉर्चच्या प्रकाशाचा झोत पडला. तो एकदम उद्गारला : "मी आहे--स्वदेश रॉय. तुम्ही मला यायला सांगितलें नव्हते. परंतु बंदुकींचे आवाज आणि 'बंदे मातरम्' च्या घोषणा कानावर पडताच मीच आपणहून निघून आलो."

स्वदेशला जास्त कांहीं बोलायची जरुरी नव्हती. गणेशदा (गणेश घोष) एकदम खाली आला आणि त्याने स्वदेशला कडकडून मिठी मारली.

स्वदेश हा क्रांतिकारक पक्षाचा विश्वासू मित्र होता, परंतु हा आपला मित्र देशासाठीं एवढा त्याग करायला तयार होईल, प्रत्यक्ष आपले प्राण धोक्यांत घालायला तयार होईल अशी क्रांतिकारकांच्या पुढाऱ्यांची कल्पना नव्हती. त्याचा धंदा होता, आपल्या धंद्यांत तो कुशल होता आणि त्याच्यापासून पुष्कळच महत्वाची मदत होण्यासारखी होती ही गोष्ट त्यांना माहित होती. परंतु क्रांतिकारक कार्यासाठीं तो आपलें सर्वस्व अर्पण करायला तयार होईल असें मात्र त्यांना वाटलें नव्हतें.

त्या दिवसापासून स्वदेश पार्टीचा सभासद बनला, आणि त्या नात्याने पार्टीच्या सर्व चळवळींत भाग घेऊ लागला. चितगांव पासून कांही अंतरावर असलेल्या जलालाबाद टेकडीवर ब्रिटिश फौजेची आणि क्रांतिकारकांची जी लढाई झाली त्यात स्वदेश होता. रात्री अंधार पडल्यावर क्रांतिकारकांनी ती टेकडी सोडली. त्या लढाईत १०-१२ क्रांतिकारक कामाला आले होते. परतताना सूर्य सेनने सर्वांना सांगितलें कीं ज्यांना घरीं परत जाण्याची इच्छा असेल किंवा ज्यांना कुणी विश्वासू मित्र आपल्याला आश्रय देईल असें वाटत असेल, ते अजूनहि परत जाऊं शकतात. ज्यांची अज्ञातवासांतील कष्टमय आयुष्याला तोंड देण्याची तयारी असेल, वाटेल तो धोका पत्करण्यासाठीं जे तयार असतील त्यांनीच फक्त माझ्याबरोबर राहावें.

कांही जण त्या प्रमाणे निघून गेले. जलालाबाद येथे मृत्यूशीं समोरासमोर सामना घेण्याचा प्रसंग आल्यामुळे आणि विशेषतः आपल्या डोळ्या देखत दहा बारा सहकारी बंदुकीच्या गोळ्यांना बळी पडताना पाहिल्यामुळे त्यांनी कच खाल्ली. स्वतः मरायला तयार होणे फार सोपें आहे परंतु आपले जिवलग दोस्त आपल्या डोळ्यादेखत मरताना पाहणें, त्यांची प्रेतें तशीच तिथे कोल्ह्या कुत्र्यांसाठीं टाकून निघून जाण्याचा प्रसंग येणे आणि त्यानंतरहि आपलें मनोधैर्य न ढळू देणें ही गोष्ट फार कठीण आहे. कांही लोक अर्थातच घरी परत गेले परंतु त्यांची संख्या फार थोडी होती. बाकीच्यांनी परत जाण्याचें नाकारलें. ते म्हणाले, "आमच्या मित्रांना मागे संकटांत सोडून आम्ही स्वतःचा जीव वाचवायला पळून जाणार नाहीं. शिवाय जे मृत्यु पावले त्यांचें काय ? त्यांचा सूड उगविण्याचें काम तर अजून शिल्लकच आहे."

स्वदेश सुद्धा याच लोकांत होता. त्याने मनांत आणलें असतें तर त्याला सहज घरी परतता आलें असते. त्याच्या सारख्या व्यापार धंद्यांतील माण-साचा क्रांतिकारकांशीं कांहीं संबंध आहे असा पोलिसांना संशय सुद्धा आला नसता. परंतु त्याने इतरांना सोडून जाण्याचें नाकारलें.

त्यानंतर स्वदेश लपत छपत दिवस काढूं लागला. परंतु थोड्याच दिवसांत त्याला या आयुष्याचा कंटाळा आला. अशा रीतीने कांहीं न करता आणि लपत छपत किती दिवस काढणें शक्य आहे ? त्याचे मृत सहकारी जणू त्याला पुन्हां पुन्हां बजावित होतेः 'झाला एवढा उशीर पुरे झाला. आता एक क्षणसुद्धा दवडूं नकोस !' अखेर स्वदेशने मास्तरदांची परवानगी मिळविली आणि आपल्या पांच सहकाऱ्यांसह त्याने गांवाची वाट धरली. चितगांवमध्यें नदीच्या काठावर बाला-नटीन घाटाजवळ युरोपियनांची वस्ती आहे आणि तीवर हल्ला करण्याचा त्यांचा विचार होता.

परंतु त्याला मिळालेली बातमी चुकीची होती आणि अर्थातच तीवर आधारलेली त्यांची योजना यशस्वी होणें शक्य नव्हते. म्हणून हल्ला करण्याचा बेत सोडून ते नदीच्या किनाऱ्या किनाऱ्याने रजतच्या घराकडे निघाले. रस्त्यां-तच त्यांची आणि गांवांतील गुंडांची गाठ पडली. यापूर्वी त्यांच्या व या गुंडांच्या पुष्कळच चकमकी घडलेल्या होत्या व गुंड त्यांना वचकून होते. परंतु आता परि-स्थिति वेगळी होती. आता त्यांना सूड उगविण्याची संधी मिळाली होती. त्यांनी ताबडतोब पोलिसला खबर दिली आणि थोड्याच वेळांत पोलिस स्वदेश आणि त्याच्या सहकाऱ्यांचे मागावर निघाले. पोलिस आले तेव्हां क्रांतिकारक रजतच्या

घराजवळ येऊन पोंहचले होते, परंतु रजतच्या घरांत शिरणें त्यांना शक्य नव्हतें. त्याचप्रमाणें नदी ओलांडणेहि शक्य नव्हतें कारण जवळपास कुठेच एकहि नावाडी दृष्टीस पडत नव्हता. तरी सुद्धा ते नावेंत चढले आणि पलिकडच्या तीराकडे निघाले. पोलिस आणि गुंडांनीं सुद्धां दुसऱ्या एका नावेंतून त्यांचा पाठलाग करायला सुरवात केली. आरडा ओरडा करून पलीकडच्या तीरावर गर्दी जमा करण्याचा आणि अशा रीतीने त्यांची वाट अडविण्याचा त्यांनी प्रयत्न सुरू केला.

स्वदेश आणि त्याच्या सहकाऱ्यांनी नदी ओलांडली आणि ते कालारपोलच्या मार्गाने निघाले. पोलिस आणि फिरंगी बाजारचे गुंड त्यांच्या मागे होतेच. त्यांचा गलका ऐकून कालारपोलचे गुंडसुद्धा त्याना अडविण्यासाठीं पुढे आले. स्वदेशने व त्याच्या सहकाऱ्यांनी त्यांची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. आपण स्वातंत्र्यासाठीं लढत असून पोलिस आपल्या मागे लागले आहेत असेंहि त्यांना सांगून पाहिलें. परंतु गुंड ऐकेनात. अखेरीस आपला रस्ता मोकळा करून घेण्यासाठीं त्या गुंडांपैकी एकाला गोळी घालणें भाग पडलें.

परंतु ते फार लांब जाऊं शकले नाहींत. जवळच एक पोलिस स्टेशन होते. तिथून सशस्त्र पोलिस आले, व त्यांनी क्रांतिकारकांचा मार्ग अडविला. त्यांच्या मागे सुद्धा पोलिस आणि गुंड होतेच. अशा रीतीने दोन्ही कडून कैचींत सांपडलेल्या क्रांतिकारकांना सामना देण्याखेरीज दुसरा कसलाच उपाय नव्हता. समोरच एक शेत होते. त्या शेतांत पाणी अडविण्यासाठीं बांधलेल्या बांधांच्या आडोशाने त्यांनी गोळया झाडण्यास सुरवात केली. परंतु त्यांच्या जवळ पुरेशा गोळ्या सुद्धा नव्हत्या. प्रत्येका जवळ फक्त तीन काडतुसें होती. शिवाय नुसत्या पिस्तुलांच्या साहाय्याने पोलिसांच्या बंदुकांना तोंड देऊन यशस्वी होणें शक्यच नव्हते. थोड्याच वेळांत ही लढाई संपली. ब्रिटिश शिपाई शेत ओलांडून क्रांतिकारकांजवळ पोंहचले तेव्हां सहाहि क्रांतिकारकांची बंदुकांच्या गोळ्यांनी चाळण झालेली आढळली. स्वदेश, रजत आणि मनोरंजन कामास आले होते, देवू मृत्युपंथाला लागलेला होता, आणि मणींद्र व सुबोध यांना प्राणघातक अशा जखमा झालेल्या होत्या.

मास्तरदांना जेव्हां या लढाईची हकीकत कळली तेव्हां त्यांनी अत्यंत आदराने या हुतात्म्यांना अभिवादन केलें. ते म्हणाले " स्वदेशबद्दल आपण उगाच कोती कल्पना करून घेतली होती. तो किती शूर आहे याची आपल्याला माहितीच नव्हती !"

# शांति चक्रवर्ती

कॉम्रेड शान्ति चक्रवर्ती यांचा जन्म चितगांवच्या पंचक्रोशींतच समुद्र-काठच्या अगदी नजीक, एका ब्राह्मण कुटुंबांत झाला.

त्यांचे वडील स्वतः भिक्षुकी करीत. आणि हीच घरची वृत्ति आपल्या मुलाने चालवावी अशी वडिलांची इच्छा होती. पण शान्तिदाचे स्वतःचे विचार काही निराळेच होते. त्याला ब्रह्मकर्माच्या मंत्राशिवाय निराळेंच कांही तरी शिकायला हवें होतें. म्हणून तो शाळेत जाऊ लागला व तिथे त्याची एका दहशतवादी 'दादाची' (गुप्त दहशतवादी क्रांतिकारक पुढाऱ्याची) ओळख झाली. आपल्या पक्षांत नवे रिक्रूट सामील करून घेण्यासाठी इतर अनेक साधनांच्या जोडीला, व्यायाम हें साधन त्या वेळचे पुढारी अंमलांत आणीत. शान्तिदाने उत्तम शरीरबळ तर कमावलेंच, पण शिवाय त्याच्या अंगी उत्तम प्रतीचें संघटनाकौशल्यहि आहे असें या दादाला आढळून आलें.

मग शान्तिदाकडे एक शाळा सोपविण्यांत आली. परिणाम असा झाला कीं ह्या शाळेतून दुसऱ्या कोणत्याहि प्रतिस्पर्धी गटाला एकहि रिक्रूट मिळेनासा झाला. सगळ्या मुलांची याच्यावर अलोट भक्ति. हा स्वतः त्यांचा एक उत्तमपैकीं दादाच झाला.

तेव्हांपासून शान्तिदाच्या कार्याचा व्याप वाढतच गेला. त्यानें स्वतः पुढाकार घेऊन निरनिराळ्या ठिकाणीं व्यायामशाळा स्थापन केल्या. स्वतः व्यायाम शिक्षकाचें काम केलें, व अनेक तरुणांना आपल्या पक्षांत सामील करून घेतलें. त्याने केलेल्या नवीन सभासदांवर त्याच्या अंगच्या गुणांची चांगलीच छाप पडलेली दिसूं लागली. या सर्वांना घोड्यावर उत्तम प्रकारें बसतां येत असे, सगळे सशक्त व निरोगी असत. शान्तिदानें मॅट्रिक व्हावयाच्या आंतच शाळेला रामराम ठोकला व दहशत-वादी चळवळीला सर्वस्वी वाहून घेतलें.

माझा त्याच्याशी परिचय १९३२ साली झाला. आपल्या चळवळीच्या गुप्त कार्यकर्त्या दादांना भेटायच्या प्रसंगीं मला सोबत करण्यासाठीं म्हणून तो माझ्या-बरोबर येत असे. त्यावेळी मला त्याचें नांव ठाऊक नव्हते. व कसल्याहि

व्यक्तिगत गोष्टींची चौकशी कुणी कुणापाशी करायची नाही असा आमचा नियम होता. स्वतःबद्दल तर तो आपण होऊन क्वचितच बोले. पण आमचे पुढारी कोणतेहि काम करून घेण्याच्या बाबतींत त्याच्यावरच सर्वस्वी विसंबून रहात हें मला लवकरच कळून आलें. कार्यकर्त्यांना रहाण्यासाठीं गुप्त ठिकाणांची व्यवस्था तोच करी. हत्यारें व इतर साहित्य लपवून ठेवण्यासाठी जागा शोधायचें काम तोच करी. स्फोटक पदार्थ तयार करणें, हत्यारांची तपासणी करणें, तीं नीटनेटकीं ठेवणें, सी. आय. डी. वर पाळत ठेवणें, इत्यादि अनेक कामें तो करी. इतर राजकीय गटांतील लोकांच्या पोटात शिरून त्यांच्या बद्दलची बित्तंबातमी काढण्यांत तर त्याचा हातखंडा होता. "याला करता येणार नाही असं जगांत काम नाही"—हें मास्तरदाचें त्याच्याबद्दलचें मत मी अनेकदां ऐकलें आहे.

१९३२ च्या डिसेंबरांत मी फरारी झाल्यें. या पुढें शान्तिदाशीं अधिक परिचय करून घेण्याची संधि मला मिळाली. त्या वेळीं चितगांव शहरांत कर्फ्यू आर्डरचा अंमल होता. तरी आम्हाला सर्व हालचाली रात्रीच कराव्या लागत. एकदा काय झालें, पहाट व्हायच्या सुमारास शान्तिदा व आणखी एक कॉम्रेड, आमचा माल ठेवायच्या एका गुप्त सुरक्षित स्थळाकडे घाईघाईने चालले होते. ते ज्या रस्त्याने चालले होते तो रस्ता मिलिटरीने 'कॉर्डन' करून अडवला आहे हें शान्तिदाला ठाऊक नव्हतें. त्यांना सोजिरांनी अडवलें व तिथल्या तिथें अटक केली. त्यांच्याजवळ बेकायदा हत्यारें तर त्यावेळीं होतींच, शिवाय रात्रीपुरते कुठेतरी मुक्कामाला ठेवलेले फरारी कार्यकर्ते त्यांची वाट पहात होते व त्यांची व्यवस्था लावायची जबाबदारी त्यांच्यावरच होती. अशा परिस्थितींत अटकेंत राहून कसें भागणार? म्हणून शान्तिदानें सोजिरांना विचारलें "मी लघवीला जाऊन येऊं का?" त्यांनी त्याच्या मुसक्या सोडल्या. त्याच्या अचाट धाडशीपणाची त्यांना बिचाऱ्यांना काय कल्पना? त्यांनी त्याला थोड्या अंतरावरची एक जागा दाखवली व तिथें जाऊन यायला सांगितलें. तो तेथपर्यंत मुकाट्यानें चालत गेला आणि मग सुसाट पळत सुटला. सोजिरांनी वेड्यासारखा गोळीबाराचा सपाटा चालू केला. कांहीं तासांनी शान्तिदा पुन्हा आमच्या भेटीला सुरक्षितपणें हजर! त्याचें सर्वांग खरचटलेंलें. त्यावेळी तो जो आला तो आमच्या बरोबरच फरारी होऊन राहिला. या पराक्रमानंतर त्याला उघडपणें वावरणें शक्यच नव्हतें.

शान्तिदाच्या पराक्रमाची ही केवळ एक हकीकत झाली. त्याचा स्वार्थत्यागी स्वभाव व त्याचें प्रसंगावधान यांच्या योगानें कित्येक प्रसंगीं मोठमोठ्या धोक्यांतून आम्ही वांचलों आहोंत. फरारी जीवनाचा ताण असह्य होऊन आम्ही हताश व्हायची वेळ आलेली असतांना शान्तिदाच्या घरगुती विनोदानें व देशभक्तिपर गाण्यांनीं आमचा उत्साह टिकवून धरायला मदत केलेली आहे.

मास्तरदा आम्हाला त्याच्या पराक्रमाच्या कितीतरी हकीकती सांगे; आणि दर वेळीं असल्या हकीकतींचा समारोप करतांना म्हणे—"याची कर्तबगारी अचाटच ! याच्या मानानं पहातां आम्ही कांहीच केलेलं नाहीं."

लष्करी पोलिसांबरोबरच्या ज्या चकमकींत मास्तरदांस अटक झाली तींत शान्तिदा होताच. या चकमकींत शान्तिदाच्या उजव्या बरगडींत गोळी शिरली; त्याचा उजवा हात लुला पडला; तरी पण नुसत्या डाव्या हातानें त्याने एकसारखा गोळीबार चालूच ठेवला. या चकमकीनंतर तो पोलिसांच्या हातावर तुरी देऊन यशस्वी रीतीनें पसार झाला. त्याच्या जखमांची शुश्रूषा मीच केली. कितीहि दुर्धर संकट आलें तरी न डगमगतां तो शांतपणें व निर्धारानें सर्व संकटांना तोंड द्यायला कसा तयार असे हें त्या वेळीं मला पाहायला मिळालें. खराखुरा अस्सल क्रान्तिकारक शान्ति मला त्या वेळी उमगला.

१९३४ साली त्याला अटक होऊन ८ वर्षांची सक्तमजुरी मिळाली. त्या वेळी तुरुंगांत असलेल्या बहुतेक दहशतवादी राजबंद्यांना राजकीय धोरण या नात्यानें दहशतवादाचा फोलपणा उमगला व त्यांनीं दहशतवाद सोडून देऊन कम्युनिझम स्वीकारला. पण शान्तिदा व त्याच्या बरोबरचे चितगांवचे बहुतेक राजबंदी या नव्या विचारप्रवाहाला कांहीं काळ विरोध करीत राहिले. पक्की खात्री पटल्याशिवाय शान्तिदा आपलीं जुनीं मतें बदलायला कबूल होईना.

पण प्रत्येक प्रामाणिक क्रांतिकारक हा कम्युनिझमकडे आल्याशिवाय राहणें शक्यच नाहीं. तसा शान्तिदा देखील कम्युनिझमकडे आलाच. त्याला थोडा वेळ लागला इतकेंच काय तें. अंदमान बेटावरील बंदिगृहातील राजबंद्यांच्या कम्युनिस्ट गटांत तो सामील झाला. १९३९ च्या मे महिन्यांत शान्तिदा जेलमधून सुटला. त्याची प्रकृति साफ ढांसळली. त्याचे हात, पाय, तोंड, सर्वांगावर सूज आली. डॉक्टरनें त्याला पूर्ण विश्रांति घेण्यास सांगितलें. पण विश्रांति तो घेईल तर ना ? त्यानें किसानांची संघटना करण्याचें काम लगोलग चालू केलें. त्याच्या कार्याचा प्रभाव किसान चळवळीत दिसूं लागला. कॉंग्रेस सोशालिस्टांचें वजन विशेष

असलेले टापू देखील आमच्या झेंड्याखालीं आले. पार्टीला शान्तिदाच्या गुणांची ओळख पटली. म्हणूनच तुरुंगांतून बाहेर आल्यावर अवघ्या एक महिन्यांत पार्टीनें त्याला सभासद करून घेतलें. इतर माजी दहशतवाद्यांना सहासहा महिने, किंबहुना वर्ष वर्षभर देखील, उमेदवारी करावी लागली.

साम्राज्यशाही युद्धाच्या काळांत कॉ. शान्तिदा गुप्तपणें चळवळ करूं लागला. आपल्या संघटनाचातुर्यानें व 'टेक्निकल' कर्तृत्वाच्या योगाने त्यानें पार्टीची गुप्त संघटना सुरक्षित ठेवली. तो आपल्या जिल्हा कमिटीचा 'टेक्निकल सेक्रेटरी' होता.

आजन्म हालअपेष्टा सोसाव्या लागल्यामुळें शान्तिदाची प्रकृति जी ढांसळली ती ढासळलीच! त्याला बहुतेक दररोज ताप येई; तरी त्यानें आपलें कार्य कांहीं बंद ठेवलें नाहीं. विश्रांति घ्यायचा त्यानें मुळीं कधी विचारच मनांत आणला नाही. पार्टीकार्य नीट चालू ठेवण्यासाठी तो अविरत काम करीत राहिला. कधी कधी अंगात सपाटून ताप असतांना सुद्धा तो पंचवीस पंचवीस तीस तीस मैल पायपीट करीत असे!

लोकयुद्धाच्या काळांत पार्टीवरची बंदी उठली व आपले गुप्त कार्यकर्ते उघड कार्य करू लागले. पण त्याच सुमारास राष्ट्रीय अरिष्ट व अन्न संकट यांच्या फेऱ्यांत आपला देश सांपडला. या दोन अरिष्टांनीं आपल्या जनतेला व तिच्याच बरोबर आपल्या कॉम्रेडसना चांगलें भरडून काढलें.

पुरेसें अन्न नाहीं, धड औषधपाणी नाही, अशा स्थितीत एकाच वेळी रोग व उपासमार या दोन शत्रूंशीं शान्तिदाला सामना देववेना. पण त्यानें आपले हातपाय उभे होते तोंवर पार्टीचा जिल्हा ऑर्गनायझर या नात्यानें करायच्या कामांत मात्र मुळींच खंड पडू दिला नाही. ता. २३ जुलै १९४३ रोजी शान्तिदाचें देहावसान झालें. त्याला सुखानें मरण आलें नाहीं. त्याला जगण्याची जबरदस्त हांव होती. पार्टीच्या झेंड्याखालीं असेंच अविरत काम करीत रहावें ही एकच ईर्ष्या त्याच्या मनांत होती. चितगांव शहरानें आपल्या थोर परंपरेला साजेसें कार्य करून दाखवावें, उपासमारीच्या दडपणाखालीं जनतेचें मनोधैर्य खचूं नये, जपानी जर स्वारी करून आले तर सूर्य सेन, गणेश घोष व अनंतसिंह यांच्या मायजिल्ह्यांत या जपान्यांचें स्वागत गोळ्यांच्या वर्षावानें व्हावें ही एकच इच्छा शान्तिदाच्या मनांत होती.

# टेग्रा

तो दिवस १९३० च्या २२ एप्रिलचा होता. त्या दिवशीं चितगांवच्या क्रांतिकारकांची ब्रिटिश लष्कराशीं पहिली चकमक उडाली. चितगांवच्या जवळच जलालाबाद टेकडीवर ही झटापटीची घटना घडली.

या झटापटींतच 'टेग्रा' बळी पडला. आमच्या क्रांतिकारक पक्षांत तोच वयानं सर्वांत लहान म्हणजे १४ वर्षांचा होता. आणि त्यानेंच या पहिल्या लढाईंत प्रथम बलिदान करण्याचा मान पटकवला.

वस्तुतः टेग्रा त्या लढाईंत नसायचाच. त्या लढाईची योजना आंखण्यांत आली तेव्हां त्याचें नांव वगळण्यांतच आलें होतें. कारण एक तर तो अत्यंत लहान, अतिशयच कोंवळा पोर होता. दुसरं असं कीं तो आपल्या तीन भावांत सगळ्यांत धाकटा होता. त्या तीन भावांपैकीं सगळ्यांत वडील भाऊ घर सांभाळायचा. त्याच्या खालचे दोघे, लोकनाथ व टेग्रा क्रांतिकारकांना जाऊन मिळाले. त्यांच्या आईचा आपल्या तीन मुलांपैकीं धाकट्या दोघांवर–लोकनाथ व टेग्रावर फार जीव होता. ( लोकनाथ बाल याला जन्मठेपेची शिक्षा झालेली असून तो हल्लीं तुरुंगांत आहे. ) त्या दोघांनीं क्रांतिकारक चळवळींत भाग घेतला यांबद्दल त्या माउलीला अभिमानहि वाटे. पण सूर्य सेन–मास्तरदा–जवळ तिनें शब्द टाकला "माझीं दोन्हीं मुलं नका नेऊं. टेग्राला तरी मजजवळ राहूं द्या." मास्तरदांनीं हें म्हणणं कबूल केलं. टेग्रानें आईजवळ राहून आमच्या लढाईनंतर पुनः दुसऱ्या लढाईची सर्व तयारी करावी असं ठरलं. यामुळें जलालाबाद टेकडीवरील लढाईची योजना आंखतांना टेग्राचें नांव वगळण्यांत आलें होतें.

त्या लढाईच्या चारच दिवस पूर्वीं–१८ एप्रिलची गोष्ट. टेग्रा आपल्या संवगड्यांबरोबर तळ्यांत डुंबायला गेला होता. एकदां पाण्यांत शिरल्यावर त्यांना वेळेचें भानच उरलें नाहीं. एकमेकांची पाठशिवणी करण्यांत व पाण्यामध्यें खेळण्यांत ते इतके दंग झाले कीं वेळ कसा गेला तें त्यांच्या ध्यानांतच आलें नाहीं. अखेर ते बाहेर निघाले तों तीन तास होऊन गेलेले! टेग्रा अतिशय विरमून खाली मान घालून घरीं गेला. त्याला इतका उशीर झालेला पाहून

आईचा राग अनावर झाला होता व त्या रागाच्या भरांत तिने टेग्राच्या कानशिलांत एक सणसणीत थप्पड ठेवून दिली.

टेग्रानें जेवण वर्ज्य केलें व तो फुरंगटून बसला. काय म्हणून आईनें एवढें संतापावें? जणूं काय तिला त्रास देण्यासाठींच तो इतका वेळ पाण्यांत बसला होता ! एवढ्याशा चुकीबद्दल इतका संताप म्हणजे काय न्याय झाला ?

सबंध दिवस टेग्रा रागानें धुमसून बसला होता. कुणाशीं बोलेनाच तो. पण संध्याकाळीं त्याला आपल्या भावाच्या—लोकनाथच्या क्रांतिकारक मित्रांची हालचाल कांहीं तरी ' निराळी ' असल्याचं आठवलं. ते कशाची तरी ' तयारी ' करण्यांत गुंगले असावेत अशी त्याची खात्री झाली. या प्रकारामुळें टेग्राच्या नाकावर बसलेला राग–घुस्सा–कुठेंतरी पळून गेला व तो आपल्या भावाचा पाठलाग करीत करीत थेट काँग्रेस हाऊसवर पोंचला. त्या ठिकाणीं मास्तरदा आपल्या शिष्यांना लढाईची व्यूहरचना समजावून सांगत होते. टेग्राकडे त्यांचें लक्ष्य गेले तेव्हां त्याला घरीं परत पाठवण्याची कुणीतरी सूचना केली. पण कामावर निघण्याची वेळ झालेली असल्यामुळें आतां टेग्राला पाठविणें शक्य नव्हतें. अखेर टेग्रालाहि सामील करून घेण्याचें ठरलें व अशा रीतीनें अचानक त्याला त्या क्रांतिकारकांच्या दलांत प्रवेश मिळाला. शस्त्रागारावरील हल्ल्यांत जीं शस्त्रास्त्रें हातीं येतील त्यांची वर्गवारी करून वांटणी करण्याचें काम ज्या गटाकडे सोंपविण्यांत आलें होतें त्या गटांत त्याची नेमणूक करण्यांत आली.

चितगांव शस्त्रागारावरील हल्ल्याची योजना अशी होती कीं, शस्त्रागारावरील हल्ल्याबरोबरच पोलिस लाइन्सवरहि हल्ला चढवून त्यांचा बींमोड करावयाचा. चितगांव जिल्ह्यांत बाहेरून लष्कर येण्याचा मार्गहि बंद करण्याचें ठरलें होतें. ही योजना पूर्णपणें पार पडली असती म्हणजे सात दिवसपर्यंत चितगांव क्रांतिकारकांच्या हातीं राहिलें असतें व चितगांवला सात दिवसपर्यंत स्वातंत्र्याचा दिव्य अनुभव घ्यायला मिळाला असता. त्यानंतर सातव्या दिवशीं ब्रिटिश फौजांची कुमक येऊन पोंचली म्हणजे चितगांवच्या स्वातंत्र्याचें संरक्षण करण्यासाठीं एकूण एक क्रांतिकारकांनीं धारातीर्थीं देह ठेवण्याची प्रतिज्ञा केली होती.

पण शस्त्रागारावर हल्ला केल्यानंतर सात दिवसपर्यंत चितगांववर स्वातंत्र्याचा झेंडा फडकत ठेवण्याचें त्यांचें स्वप्न अपुरें राहिलें. हल्ल्याच्या दुसऱ्याच दिवशीं शत्रूच्या हल्ल्याला तोंड देत रानोमाळ भटकण्याचा त्यांच्यावर प्रसंग आला.

या लढाईंत टेग्राहि शौर्याची शिकस्त करीत होता. ते दऱ्याखोऱ्यांतून उंच कड्यावर चढत होते. अन्नपाण्याचा पत्ता नव्हता. पण त्यांच्या ध्येयवादानें त्यांना इतकें भारलें होतें कीं भूक अथवा विश्रांतीचा विचार करण्याला त्यांना फुरसत नव्हती. दिवसाच्या वेळीं ते त्या ओसाड टेकड्यांवर झाडाझुडपांचा आधार घेऊन पालथे पडत व एप्रिलच्या कडक उन्हाचा ताप सहन करीत. रात्रींच्या गडद काळोखांत भूक व तहानेनें व्याकुळ झालेले ते जीव पायाची आग होत असतांहि तिकडे दुर्लक्ष करीत, व पुढें मार्गक्रमण करीत.

चार दिवस असे काढल्यानंतर एप्रिलच्या २२ तारखेला अंबिकादानें ( अंबिका चक्रवर्ती-हल्लीं जन्मठेपेची शिक्षा भोगत आहेत ) कोठून तरी दोन अर्धवट पिकलेलीं कलिंगडं मिळवून आाणलीं. व्यवस्थितपणें त्यांचे ६० तुकडे करण्यांत आले. त्या तुकडींत एकूण ५८ क्रांतिकारक होते. अंबिकादानें प्रत्येकाला एकएक तुकडा वांटण्याची आज्ञा दिली.

एका लहान तुकड्यानें कुणाचीच भूक वा तहान भागणें शक्य नव्हतें. उलट ती चाळवल्यामुळें जीव अधिकच व्याकुळ व्हायचा. परंतु सर्वांनीं बिनतक्रार ओळीनें येऊन एकएक तुकडा उचलला. पण सर्वांची पाळी झाल्यावर दोन तुकडे शिल्लक राहावयास पाहिजे होते ते नाहींसे झाल्याचें आढळलें!

लढाईच्या मैदानांत अंबिकादाची शिस्त किती कडक होती हें त्या सर्वांना पूर्णपणें ठाऊक होतें. क्रांतिकारकांची शिस्त वा नीतिनियमाचें किंचित सुद्धां उल्लंघन झाल्याचें त्याला खपणार नाहीं हेंहि प्रत्येक जण जाणून होता. त्यानें सबंध तुकडी रांगेंत उभी करून विचारलें: "उरलेले दोन तुकडे कुणी उचलले ?"

टेग्रा निर्भयपणें पुढें होऊन उत्तरला:

"मी उचलले. माझ्या पोटांत भुकेचा डोंब भडकला होता, म्हणून."

टेग्राला आपली चूक कळून आली होती व तो त्याबद्दल शिक्षा भोगण्यास तयार झाला होता.

टेग्रा पुढें आला तेव्हांच आतां काय होणार या शंकेनें सगळ्यांनीं आपले श्वास रोंखून धरले होते. टेग्राचा कबुलीजबाब ऐकून अंबिकादानें पाय उचलला तेव्हां तर त्यांच्या हृदयाची धडधड बंद पडली.

अंबिकादानें टेग्राच्या दोन्ही गालांवर पांचहि बोटें उमटवून त्याला परत रांगेंत जाऊन उभें राहण्याची आज्ञा दिली.

सगळ्यांचा जीव भांड्यांत पडला.

ही घटना होऊन थोडाच वेळ झाला होता. अचानक बंदुकीच्या गोळ्या सुटल्याचे आवाज ऐकूं आले. क्रांतिकारकांच्या पथकानें त्या अंधारांत तात्काळ जलालाबाद टेकडी चढून जाण्याची तयारी केली. तेवढ्यांत पलीकडच्या टेकडीवरून ब्रिटिश फौजांनीं गोळ्यांचा वर्षाव सुरू केला. हा हल्ला परतविण्यासाठीं क्रांतिकारकांच्या पथकानें बंदुका सावरल्या तोंच ब्रिटिशांची एक गोळी लागून टेग्रा खालीं कोसळला. 'ओपन फायर'चा हुकुम मिळण्यापूर्वीं क्रांतिकारकांच्या पथकाचे आघाडीवरचे वीर खालीं कोसळले होते.

पण तशाहि स्थितींत टेग्रानें त्या लढाईंत मर्दुमकी गाजवली. छातींत गोळी लागलेली असतांहि त्यानें पडल्या पडल्या बंदुकीचा चाप ओढून सरबत्ती सुरू केली. चकमक बंद पडेपर्यंत तो चिकाटीनें बंदूक चालवीत होता. हल्ला परतवून लावल्यानंतर तेथून माघार घेणें आवश्यकच होतें. पण जखमेंतून सतत रक्त-स्राव झाल्यामुळें टेग्राची सर्व शक्ति खचून गेली होती. त्याच्या घशाला कोरड पडली होती व जीभ आंत ओढली जात होती. आपला भाऊ शेजारीं उभा होता त्याच्याकडे पाहून तो खोल आवाजांत म्हणाला: 'दादा, थोडं पाणी!' त्याचा दादा कडक शिस्तींत वाढलेला क्रांतिकारक होता. त्यानें कठोरपणें उत्तर दिलें:

"असला दुबळेपणा क्रांतिकारकांना शोभत नाहीं."

टेग्रा निपचित पडून राहिला.

पहांटेच्या अंधुक उजेडांत जलालाबाद टेकडीवर आढळलेलीं प्रेतं मोजण्यांत आलीं. त्या ११ प्रेतांपैकीं एक टेग्राचें होतें.

टेग्रा चितगांवच्या म्युनिसिपल स्कूलमध्यें नववींत शिकत होता तेव्हां त्याच्या हट्टी व एककल्ली स्वभावामुळें त्याच्या दोस्तांनीं 'टायगर' (वाघ) असें त्याचें टोपणनांव ठेवलें. खोडकरपणाबद्दल त्याची ख्याति होती खरी, पण तरीहि तो सर्वांना हवाहवासा वाटे. त्यामुळें पोरांनीं खिजविण्यासाठीं म्हणून ठेवलेल्या 'टायगर' नांवाचें 'टेग्रा' मध्यें रूपांतर झालें व त्याच नांवानें तो ओळखला जाऊं लागला.

टेग्राचा चेहरा फार आकर्षक व कोंवळा दिसे. तो होताहि उमदा नि सशक्त. १९२७-२८ मध्यें तिथल्या क्रांतिकारकांनीं तरुण पोरांना शिकवून तयार करण्यासाठीं व्यायामशाळा उघडल्या तेव्हां आपल्या दोन भावांबरोबरच टेग्राहि तेथें जाऊं लागला. आपल्या भावांबरोबरच त्यानें क्रातिकारकांनीं घ्यावयाची शपथ घेतली.

तलवार व जंबियाचे हात त्यानें शिकून घेतले. बॉक्सिंग, घोड्यावर बसणें, बंदुक चालविणें, यांतहि तो तरबेज झाला.

शस्त्रागारावरील हल्ल्यानंतर मी त्याच्या आईला भेटल्यें. चितगांवच्या पथुरियाघाट भागांत माझ्या मावशीच्या घराशेजारींच त्यांचं घर होतं. टेग्राच्या आईला रडूं कोसळलें. स्वतःलाच दोष लावून ती म्हणाली, "त्या दिवशीं मी त्याच्यावर संतापल्यें म्हणूनच तो लढायला गेला." टेग्राच्या मृत्यूनें शेजाऱ्या-पाजाऱ्यांच्या डोळ्यांत पाणी उभं राहिलं. आडदांड, साहसी टेग्रा सगळ्यांचाच आवडता होता.

पण दुर्दैवानें आज चितगांवमध्यें दिसणारीं टेग्राच्याच वयाचीं पोरं अतिशय निराळीं आहेत. नुकताच एक दहाबारा वर्षांचा मुलगा मी पाहिला. त्याचे गाल खप्पड होऊन गालफडं वर आलेलीं होतीं. त्याच्या चेहऱ्यावर पोरपणा कसा तो दिसतच नव्हता. त्याच्या शेजारींच एक वीस-पंचवीस वर्षांची स्त्री ठाण मांडून बसली होती. त्या रस्त्याच्या पलीकडे एक लष्करी कँप होता, तिथल्या बबर्जीखान्यांतल्या आचाऱ्यांशीं तिची थट्टामस्करी चालू होती. मी त्या पोराशीं बोलूं लागल्यें तेव्हां त्यानें ती बाई कोण हें आपल्याला माहित नसल्याचें सांगितलें. 'या ठिकाणीं शिळंपाकं अन्न व पावाचे तुकडे मिळतील या आशेनं मी इथं आलों आहे,' तो म्हणाला. आपण गरीब, अनाथ असल्याचें सांगून लगेच त्यानें आपला बाप दोन रुपये रोजावर मजुरी करून सगळ्या कुटुंबाचें पोट भरतो, असेंहि त्यानें सांगून टाकलें ! आपलें वय १५ वर्षांचें असून कधींच शाळेचें तोंड न पाहिल्याचीहि त्यानें माहिती दिली. त्याचीं उत्तरें उघडउघड उडवाउडवीचीं होतीं व तो परस्परविरोधी वाक्यांची खैरात करीत होता. तरीसुद्धां त्यानें सांगितलेली सबंधच माहिती बनावट असेल असं मला वाटलं नव्हतं. परंतु तो निघून जातांच तेथेंच शेजारीं राहणाऱ्या एका माणसानें मला सांगितलें कीं हा मुलगा रोज बबर्जीखान्यांत येतो व कँपमधील सोजिरांना त्या स्त्रीचें शरीर विकून स्वतःचें पोट जाळणें हा त्याचा धंदा होता !

आज असलीं अनीतीच्या मार्गाला लागलेलीं अनेक कोंवळ्या वयाचीं पोरं चितगांवच्या रस्त्यावर हिंडतांना आढळतात.

पण रस्त्यावर उनाडणाऱ्या या पोरांनाच फक्त काय म्हणून दोष द्यायचा ? रोज शाळेंत जाणाऱ्या मुलांच्या अंतःकरणांत तरी कोठें ध्येयवादाचा व जीवनाचा सुवास दरवळतोय ? त्यांच्यांत तरी बाणेदारपणाचं पाणी कोठें आहे ? धरमपूर

हायस्कूलमध्यें आठवींतलीं पोरं मास्तरला विचारतातः "मास्तर, थोडं लाल पाणी ( दारू ) घेणार ?" अशा पोरांपुढें मास्तर कपाळाला हात लावण्यापली-कडे काय करणार ? आणि मास्तर सर्द झाला म्हणजे तीं पोरं आपल्या खिदळ-ण्यानं सारा वर्ग डोक्यावर घेतात. आपण केवढा प्रचंड विनोद केला, असें वाटून ते स्वतःला कृतकृत्य समजतात ! हे आमचे 'विद्यार्थी !'

चितगांवमध्यें टेग्रासारखीं मुलं होतीं तेव्हां त्यांच्या आईबापांना आपल्या मुलांमुलींचा अभिमान वाटे. मुलांमुलींचे संबंधहि त्या काळांत अत्यंत खेळीमेळीचे व निर्मळ असत. त्यामुळें चितगांवच्या आसपासच्या खेड्यापाड्यांतूनहि मुलांमुलींच्या सहशिक्षणाची प्रथा चालू होती. पण आज त्या संबंधांत विष कालवलें गेलें आहे. वर्गांत ग्रीस व रोमच्या वीरकथा शिकवतांना व्हीनसच्या—सौंदर्यदेवतेच्या—वर्णनाचा भाग आला म्हणजे मुलं आपल्या वर्गातल्या मुलीं-विषयीं अचकट-विचकट कोट्या करून हीः हीः हसतात ! साथझरी हाय-स्कूल हें लष्करी बराकींच्या अगदीं जवळ आहे. त्या रस्त्याच्या बाजूला मैलाच्या व फर्लांगांच्या प्रत्येक दगडावर मुलांनीं शाळेंतल्या मुलींचीं नांवें वगैरे सर्व माहिती कोरून ठेवलेली आहे. सोजिर येतांजातां तें वाचतात, फिदीफिदी हंसतात, अश्लील बडबड करतात अन् मुलींना त्रासहि देतात.

या गोष्टी इतक्या थराला जाऊन पोंचल्या आहेत कीं अगदीं सुधारलेल्या लोकांना सुद्धां सहशिक्षणाचा वीट आला आहे.

★

गेल्या जुलै महिन्यांत चितगांवच्या तरुणांसाठीं एक व्यायामशाळा उघडण्यांत आली आहे. आरंभीं २२ पोरं त्यांत येऊं लागलीं, पण आतां ती संख्या थोडी वाढली असून ३३ तरुण रोज तेथें येऊन व्यायाम करतात. गांवचे सार्वजनिक कार्यकर्तेहि या कामांत लक्ष घालत आहेत. सूर्य सेन आणि टेग्रा यांचे जे सहकारी तुरुंगांतून बाहेर आले आहेत ते या तरुणांना मदत करतात व त्यांना सूर्य सेन व टेग्रा यांच्या जीवनापासून प्रेरणा मिळवण्याची शिकवण देतात. सूर्य सेन व टेग्राच्या सहकाऱ्यांपैकीं बहुतेक क्रांतिकारक कम्युनिस्ट पार्टींत सामील झालेले आहेत. ते या व्यायामशाळेची नीट वाढ व्हावी यासाठीं झटत आहेत. पण व्यायामशाळेची खरी भिस्त शाळाकॉलेजांतल्या विद्यार्थ्यांवरच आहे. विद्यार्थी संघाचा चिरेन सर-कार हा व्यायामशाळेचा एक कार्यकर्ता आहे. विद्यार्थी संघाच्या कार्याबद्दल संशय बाळगणारे विद्यार्थीहि उत्साहानें व्यायामशाळेचें कार्य करूं लागले आहेत. अजून-

हि ते विद्यार्थी संघांत सामील झाले नसले तरी संघाच्या कार्यकर्त्यांनाहि त्यांच्याविषयीं अधिक आपलेपणा वाटूं लागला आहे.

एक दिवस धूम्रपानाच्या व्यसनाविषयीं चर्चा झाली. संस्थेंत येणाऱ्यांना धूम्रपानाला बंदी होती, पण एकदोन पोरं चोरून सिगारेट ओढीत असत. या चर्चेच्या वेळीं सगळ्या मुलांनीं त्या व्यसनाधीन पोरांकडे टक लावून पाहण्यास सुरवात केली. त्या वेळेपासून ते लाजेनें अर्धमेले झाले व त्यांनीं संस्थेंत येणेंच टाकलें! पण इतरांचा उत्साह मात्र दांडगा आहे. आदर्श नागरिक बनून चितगांवचें नांव उजळ करण्यासाठीं ते मनापासून झटत आहेत.

टेग्राच्या बलिदानाला फार वर्षं झालीं नाहींत. पण या काळांत आपल्या राष्ट्राची अशी कांहीं विलक्षण अवस्था झालेली आहे कीं टेग्रानें आपल्या बलिदानानें निर्माण केलेली परंपरा छिन्नविच्छिन्न होऊन गेलेली आहे. टेग्राचे पुढारी व सहकारी आज पंधरा वर्षांनंतरहि तुरुंगांतच खितपत आहेत. त्यांना आपण सोडवून आणूं शकलों तर चितगांवच्या कुटुंबांचं नांव उज्ज्वल करणारे टेग्रासारखे अनेक कुलदीपक पुनः निर्माण होतील.

---

ता. ...........
सातारा.

# एकेकाळीं सारेच आम्हांला पाठिंबा देत होते

सन १९३७ सालची गोष्ट. नव्या राज्यघटनेचा अंमल सुरू झाला. प्रत्येक प्रांतात आपलीं मंत्रिमंडळें आलीं. आपलीं देशोधडीला लागलेलीं मुलें आतां घरीं परत आणलीं जातील अशी आशा लोकांना वाटूं लागली.

तुरुंगांत आमच्या आनंदाला पारावार उरला नाहीं. आमच्या आशेचे मनोरे उंचच उंच चढूं लागले. सात प्रांतांमध्यें कॉंग्रेसची मंत्रिमंडळें आलीं. आणि बाकीच्या प्रांतांत जरी कॉंग्रेसचीं नसलीं तरी आपल्या देशबांधवांचीं मंत्रिमंडळें आलीं होतीं. म्हणूनच आमची तावडतोब सुटका होणार या विचारानें आम्हीं आनंद सागरांत पोहूं लागलों. त्या काळीं या खेरीज दुसरा विचारच आमच्या मनीं नव्हता.

कोमिल्लाचा मॅजिस्ट्रेट स्टीव्हन्स याचा खून केल्याच्या आरोपावरून शांती आणि सुनीति यांना जन्मठेपीची शिक्षा सुनावण्यांत आली त्यावेळीं त्यांचे वकील श्री. बी. सी. चटर्जी यांनीं म्हणे त्या दोघींना सांगितलें:

"जरी तुम्हांला जन्मठेपीची शिक्षा झाली आहे तरी तुम्हांला फार दिवस तुरुंगांत काढावे लागणार नाहींत. नवीन राज्यघटनेबरोबरच सार्वत्रिक शिक्षामाफी होईल आणि तुम्ही सगळे लोक सुटाल." म्हणजे आमचा आशावाद अगदींच निष्कारण नव्हता.

परंतु प्रांतिक मंत्रिमंडळें आमच्या सुटकेसाठीं कांहींच प्रयत्न करीत नसल्याचें दिसून आलें.

अंदमानच्या राजबंद्यांनीं फार वेळ वाट पाहिली. शेवटीं कंटाळून त्यांनीं पुढील मागण्या मिळविण्यासाठी अन्नसत्याग्रह सुरू केला; (१) अंदमानांतून आपल्याला स्वदेशीं आणावें (२) सर्व राजबंद्यांना दुसरा वर्ग मिळावा आणि (३) सरसकट सर्वांची सुटका व्हावी. आम्ही सारे एक आहोंत आणि अंदमानच्या राजबंद्यांच्या मागण्यांना आमचा पूर्ण पाठिंबा आहे हें दाखविण्यासाठीं हिंदुस्थानांतील सर्व राजबंद्यांनीं सुद्धां त्याचवेळीं अन्नसत्याग्रह सुरू केला.

[stamp]

राजबंद्यांच्या मागण्यांना पाठिंबा देण्यासाठीं सारा देशभर प्रचंड चळवळ सुरू झाली. देशांतील या टोकापासून त्या टोकापर्यंतची अखिल जनता काळजीनें अस्वस्थ झाली. आमचा कैवार घेण्यासाठीं गांधीजी व इतर पुढारी पुढें सरसावले.

बंगाल सरकारनें पहिल्या दोन मागण्या देण्याचें ताबडतोब आश्वासन दिलें. तिसऱ्या मागणीचा विचारम ागाहून होणार होता.

गांधीजींनीं या राजबंद्यांना कळवलें कीं " तुम्हाला मी एका वर्षाच्या आंत मुक्त करून स्वदेशी परत आणीन. तुम्ही आपला अन्नसत्याग्रह थांबवा. "

१९३७ च्या नोव्हेंबर पासून अंदमानांतून राजबंद्यांची स्वदेशीं रवानगी झाली. बंगालचे सुपुत्र बंगालच्या तुरुंगांत परत आले.

१९३८ च्या सुरवातीला माझे वडील तुरुंगांत मला भेटण्यासाठीं आले. माझ्या सुटकेसाठीं रवींद्रनाथ जातीनें गव्हर्नरशी बोलणें करीत आहेत असें त्यांनीं मला सांगितलें आणि रवींद्रनाथांच्या हातचें आपल्याला आलेलें पत्र मला दाखविलें. त्या पत्रांत लिहिलें होतें: " तुमच्या मुलीसाठीं मला जें करणें शक्य होतें तें सारें कांहीं मी केलें आहे. निर्णय अद्यापि व्हावयाचा आहे. माझे प्रयत्न व्यर्थ जाणार नाहींत अशी मला आशा आहे. " मलाहि शुभाशीर्वादाच्या चार ओळी त्या पत्रांत होत्या. आमच्या सुटकेसाठीं रेव्हरंड सी. एफ. अँड्रूज किती कसून यत्न करीत आहेत त्याचीहि माहिती वडिलांनीं मला सांगितली. अँड्रूजनीं वडिलांना लिहिलेल्या एका पत्रांत म्हटलें होतें : " तुमच्या मुलीच्या सुटकेसंबंधांत मी गव्हर्नरना भेटणार आहे. त्या भेटीचे वेळीं ईश्वराची प्रार्थना करा म्हणजे कार्य सिद्धीस जाईल" माझी सुटका झाल्याबरोबर त्याच दिवशीं आपल्याला तारेनें कळवावें अशीहि विनंति त्यांनीं वडिलांना केली होती .

माझे वडील गांधीजींनाहि भेटले. सर्व राजबंद्यांच्या सुटकेसाठीं आपण प्रयत्नांची पराकाष्ठा करूं असें गांधीजींनीं त्यांना आश्वासन दिलें. मध्यंतरीं आम्हालाहि गांधीजी तुरुंगांत येऊन भेटले.

गांधीजींनीं मला सांगितलें कीं "तुला व शस्त्रागार खटल्यांतील इतर कैद्यांना सोडायला नाझीमुद्दीन ( त्या वेळचे गृहमंत्री ) खळखळ करताहेत. पण मी माझ्याकडून प्रयत्नांची शिकस्त करीन. "

मी यामुळें नाउमेद मुळींच झाल्यें नाहीं. कांहीं झालें तरी माझी सुटका होणार याची मला खात्री होती. कारण गुरुदेव रवीन्द्रनाथांसारखीं माणसें आमच्या सुटकेसाठीं झगडत होतीं, सी. एफ. अँड्रूज सारखे परदेशी गृहस्थ राजबंद्यांच्या न्याय्य मागण्यांना सहानुभूति दर्शवून त्यचांया सुटकेसाठीं प्रयत्नांची पराकाष्ठा करायला तयार होते. अर्थात आमची सुटका होणें अनिवार्य होतें.

आम्ही मुली सगळ्या सुटलों. स्थानबद्धहि सुटले परंतु शिक्षा झालेल्यांपैकीं फारच थोड्या राजबंदींची सुटका झाली.

माझ्या सुटकेनंतर मी रवीन्द्रनाथ व अँड्रूज यांना त्यांच्या प्रयत्नांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीं पत्रें लिहिलीं. गुरुदेवांनीं मला असें उत्तर धाडलें :

"तुझें पत्र मिळालें. वाचून आनंद झाला. किती तरी कालावधीनंतर तुझें स्वातंत्र्य तुला परत मिळालें आहे. आतां तुला दिवसेंदिवस शांति व सामर्थ्य यांचा अधिकाधिक लाभ होत राहो. आपल्या देशांत अद्यापि अनेक कामें करावयाचीं राहिलेलीं आहेत. आणि तीं करण्यासाठीं खंबीर व शिस्तनिष्ठ मनाची जरूरी लागेल. आतापर्यंत भोगलेल्या हालअपेष्टांचा अनुभव तुझ्या जीवनाला पूर्णता आणो हाच माझा तुला आशीर्वाद.

तुझा हितचिंतक

२४-६-३८

**रवीन्द्रनाथ टागोर**

अँड्रूज यांच्याकडूनहि पत्रें आलीं. त्यावेळीं ते मद्रासमधील एका आरोग्य भुवनांत होते. मोठ्या आजारांतून ते नुकतेच उठले होते. तरीहि ते मला लांबलचक पत्रें लिहीत असत. मी माझे दिवस कसे घालविले व पुढील कार्याबद्दल माझे काय काय बेत चालले आहेत हें कळण्याची त्यांनी इच्छा दर्शवली होती. माझ्या सुटकेमुळें त्यांना आनंद झाला होता.

त्यांच्या पत्रांतून हिंदुस्थान व हिंदी जनता यांजवरील त्यांचें निस्सीम प्रेम व्यक्त होत होतें. एकदां त्यांनीं लिहिलें होतें: "मला वाटतं गेल्या जन्मीं तूं माझी मुलगी होतीस. मी आतां वृद्ध झालों आहे म्हणून माझी मुलगी मजकडे परत आली आहे. म्हाताऱ्याची आठवण अधून मधून करीत जा."

आम्ही तुरुंगांत असतांना या थोर विभूतींनीं आमच्या सुटकेसाठीं धडपड केली एवढेंच नव्हे तर आम्ही तुरुंगांतून बाहेर आल्यावरहि त्यांनीं आमच्याविषयीं आस्था दाखविली. आमची सुटका झाल्यावर आम्ही आमचा पुढील मार्ग शांत मनानें नीट विचार करून ठरवावा म्हणून त्यांनीं आम्हांला शुभाशीर्वाद दिले.

आज त्यांचीं सर्व पत्रें मजजवळ नाहींत. माझ्या वडिलांनीं यांतलें एकूण एक पत्र जीवापाड जतन करून ठेवलें होतें. दोन वर्षांपूर्वी आम्ही चितगांव सोडून कलकत्त्याला गेलों. जातांना आवश्यक तेवढ्याच वस्तू आम्ही बरोबर घेतल्या होत्या. बाकी सर्व चितगांवलाच ठेवल्या होत्या.

आतां जेव्हां मी हीं पत्रें शोधूं लागल्यें तेव्हां तीं सगळीं वाळवीनें खाऊन टाकल्याचें मला आढळून आलें. एका बंद खोलींत इतर सर्व कागदांबरोबर हीं

पत्रें इतके दिवस पडून होतीं. सगळ्या कागदांचा वाळवीनें फन्ना उडविला. रवीन्द्रनाथांचीं लहानशीं दोन पत्रें काय तीं हातीं लागलीं.

रवीन्द्रनाथ आतां हयात नाहींत. आणि थोर मनाचे अँड्रयूज -सुद्धां आपल्याला सोडून गेले आहेत.

त्या वेळीं रवीन्द्रनाथांनीं घोषणा केली होती : " आपल्या देशोधडीला लागलेल्या लेकरांच्या पाठीशीं सारा बंगाल उभा आहे. "

त्या गोष्टीला आज सात वर्षें होऊन गेलीं. तरीहि अंनतसिंह आणि नवी राज्यघटना येण्यापूर्वीं शिक्षा झालेले राजबंदी अद्यापि तुरुंगांत खितपत पडले आहेत.

आमच्या पुढाऱ्यांना कदाचित त्यांचा विसर पडला असेल, परंतु आपल्या शूर वीरांची आठवण जनतेच्या मनांत अद्यापि ताजी आहे. म्हणूनच कॉ. निरंजन सेन हे कॅाँग्रेस, मुस्लिम लीग, हिंदुमहासभा, कृषकप्रजा आणि इतर पक्षांच्या पुढाऱ्यांना जाऊन भेटले. राजबंद्यांची स्वतःच्या सुटकेची मागणी आणि या पुढाऱ्यांनीं स्वतः या राजबंद्यांना दिलेलीं आश्वासनें या दोहोंची त्यांना निरंजनदांनीं आठवण करून दिली.

निरंजनदा हें अनंतदा आणि गणेशदा यांचे समकालीन. त्यांच्या बरोबरच त्यांनीं स्वतःच्या क्रांतिकारक जीवनाला आरंभ केला होता. ते मास्तरदा ( सूर्य सेन ) यांचेहि आवडते सहकारी होते. बंगाल ऑर्डिनन्स खालीं रत्नागिरीच्या तुरुंगांत मास्तरदा ज्या वेळीं स्थानबद्ध होते त्या वेळीं निरंजनदा त्यांच्या बरोबर होते. तेथून सुटका झाल्यावर त्यांना मचुआ बजार बॉंब खटल्यामध्यें शिक्षा झाली आणि त्यांची अंदमानला रवानगी झाली. शिक्षेची मुदत संपल्यावर त्यांना पुन्हां स्थानबद्ध करून ठेवण्यांत आलें होतें. १९३७–३८ साली राजबंद्यांच्या सुटकेची जी सुप्रसिद्ध मोहिम झाली त्या मोहिमेमुळें त्यांची सुटका झाली.

तुरुंगांतून बाहेर आल्यावर त्यांनीं तुरुंगांत असलेल्या आपल्या कॅाम्रेड्सची सुटका करून घेण्याची जोराची खटपट सुरू केली. क्रांतिकारक चळवळीच्या धकाधकींत व तुरुंगवासाच्या हालअपेष्टांमध्यें व लढ्यांमध्यें या कॉम्रेड्सचे ते सहकारी असल्यामुळें त्यांच्याविषयींचा त्यांचा प्रेमादर अगोदरच द्विगुणित झालेला होता.

गेलीं कित्येक वर्षें निरंजदांनीं या कॉम्रेड्सच्या सुटकेसाठीं देशव्यापी चळवळ उभारण्याची खटपट सतत चालविलेली आहे आणि तिच्यांत कधींहि खंड पडूं दिलेला नाहीं.

या वेळीं गांधीजींच्या सुटकेबरोबर एकामागून एक कॅांग्रेसचे अनेक पुढारी तुरुंगांतून सुटून आले आहेत. परंतु आमच्या पुढाऱ्यांना तुरुंगांतील आपल्या वीरांची विस्मृति पडली आहे. त्यांच्या सुटकेची मोहीम पुन्हा उभारण्याचे प्रयत्न निरंजनदांनीं सुरू केले. ज्या ज्या ठिकाणीं ही मोहीम सुरू करण्यांत आली त्या त्या ठिकाणीं जनता स्वयंस्फूर्तीनें सहाकार्य करण्यास पुढें आली, त्यावरून जनतेचें या वीरांवर केवढें प्रेम आहे हें सिद्ध झालें. परंतु आमचे पुढारी मात्र या बाबत अचल राहिले.

गेल्या मे महिन्यांत निरंजनदा ज्या वेळीं कॅांग्रेस पुढारी व वर्किंग कमिटीचे सभासद श्री. प्रफुल्ल घोष यांना भेटले त्या वेळीं त्यांना एवढंच उत्तर मिळालं कीं त्यांना सोडविण्याचें सामर्थ्य कॅांग्रेसच्या अंगीं नाहीं. कॅांग्रेसचे अधिकृत पुढारी श्री. किरण शंकर रॅाय यांना वेव्हेल परत येईपर्यंत कोणताहि दिलासा देणें शक्य नव्हतें. ( ही गोष्ट सिमला परिषदेपूर्वीची आहे. ) " बोस कॅांग्रेस"चे पुढारी श्री. संतोष बसू यांनीं तर कबूलच केलें कीं गव्हर्नरच काय ते त्यांना सोडवूं शकतील. श्यामाप्रसाद बाबूंच्या सल्ल्याखेरीज या बाबतींत कांहींहि करावयास मि. फझलूल हक तयार नव्हते. त्याच वेळीं श्यामाप्रसादबाबूंनीं आपण कांहींहि हालचाल करणार नाहीं असें सांगितलें. लीगचे पुढारी सर नाझिमुद्दिन व मि. सुऱ्हावर्दी हेहि वेव्हेल कांहीं तरी करील म्हणून वाट पाहात राहिले.

येवढ्यावरच भागलें नाहीं. तर गेल्या निवडणुकींत चितगांवचे सुपुत्र अनंतदा यांनीं चितगांवमधून उमेदवार म्हणून उभे राहण्याची परवानगी मागितली पण गव्हर्नरनीं ती देण्याचें नाकारलें, त्यावेळीं श्यामाप्रसाद यांच्या 'नॅशनॅलिस्ट' या पत्रानें "अनंत सिंह यांना गव्हर्नरकडून थप्पड" अशा उपहासपूर्ण मथळ्यांनिशीं ही बातमी छापली.

गेल्या कांहीं वर्षांतील आपत्तीमुळें आमचा अधःपात कोणत्या थराला गेला आहे याचा या पेक्षां बिनतोड पुरावा दुसरा कोणता मिळणार ?

या पुढाऱ्यांना आज जें महत्पद प्राप्त झालें आहे तें कुणाच्यामुळें ? या वीरांपैकींच अनेकांनीं आपल्या प्रत्यक्ष प्राणाची कुर्बानी केली म्हणूनच ना ? यांच्यापैकीं आणखी कितीतरी जणांनीं आपल्या आयुष्यांतलीं उत्तमोत्तम वर्षें व्यर्थ दवडलीं म्हणूनच ना ? या पुढाऱ्यांना मला आज येवढाच प्रश्न विचारायचा मोह होत आहे कीं " काय हो, बंगालच्या शूर सुपुत्रांच्या अमोल रक्तसिंचनानें पावन झालेल्या या पवित्र भूमीवर उभे राहून तुम्ही ही जी पुढारीपणाची विटंबना चालविलेली आहे, तिची तुम्हांला शरम नाहीं का वाटत ?"

# मी कम्युनिस्ट कशी झाल्यें

ता. १७ सेप्टेंबर १९३२ ची ती रात्र होती. भूमिगत पुढाऱ्यांना भेटण्यासाठीं मी पुरुषवेषांत जात असतां चितगांवमधील पहारताली क्लब जवळ मला पकडण्यांत आलें. त्यावेळीं मी स्वतः भूमिगत नव्हत्यें. स्थानिक सरकारी कॅालेजांत सायन्सच्या चवथ्या वर्षांत मी शिकत होत्यें.

तो एकंदर प्रकार जरा अपूर्व आणि रहस्यमय वाटण्याजोगा होता यांत शंकाच नाहीं. आणि रात्रीच्या वेळीं क्लबजवळ पुरुषाच्या वेषांत मी आढळणें ही जगांतील एक अशक्य घटना होती व पोलिसांना त्याचा अर्थ कांहींच कळला नाहीं.

कांहीं काळ पर्यंत सी. आय्. डी. खात्यानें क्रांतिकारकांशीं माझा संबंध असावा या कल्पनेनें माझ्यावर संशयित म्हणून नजर ठेवली. परंतु माझ्या विरुद्ध कांहींच पुरावा न मिळाल्यामुळें ते भांबावून गेले. रात्रंदिवस माझ्यावर पाळत ठेवतां ठेवतां पोलिस कंटाळून गेले. "कॅालेजमध्यें जाऊन येण्याखेरीज इतरत्र कुठेंहि फिरतांना ती मुळींच आढळत नाहीं," असे तेच ते रिपोर्ट त्याच त्या शब्दांत एका मागून एक ते देत राहिले. प्रिन्सिपॅाल आणि प्रोफेसर म्हणतः "ती अगदीं शांत आणि सद्वर्तनी मुलगी आहे. व ती कॅालेजमध्यें नियमितपणें हजर असते." माझ्याविषयीं खात्री करून घेण्याच्या दृष्टीनें चौकशी व्हावयास हवी म्हणून अधिकाऱ्यांनीं मला कैदेंत ठेवण्याचें ठरविलें.

यानंतर एकच आठवड्यानें म्हणजे २४ सप्टेंबर रोजीं पहारताली क्लबवर प्रीतीच्या पुढारीपणाखालीं क्रांतिकारकांनीं हल्ला केला आणि त्याच ठिकाणीं प्रीति मरण पावली.

पोलिसांची खात्री झाली कीं मी सुद्धां एक क्रांतिकारक असून प्रीतीची साथीदारीण आहे. परंतु पुराव्याच्या व साक्षीदारांच्या अभावीं पहारताली हल्ल्याचा खटला त्यांना पुढें चालवितां आला नाहीं. म्हणून १०९ कलमाखालीं माझ्यावर खटला भरण्याचें ठरलें आणि मी जामिनावर सुटल्यें. हें कलम अनीतीच्या हेतूनें वेषांतर करणाराला लागतात.

जामिनावर सुटका झाल्यावर दोनचार दिवसांतच मास्तरदांचें मला पत्र आलें. त्यांत मला भूमिगत होण्याचा आदेश होता. त्या दिवशीं मला केवढा आनंद झाला तो पुसूंच नये. एके काळीं दहशतवादी पक्षाचे सभासद व्हावयास स्त्रियांना बंदी होती. त्यांत दाखल होण्याची परवानगी मिळाली हेंच आम्ही आमचें मोठें भाग्य समजत होतों. आतां तर नुसतें दाखल होण्याचा प्रश्न नव्हता; आतां फार दूरची मजल गांठण्याचा प्रश्न होता—आतां मला मास्तरदाच्या जवळ राहण्याचा आणि त्याच्या प्रत्यक्ष नेतृत्वाखालीं काम करण्याचा मान मिळाला होता. आयुष्यांत क्वचितच येणारी सुवर्ण संधी होती ही.

म्हणून जामिनावर असतांनाच डिसेंबर महिन्यांत मी निसटल्यें. माझा खटला चालूच होता. माझ्यावर जरी १०९ कलमाखालीं खटला भरला होता तरी पोलिसांचा खरा डाव वेगळाच होता. शस्त्रागारावरील हल्ल्यानंतर लुटलेलीं हत्यारें मीच दडवून ठेवलीं आहेत, इतर मुलींना पक्षाचे सभासद करण्याचा मीच प्रयत्न केला, व क्रांतिकारकांच्या विविध चळवळींशीं माझा संबंध होता हें सिद्ध करण्यासाठीं पोलिसांची धडपड चाललेली होती. लोकांना या प्रकाराचें हंसूंच आलें. ते म्हणूं लागलेः " केवढा मूर्खपणा हा !—राजकीय खटला आणि १०९ व्या कलमा खालीं ! "

भूमिगत असतांना मी मास्तरदाबरोबर होत्यें; या ठिकाणाहून त्या ठिकाणीं त्यांच्या बरोबर जात होत्यें आणि त्याच वेळीं आम्ही पुढील कामाची तयारी करीत होतों. मास्तरदा क्रांतिकारक तरुणांच्या आठवणी आम्हांला सांगत व आपल्या ध्येयाशीं एकनिष्ठ रहाण्याबद्दल आम्हांला बजावीत. फुतुदा आम्हांला बॉंब व इतर स्फोटक द्रव्यें कशीं तयार करावींत हें शिकवीत आणि आपण गेल्यावर आपल्या मागून येणारांना उपयोगी पडावी म्हणून प्रत्येक गोष्ट साद्यंत लिहून काढण्याबद्दल सांगत.

१९३३ च्या फेब्रुवारींत मास्तरदाला अटक झाली. आम्ही मात्र पोलिसांच्या वेढ्यांतून कसेबसे निसटलों.

तीन महिन्यांनंतर मे महिन्यांत मी व फुतुदा एकदमच पोलिसांच्या हातीं सांपडलों. आम्हां तिघांवर एकाच वेळीं खटला भरण्यांत आला. त्या दोघांना फांशीची शिक्षा झाली, पण मला जन्मठेप देण्यांत आली.

मी स्त्री असल्यामुळें व माझें तरुण वय असल्यामुळें मला प्राणदंडाची शिक्षा देण्यांत आली नाहीं असें स्पेशल ट्रिब्यूनलच्या न्यायाधिशानें आपल्या निकालांत सांगितलें.

अशा रीतीनें मी तुरुंगांत आल्यें. १२ फेब्रुवारी १९३४ रोजीं मास्तरदा आणि फुतुदा या दोघांना फांशी देण्यांत आलें. परंतु ही बातमी कांहीं महिन्यांनीं आमच्यांतल्या इतर राजबंद्यांनीं मला चोरून पोंचविली तेव्हांच मला कळली.

त्यांच्या निधनामुळें जरी मी शोकविव्हल झाल्यें, तरी उरलेलें सगळें आयुष्य तुरुंगांतच खितपत राहून काढावें लागेल ही कल्पना मला कधीं पटलीच नाहीं. उलट आम्ही चार दोन वर्षांतच सुटणार असा मला आत्मविश्वास वाटत होता. आपण तुरुंगांत आहोंत तोंपर्यंत आपले देशबांधव स्वस्थ बसणार नाहींत, ते आपली सुटका करतील अशा माझ्या ठाम अटकळीनें मी इतरांना उत्साहित करीत असे.

तुरुंगांत असतांना सारा वेळ आमच्या मनांत मुख्य विचार जर कोणता असेल तर तो आमच्या मागें अपुऱ्या राहिलेल्या कार्यासंबंधींचा होता. त्यांत आढळून आलेला सगळा कच्चेपणा व त्यांतले सगळे दोष दूर करून तें आम्हांला सुटून परत आल्यावर कसें वाढवितां येईल याचाच आम्ही विचार करीत असूं.

म्हणून तुरुंगांत असतांना पहिली गोष्ट आम्ही करीत असूं ती ही कीं आपलें शरीर व मन सुदृढ ठेवावयाचें. तुरुंगांत असेपर्यंत तुरुंगांच्या नियमांचें उल्लंघन करावयाचें नाहीं, वा आपल्या इभ्रतीला व स्वाभिमानाला धक्का पोंचला नाहीं तोंपर्यंत कोणत्याहि प्रकारची प्रक्षुब्धता निर्माण करावयाची नाहीं असा आम्ही ठरावहि केलेला होता.

मी नेहमी अध्यात्मावरील पुस्तकें उत्कंठेनें वाचत असे. असलीं पुस्तकें मला घरून मिळत. शिवाय मी पुष्कळशीं तुरुंगाच्या वाचनालयांतून मिळवीत असे. कारण माझा असा विश्वास होता कीं याच उपायानें आपल्याला आपलें मन सुदृढ करतां येईल व इच्छाशक्तीला काबूंत ठेवतां येईल.

मला शिक्षा होतांच मला हिजलीच्या खास तुरुंगांत नेण्यांत आलें. त्या ठिकाणीं इतर स्थानबद्ध स्त्रिया व दुसऱ्या वर्गाचे स्त्रीकैदी यांच्याबरोबर वाचायला मुबलक संधी होती. पण तीनच महिन्यांत मला तिथून हलविण्यांत आलें. त्या तेवढ्या तीन महिन्यांत मी फारसें वाचन केलें नाहीं. भावी कार्यासाठीं अध्यात्मावरील ग्रंथांच्या वाचनानें मन स्थिर करणें व प्रकृतीची काळजी घेऊन धडधाकट होणें, या गोष्टींवर माझा भर होता.

आणखी तीनचार वर्षांनीं असें ठरविण्यांत आलें कीं सगळ्या स्त्री राजबंद्यांना एकत्र ठेवावयाचें. इतर स्थानबद्ध राजबंद्यांच्या सहवासांत दीर्घ काळ

पाने - ११८

घालवावयास मिळाल्यामुळें बाहेरच्या जगांतील घडामोडींची माहिती घेण्याची संधि यांच्यापैकीं अनेकांना मिळालेली होती. त्याचबरोबर या काळांत 'परिचय' सारखीं कांहीं पुरोगामी नियतकालिकेंहि अधून मधून तुरुंगांत आणण्याची तजवीज होऊं लागली. त्यांमधून मला वेळोंवेळीं कम्युनिझमची माहिती मिळूं लागली. यांच मार्गांनीं सी. ई. एम्. जोड, जी. डी. एच्. कोल, व बर्नार्ड शॉ या लेखकांचीं कम्युनिझम व सोशालिझम विषयींचीं पुस्तकें मला मिळूं लागलीं.

या पुस्तकांतील विचारसरणीनें माझ्या मनांत खळबळ माजूं लागली. आतांपर्यंत ज्या प्रकारच्या क्रांतिकारक वाङ्मयाचा मी सखोल अभ्यास केलेला होता, त्या व या वाङ्मयांतील फरक मला विचारांत घेणें भाग पडूं लागलें. क्रांतिकारक वीरांचीं चरित्रें, खुदीराम, कन्हयालाल, भगतसिंग इत्यादि क्रांतिकारकांचे पराक्रम वर्णन करणारें वाङ्मय आमच्या चित्तवृत्ति थरारून सोडीत असे व मृत्यूशीं निधडेपणानें सामना देण्याची शिकवण आम्ही या वाङ्मयापासून घेत असूं. तरी पण हें सोशालिझम व कम्युनिझम विषयींचें वाङ्मयहि निरुपयोगी म्हणून आम्हाला बाजूला सारतां येईना. आणि म्हणूनच एव्हांपासून माझ्या मनांत एका नवीन द्वंद्वाचे पडसाद उद्भवूं लागले.

हें नवें वाङ्मय मी आवडीनें वाचूं लागल्यें पण त्यांतील ज्ञान मी माझ्या स्वतःच्या विचारसरणीला जुळेल अशाच रीतीनें आत्मसात् करूं लागल्यें. आणि त्यावरून मला असें वाटूं लागलें कीं कम्युनिझम वगैरे सर्व कांहीं ठीक आहे आणि आमच्या स्वतःच्या विचारांत व कम्युनिझममध्यें कांहींच फरक नाहीं. कम्युनिस्ट हे दहशतवाद्यांना आपले विरोधक मानतात असें कुणी तरी सांगूं लागलें तर मी तें सगळें हंशावारी नेत असे व मला तें मुळीच खरें वाटत नसे. मला असें वाटे कीं कम्युनिस्टांचीं व आमचीं ध्येयें एकच आहेत, दोघांनींहि स्वातंत्र्याच्या कार्याला स्वतःला वाहून घेतलेलें आहे, अर्थात् दोघेहि एकाच दिशेनें जाणारे सहप्रवासी आहेत, मग ते एकमेकांचे विरोधक कसे असतील ? तरी पण कम्युनिस्टांचें वाचन आमच्यापेक्षां अधिक विस्तृत आहे, त्यांना एकंदर जगाची व जनतेची व जनतेच्या पूर्वेतिहासाची माहिती आमच्यापेक्षां कितीतरी जास्त आहे हें मला मनोमन कबूल करावेंच लागे. म्हणून आमचें या बाबतींतलें उणेंपण माझ्या मनाला बोंचत राहिलें. बाहेरच्या जगांतली बातमी आमच्यापर्यंत क्वचितच पोंचत असे. दैनिक वर्तमानपत्रें मागविण्याची आम्हांला मुभा नव्हती. आम्हांला 'स्टेट्स्मन्'ची साप्ताहिक परदेशी आवृत्ति व कट्टर प्रतिगामी हिंदु मताचें 'सांजवाणी' ( ती सुद्धां साप्ताहिकच आवृत्ति ) येवढीं दोनच वृत्तपत्रें घेण्याची मंजुरी होती.

' सांजवाणीं 'त राजबंद्यांच्या बातम्या प्रसिद्ध होत असत, आणि म्हणून या विशेष कारणामुळें आम्हांला त्या पत्राचें खास आकर्षण वाटे. पण दुसरें कोण-तेंच वृत्तपत्र मिळत नसल्यामुळें आम्ही या वृत्तपत्रांतलें अक्षरन् अक्षर आठव-ड्याच्या आठवड्याला उत्सुकतेनें वाचीत असूं. मुली नृत्यकला शिकतात म्हणून या वृत्तपत्राला संताप येई व या गोष्टीच्या निषेधार्थ त्यांत लेख येत असत; ते वाचून आम्हांला राग येण्याऐवजीं आमची चांगली करमणूकच होई. पण या पत्राच्या शेवटच्या पानावर जतीन मुजुमदार नामक लेखक सोविएतविरोधी प्रचाराचे लेख दर आठवड्याला लिहीत असे आणि त्यांत स्तालिनला सपाटून शिव्या दिलेल्या असत. या प्रचाराचा परिणाम माझ्यावर झाला हें मी प्रांजलपणें कबूल करत्यें. जनतेच्या पुरोगामी चळवळींना विरोध करणारी ही विचारसरणी अभावितपणें माझ्या मनावर छाप बसवूं लागली.

अशा रीतीनें सोशालिझम विषयीं माझा चांगला ग्रह झाला असतांनाहि स्तालिन विषयीं मात्र माझ्या मनांत जबरदस्त विरोधी भावना बाणून राहिली. क्रांतिकारक राजबंद्यांच्या मनांत पुरोगामी विचारसरणी रुजूंच नये म्हणून सरकारनें जे निकराचे प्रयत्न चालविले होते, ते निदान अंशतः तरी सफल झाले हें यावरून दिसून येतें. सरकारच्या या खटपटीनें आम्ही प्रगतीच्या मार्गापासून जरी परावृत्त झालों नाहीं तरी निदान आमच्या मनांत गोंधळ तर नक्कीच झाला व याच्या योगानें आम्हां क्रांतिकारकांच्या ऐक्यांत फाटाफुटीचें बीजारोपण झालें.

माझ्या मनांत हें वैचारिक वादळ चालू असतांनाच रोमां रोलां यांच्या 'आय् विल् नॉट रेस्ट' (मी स्वस्थ बसणार नाहीं) या ग्रंथाची प्रत माझ्या हातीं आली. रोलां यांचीं ' जीन ख्रिस्तोफर ' व ' सोल एन्चान्टेड ' ( जादूनें भारलेला आत्मा ' ) हीं पुस्तकें मी अगोदरच वाचलेलीं असल्यामुळें त्यांच्या वाङ्मयाची मला अगोदरच गोडी लागलेली होती. म्हणून ' मी स्वस्थ बसणार नाहीं ' या ग्रंथाच्या वाचनानें मला रशियन राज्यक्रांती विषयीं अतिशय आदर वाटूं लागला इतकेंच नव्हे तर लेनिनची थोरवीहि मला या ग्रंथावरूनच पटली.

या नंतर मी अभ्यासांत गढून राहूं लागल्यें. मला एकच ध्यास लागून राहिला : आणखी वाचलें पाहिजे; आणखी ज्ञान मिळविलें पाहिजे; ज्या समाजांत मी राहत्यें, ज्या समाजांत मी लहानाची मोठी झाल्यें, ज्या समाजानें मला माझी सध्यांची स्थिति प्राप्त करून दिली, त्या समाजाचें स्वरूप मी नीट समजून घेतलें पाहिजे.

१९३७ सालीं प्रांतिक स्वायत्तता आली. खटल्याशिवाय तुरुंगांत डांबून ठेवलेल्या सगळ्या राजबंद्यांची सुटका तावडतोब झाली पाहिजे व अंदमानच्या राजबंद्यांना स्वदेशीं परत आणून सोडून दिलें पाहिजे या मागण्यांसाठीं सारा देशभर जनतेची प्रचंड चळवळ सुरू झाली.

अंदमानचे राजबंदी हिंदुस्थानांतील तुरुंगांत परत आले. खटल्याशिवाय अटकेंत ठेवलेले राजबंदी सुटले, आणि शस्त्रागार खटल्यांत लांब मुदतीच्या शिक्षा झालेले तीन राजबंदीहि त्यांच्या लहान वयाकडे पाहून सोडून देण्यांत आले.

मी माझ्या सुटकेची वाट बघत राहिल्यें.

रवीन्द्रनाथ व अँड्र्यूज हे स्वतः माझ्या सुटकेसाठीं गव्हर्नरला भेटायला गेले ही आनंदाची बातमी माझ्या वडिलांनीं मला येऊन सांगितली.

आणखी कांहीं दिवस गेले. मग जेलच्या अधिकाऱ्यांनीं मला अशी खबर दिली कीं गांधीजी स्वतःच आम्हांला तुरुंगांत भेटायला येणार आहेत. त्या वेळीं आम्ही मिदनापूर जेलमध्यें होतों. मला रात्रीं झोंप येईना. माझी सुटका होणार याच्या आनंदापेक्षां आमच्या राष्ट्रांतला सर्वश्रेष्ठ पुढारी आम्हांला भेटायला येणार याचाच मला जास्त आनंद झालेला होता. गांधीजींना काय सांगायचें, काय नाहीं, इत्यादि अनेक प्रश्नांनीं माझ्या मनांत गर्दी करून सोडली. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें गांधीजींना मिदनापूर जेलमध्यें येतां आलें नाहीं. त्यांच्या भेटी-साठीं आम्हांलाच कलकत्त्याला प्रेसिडेन्सी जेलमध्यें नेण्यांत आलें. त्या दिवशीं गांधीजींची थोरवी माझ्या लक्षांत आली. या थोर पुरुषाला करतां येणार नाहीं अशी गोष्ट बहुधा नसणारच आणि म्हणूनच जनता यांना येवढा मान देते हें साहजिकच आहे.

थोडीशी विचारपूस झाल्यानंतर गांधीजी मला म्हणाले: " नाझीमुद्दीन तुझ्यावर भयंकर रागावले आहेत. चितगांव शस्त्रागार हल्ल्याच्या खटल्यापैकीं कुणालाच सोडणार नाहीं असं म्हणतात ते. तरी पण मी तुझ्यासाठीं खटपट कर-तोंच आहें."

परंतु जनतेच्या येवढ्या प्रचंड चळवळीकडे दुर्लक्ष करण्याची हिंमत सर-कारला होणार नाहीं याबद्दल माझी पक्की खात्री होतीच. आमच्या चळवळींतल्या सगळ्या मुली एकीमागून एक अशा सुटल्या आणि मी एकटीच तुरुंगांत शिल्लक राहिल्यें. तरी सुद्धां मी सुटकेची आशा मुळींच सोडली नाहीं.

ता. १ मे १९३९ हा दिवस उजाडला. सरकारला अखेरीस जनतेच्या दडपणापुढें नमतें घ्यावें लागलें. ताज्या दमानें कार्य करण्याची उमेद धरून मी तुरुंगाच्या बाहेर आल्यें.

तुरुंगाच्या दाराशीं माझे वडील व माझा चुलतभाऊ झुमकू हे मला न्यायला आले. झुमकूलाहि शस्त्रागार खटल्यांत शिक्षा झालेली होती आणि आठ वर्षें शिक्षा भोगून झाल्यावर त्याच्या तरुण वयाकडे पाहून आदल्या वर्षी त्याची सुटका झालेली होती.

आम्हांला आमच्या घरीं पोंचवून तो उद्यां पुन्हां भेटायला येईन असें सांगून निघून गेला.

दुसऱ्या दिवसापासून अनेक लोक मला भेटायला येऊं लागले. त्यांत पुष्कळ ओळखीचे तसेच अनोळखी चेहरेहि दिसत असत. यांच्यापैकीं तरुण मंडळी तर मी त्यांच्या बरोबर काम करावें म्हणून लहान मुलांसारखा हट्टच धरून बसत. पुढें काय करायचें हें मी अजून ठरविलें नाहीं याचाच अनेकांना राग आला. यांच्यापैकीं कांहीं प्रौढ मंडळी मला भेटून सांगूं लागलीः "कम्युनिस्ट लोक तुला आपल्या जाळ्यांत ओढतील. अनंतदा, गणेशदा व बाकीचे लोकहि कम्युनिस्ट झालेले नाहींत." एकानें तर मला अंबिकादाचें एक बनावट पत्र दाखविण्या-पर्यंत मजल गांठली; त्याच्या सूचनांप्रमाणें तंतोतंत वर्तन करण्याचा आदेश त्यांत मला दिलेला होता. कांहीं जणांनीं असेंहि सांगितलें: "चितगांव गटापैकीं कम्युनि-स्टांना सामील झालेल्या तिघांना अनंतदा प्रभृतींनीं पार्टीतून हांकलून दिलं आहे."

अनेकांनीं माझ्यावर उपदेशपाठांचा वर्षाव करतां करतां त्याच वेळीं मला इशारे देण्यासहि कमी केलें नाहीं: "असुक असुक तुला भेटायला आला होतासं दिसतं. पण त्याला शब्द देऊन गुंतूं नकोस हं."

या लोकांना काय सांगावें हें मला कळेना. यांच्यापैकीं कुणावर विश्वास ठेवायचा? एका काळीं हे सगळेच लोक 'स्वदेशी' वाले होते, मग यांच्यातल्या कुणाबद्दलहि अविश्वास तरी कसा धरायचा? तरी मी शक्य तितक्या सौम्य शब्दांत त्यांना सांगितलें, "मी कुणाबरोबर काम करीन अन् काय काम करीन हें मागाहून कळेल तुम्हांला."

यानंतर कांहीं दिवसांनीं मी कमल चतर्जीबरोर बाहेर गेल्यें. ती स्थानबद्ध राजबंद्यांपैकींच असून आदल्या वर्षी सुटून आलेली होती. वाटेंत तिनें एका

मुलाला थांबविलें. तो भयंकर घाईंत होता. ती त्याला म्हणाली: “ ऐकलंस का, ही चितगांवची कल्पना दत्त. ही नुकतीच सुटून आली आली आहे. ” “ मग या बाबतींत मला काय करतां येणार ? ” असें तुटक उत्तर देऊन तो मुलगा माझ्याकडे वळून देखील न बघतां तसाच पुढें चालता झाला. कमलनें या गोष्टीचा उलगडा केला: “ हा कम्युनिस्ट पक्षाचा सभासद आहे. हा कसला तरी तांतडीचा निरोप घेऊन जात असावा अन् म्हणूनच याला थांबायला सवड झाली नाहीं. ” कमलनें मला गंगाधर लेनमधील लेबर पार्टीच्या कचेरींत नेलें. तिथें अनेक कम्युनिस्ट कार्यकर्ते येत असत. कारण एकमेकांना उघडपणें भेटतां येण्याजोगी ती एकच जागा होती.

कमलनें त्यांच्यापैकीं अनेकांशीं माझा परिचय करून दिला. तिथून मला एका मित्रानें निहारेन्दु दत्त मुजुमदार यांच्या घरीं नेलें. तिथें लेबर पार्टीतले कांहीं लोक मला भेटले व मी चितगांवला परत गेल्यावर मला वाचायसाठीं म्हणून त्यांनीं समाजशास्त्र, जैवशास्त्र इत्यादि विषयांचीं पुस्तकें दिलीं.

मी गोंधळून गेल्यें. मला चैन पडेना. या कांहीं वर्षांच्या अवधींत बाहेरचें जग इतकें बदललेलें दिसलें कीं तें ओळखूंहि येईना.

मी पुतुदीला ( सुहास्निी गांगुली ) भेटायला गेल्यें. तीहि स्थानबद्ध होती आणि आदल्या वर्षीच तिची सुटका झालेली होती. मी तिला अनंतदा व इतर मंडळींची बातमी विचारली आणि मी सुटल्यावर त्यांच्याविषयीं मला जें जें कांहीं ऐकायला मिळालें तें तें सगळें मी तिला सांगितलें. पुतुदी म्हणाली: “ अनंतदा, गणेशदा अन् चितगांव गटांतले सगळे लोक कम्युनिस्ट झाले आहेत. ” आणि सगळी माहिती मी झुमकूजवळून घ्यावी असा तिनें मला सल्ला दिला.

हा सगळा मतामतांचा गलबला मला चुकवायचा होता. निरनिराळ्या गटांतल्या या मुलांच्या तावडींत मला सांपडायचें नव्हतें. म्हणून मी सरळ दुसऱ्याच दिवशीं झुमकूच्या बिऱ्हाडीं गेल्यें. तिथें आणखी तिघेजण राहात होते. आणि ते सगळेच कम्युनिस्ट होते. झुमकू देखील तुरुंगांत असतांनाच कम्युनिस्टांना सामील झालेला होता. आतांपर्यंत ज्यांनीं ज्यांनीं माझी विचारपूस केली व माझ्याशीं बोलणीं केलीं त्या त्या सर्वांची सगळी माहिती मला त्याच्याकडून हवी होती. त्यानें मला येवढेंच सांगितलें: “ तूं जर आमच्यांत आलीस तर आम्हांला अर्थातच अतिशय आनंद वाटेल, पण खोटे बहाणे करून अगर इतर कोणत्याहि

वाममार्गानें तुला आमच्यांत ओढून आणण्याची आमची बिलकुल इच्छा नाहीं. तुझं तूंच पहा, ऐक, समजून घे, अन् तुला जो मार्ग सर्वांत चांगला वाटेल तोच तूं पतकर. तुला वाचन करायची उत्सुकता असेल तर आम्ही तुला पुस्तकं देऊन मदत करूं. याच्यापेक्षां अधिक आम्हांला कांहींएक करतां येत नाहीं. खरं कोण सांगतो, खोटं कोण बोलतो, याचा तुझा तूंच पत्ता काढ अन् निर्णय लाव. त्या बाबतींत मला कांहींच सांगायचं नाहीं."

त्याच्या बोलण्यांतला एकंदर सूर मला अगदींच वेगळा व नवीन वाटला. मी तुरुंगांतून बाहेर आल्यापासून निरनिराळ्या लोकांकडून मला आपल्या गटांत ओढण्यासाठीं एकतर माझी स्तुति तरी ऐकायला मिळे किंवा उघड उघड थापा ऐकायला मिळत. म्हणून मी जेव्हां चितगांवला जायला निघाल्यें तेव्हां कम्युनिस्टांविषयीं आदराची भावना बरोबर घेऊनच निघाल्यें.

आठवड्यानें मी चितगांवीं आल्यें. आणि तिथल्या जुन्या ओळखीच्या मंडळींपैकीं फक्त कम्युनिस्ट झालेलेच तेवढे अजूनहि कार्य करीत आहेत असें मला आढळून आलें. ते कामगारांचीं युनियन्स संघटित करण्यासाठीं रेल्वे कामगारांमध्यें व गोदीकामगारांमध्यें प्रचार करीत होते. शेतकऱ्यांमध्यें त्यांचें कार्य चालू होतें. स्टूडंट्स फेडरेशन मध्यें विद्यार्थ्यांची संघटना करण्यासाठीं त्यांची खटपट चालू होती. बाकीचे बहुतेक माशा मारीतच बसलेले होते. आणि दहा पांच लोक नवे गट तयार करण्याच्या खटपटींत होते. मला निष्क्रिय राहवेना म्हणून मी कम्युनिस्टांबरोबर कार्य करूं लागल्यें. कम्युनिझमविषयीं नीट ज्ञान मिळविण्यासाठीं मी त्यांची मदत मागितली.

मी थोडेंसें कार्य सुरू केलें आणि त्याच्याच जोडीला थोडेंसें वाचन करूं लागल्यें. मी संताळपाऱ्यांत जाऊन मजुरांना शिकवूं लागल्यें. माळी (झाडूवाले) पारा व धोबीपारा या वस्तीमध्येंहि मी गुप्त सभा घेऊं लागल्यें.

कोणत्या ना कोणत्या तरी जनसंघटनेंत प्रत्यक्ष कार्य करून कसोटीला उतरल्यावर मगच कम्युनिस्ट पार्टीचें सभासदत्व मिळतें असें मी ऐकलें होतें. जनसंघटनेंत काम करायला मला वावच नव्हता. म्हणून पार्टीमेंबर होणें ही फार अवघड गोष्ट आहे व आपल्याला कांहीं पार्टीमेंबर व्हायला मिळणार नाहीं अशीच माझी समजूत झाली.

कधीं कधीं कुणाच्या तरी वर्तनाची मला चीड येई: कुणी तरी कम्युनिझमच्या नांवानें माझ्यापुढें स्वैर प्रेमावर व्याख्यान झोडूं लागे. आणि मला तर

या प्रकाराचा कांहीं अर्थच कळत नसे. कधीं कधीं घरची चांगली स्थिती असलेलीं मुलें उपाशी कॉम्रेड्सच्या डोळ्यांदेखत हॉटेलांत दोन दोन तीन तीन रुपये बिनदिक्कतपणें उडवीत असलेले मला आढळत. आणि कम्युनिस्ट लोक भावनांच्या आहारीं जात नसतांत असें सांगून ते आपल्या वर्तनाचें समर्थन करीत.

पण असली बडबड अगर कृती करणारे लोक एकतर अगोदरच कम्युनिस्ट पार्टींतून निघालेले आहेत अगर लवकरच पार्टींतून हांकलले जाणार आहेत हें मला कळून येई. तेव्हां मग मात्र माझा जीव भांड्यांत पडे व माझी वृत्ति उल्हसित होई. कम्युनिस्ट पार्टींत नैतिक शिथिलतेला अजिबात वाव नसतो. आपल्यापुरताच विचार करणाऱ्या व स्वार्थी लोकांनाहि तींत वाव नसतो. ज्यांना स्वतःचें वर्तन सुधारतां येईल तेच तेवढे पार्टींत राहतात; स्वतःच्या चुका दुरुस्त करायला व स्वतःची सुधारणा करायला पार्टीकडून भरपूर संधि देण्यांत येते. ज्यांना आपली चूक दुरुस्त करतांच येत नाहीं अगर जे आपली चूक दुरुस्त करीतच नाहींत, त्यांची पार्टींतून हकालपट्टी होते.

तुरुंगांतून अनंतदा व गणेशदा यांचीं पत्रें मला आलीं. त्यांनीं सांगितलें: " भरपूर सहानुभूति व समजदारपणा अंगीं असल्याखेरीज माणसाला कम्युनिस्ट होतांच येत नाहीं. भावना ही मूलतः वाईट नसते. "

१९४० च्या एप्रिलांत मी बी. ए. ची परीक्षा दिली आणि मग मी परत कलकत्त्याला आल्यें.

मी किसान सभेच्या कचेरींत काम करावें असें पार्टीनें ठरविलें; नंतर कांहीं दिवसांनीं मी ट्राम्वे कामगार युनियनच्या कचेरींत सारा वेळ काम करावें असें पार्टीनें ठरविलें. मी मध्यम वर्गातली. किसानांचें व कामगारांचें जीवन व त्यांची चळवळ यांसंबंधीं मला कांहींच कल्पना नव्हती. त्यांच्या चळवळींत काम करायला जाण्यापूर्वीं त्यांच्या विषयींची निदान प्राथमिक माहिती तरी मला असणें जरूरीचें होतें. त्याच वेळीं मला मार्क्सवादाचें शिक्षण मिळण्याचीहि तरतूद करण्यांत आली.

नंतर कितीतरी काळ लोटल्यावर मग माझ्या लक्ष्यांत आलें कीं केवळ पुस्तकें वाचून कुणालाहि मार्क्सवाद शिकतां येणार नाहीं व मार्क्सवादीहि होतां येणार नाहीं.

जुलै महिन्यांत मला सायन्स कॉलेजच्या पोस्ट-ग्रॅज्युएट विभागांत प्रवेश मिळाला. महायुद्ध नुकतेंच सुरू झालें होतें. यानंतर सात महिन्यांनीं माझ्यावर

२४ तासांत कलकत्ता सोडून जाण्याची नोटिस बजावण्यांत आली व मला चितगांवीं माझ्या राहत्या घरीं स्थानबद्ध करण्यांत आलें.

या वेळीं बेकायदेशीर पार्टीचें गुप्त कार्य चालू ठेवण्याची कामगिरी मजकडे होती. प्रांतिक कमिटीचीं व मध्यवर्ती कमिटीचीं सगळीं सर्क्युलरें, तसेंच पुस्तकें व कागदपत्रें जिल्ह्याच्या निरनिराळया भागांत पाठविणें; निरनिराळ्या भागांत कार्यकर्ती माणसें पाठवायची व्यवस्था करणें; शहरांत कार्यकर्त्यांना लपण्यासाठीं व सामान सुरक्षित ठेवण्यासाठीं जागेची व्यवस्था करणें; निरनिराळ्या ठिकाणीं हँडबिलें वांटण्याची तरतूद करणें; आणि हें सगळें करीत असतांना कांहीं अभ्यास-मंडळें चालविणें—येवढ्या कामांचा समावेश माझ्या कामगिरींत होत होता.

धोबीपारा व माळीपारा हे जवळच होते. म्हणून नजर कैदेंत असतांनाहि घरच्या व बाहेरच्या लोकांची नजर चुकवून या वस्तींत जाऊन या मंडळींना भेटून यांच्या मार्फत माझीं कामें करून घेणें मला अशक्य नव्हतें. धोबी व झाडूवाले यांच्या सारख्या समाजांतल्या अगदीं कनिष्ठ प्रतीच्या लोकांचीं मुलें असलें काम करायला पुढें येतील अगर आम्ही त्यांच्या मार्फत कामें करून घेत असूं ही गोष्ट पोलिसांच्या अटकळीपलीकडची होती. म्हणून या मुलांना माझ्या घरीं बोलावून घेऊन त्यांच्याशीं गप्पागोष्टी करीत बसायला मला कसलीच आडकाठी होत नसे.

शिवाय असें कीं अजून मी पोलिसांच्या दृष्टीनें दहशतवादीच होत्यें. आणि माझी सगळीकडे फारच प्रसिद्धी झालेली असल्यामुळें त्यांच्या मतें मी गुप्त कार्य हातीं घेणेंच शक्य नव्हतें. मी हीं कामें करीत असेन असा संशय पोलिसांना तर आला नाहींच. इतकेंच काय, या कामाशीं प्रत्यक्ष संबंध असलेल्या चार दोन व्यक्तींखेरीज इतर कुणालाच असा संशय आला नाहीं. पोलिसांचा हिशेब चुकला असेल, पण पार्टीचा हिशेब मात्र चुकला नाहीं. मी जुनी दहशतवादी कार्यकर्ती असल्यामुळें असलें गुप्त कार्य करायला लागणारें उत्कृष्ट कर्तृत्व माझ्या अंगीं होतें आणि माझ्या बाबतींत पोलिसांचा अंदाज नक्की चुकणार अशीच पार्टीचीहि अटकळ होती म्हणून मीच तें काम करण्यांत धोकाहि कमी होता.

१९४१ च्या अखेरीस चितगांववर जपानी स्वारी होण्याचा धोका उद्भवला. त्याच वेळीं माझ्यावरचे निर्बंधहि रद्द झाले. आम्ही महिला आत्मरक्षा समित्यांची संघटना सुरू केली. आणि त्याच वेळीं आम्ही जपानविरोधी प्रचार सुरू केला. आम्ही जें अल्पस्वल्प प्रचारकार्य केलें त्याचें सगळीकडेच अपूर्व कौतुक झालें.

भद्रलोक मंडळींना व एकंदर मध्यमवर्गीयांना आम्ही असें सांगत असूं: "जपानी स्वारी आली तर तुम्ही तुमच्या हातांनीं उभारलेला हा संस्कृतीचा इमला, हें शिक्षण, ही परंपरा, यांचा नायनाट होईल. पन्नास वर्षें कष्ट करून, लढा लढून, तुम्ही ही थोर राष्ट्रीय चळवळ उभारलीत, तिचा जपानी अंमलाखालीं निर्दयपणें नायनाट करण्यांत येईल."

स्त्रीवर्गामध्यें जागृति करतांना आम्ही त्यांना असें सांगत असूं: "स्वसंरक्षणासाठीं व आपल्या स्वतःच्या अब्रूच्या रक्षणासाठीं जपान्यांचा प्रतिकार करायची वेळ आली आहे. तयार रहा."

किसानांमध्यें जागृति करतांना आम्ही असें सांगत असूं: "जपानविरोधी प्रतिकाराचा लढा लढूनच तुम्हांला तुमच्या अन्नाचें, कापडाचें, मालमत्तेचें व जमिनीचें रक्षण करण्याचा लढा लढतां येईल."

या प्रचाराच्या द्वारा आम्हांला प्रत्येकाच्या अंगचा नैसर्गिक देशाभिमान व गुलामगिरी विषयींची चीड जागृत करतां आली. कारण जपान्यांची स्वारी त्यांच्यापुढें साक्षात उभी होती. आणि या सगळ्या प्रचाराच्या योगानें जनतेच्या संघटनांचें बळ वाढलें व जनतेची चळवळ वाढली.

जनतेच्या या प्रचंड पाठिंब्यानें आमचाहि उत्साह द्विगुणित झाला. मास्तरदाच्या काळापासून आम्ही मनांत धरून ठेवलेलें स्वप्न आतां आम्हाला प्रत्यक्षांत आणतां येणार असा रंग दिसूं लागला. दहशतवादी चळवळीच्या काळांत आम्हांला एक गोष्ट सिद्ध करून दाखवावीशी वाटत असे. गनिमी युद्धपद्धतीच्या जोरावर प्रबळ शत्रूचा देखील पराभव करतां येतो ही ती गोष्ट होय. आतां परिस्थितीचा असा अपूर्व योग जुळून आला कीं ही गोष्ट सिद्ध करून दाखविण्याची प्रत्यक्ष संधि आम्हांपुढें उभी राहिली.

१९४२ च्या डिसेंबरांत आम्ही मुंबईला पार्टीच्या पहिल्या अभ्यासवर्गासाठीं आलों. आमची कमजोरी कशांत आहे हें आम्हांला इथें स्पष्टपणें दाखवून देण्यांत आलें तेव्हां आम्हांला तें कळलें. जनतेनें आमच्या हांकेला ओ दिली हें तर खरेंच होतें. जनता आम्हांला पाठिंबा देखील देत होती हेंहि खरेंच. परंतु आजच्या गुंतागुंतीच्या परिस्थितींत जनतेला टिकाव धरतां येईल येवढा फेरफार तिच्या मनोवृत्तींत आम्हांला घडवून आणतां आला नाहीं. या अडचणींशीं दोन हात करून त्यांतून पार होण्याइतकें सामर्थ्य आम्हांला जनतेच्या अंगीं बाणवितां आलें नाहीं.

ब्रिटिश साम्राज्यशाहीचें जोखड आमच्या मानेवर जसेंच्या तसेंच बसलेलें. अशा परिस्थितींत युद्धाचा ताण पडल्यामुळें देशांतील अंतर्गत व्यवस्थेच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडणें अपरिहार्य होतें आणि भयंकर तीव्र स्वरूपाचें आर्थिक अरिष्ट आमच्यावर ओढवणें अनिवार्य होतें. या परिस्थितींतून मार्ग केवळ राष्ट्रीय सरकारलाच तेवढा काढतां आला असता.

जपानी स्वारीचें संकट जिथें खरोखरीच ओढवलेलें होतें तिथें जपान-विरोधी भावना जागृत करणें सोपें होतें; जपान्यांचा प्रत्यक्ष प्रतिकार करण्याइतका उत्साह देखील अशा ठिकाणीं जागृत करतां येण्याजोगा होता. पण इतरत्र या प्रचाराचा देशभक्तांवर कांहींच परिणाम होण्याजोगा नव्हता. देशभक्तांना स्पष्टपणें दिसणारी एकच गोष्ट होती. जोंपर्यंत आपण परतंत्र आहोंत तोंपर्यंत आपल्याला विशेष कांहीं एक करतां येणार नाहीं.

ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनीं राष्ट्रीय सरकार स्थापन करूं देण्याचें नाकारलें. देशावर भयंकर संकट कोसळलेलें असतांना त्यांनीं राष्ट्रीय पुढाऱ्यांना अटकेंत ठेवलें. यामुळें जनतेंतील निराशेची व निष्क्रियतेची भावना आणखीच बळावली. आणि ही भावना सारा देशभर पसरली.

आम्ही पार्टीच्या अभ्यासवर्गाहून चितगांवला परत आलों तेव्हांच सारा जिल्हाभर दुष्काळाची काळी छाया पसरूं लागलेली आम्हांला आढळून आली. १९४३ सालाचे कांहीं महिने उलटले नाहींत तोंच उपाशी स्त्रीपुरुष गांव सोडून जाऊं लागले. त्यांना खाऊं घालण्यासाठीं आम्ही अन्नछत्रें चालू केलीं. इकडे उपाशी लोकांना अन्न मिळत नव्हतें आणि तिकडे स्वार्थी सांठेबाज सगळें धान्य गडप करण्यांत गुंग झालेले दिसत होते.

आम्ही मूळ भद्रलोकांपैकींच. या भद्रलोकांची माणुसकी खलास झाली. त्यांच्या हातून त्यांच्या नैतिक दर्जाला न शोभणारीं कृत्यें होऊं लागलीं. शेतकऱ्याच्या दुःखाबद्दल तोंडानें सहानुभूति दाखवीत असले तरी हे भद्रलोक आपली रोजची गरज भागविण्यासाठीं सांठेबाजांच्या कारवाया तशाच चालू देऊं लागले.

आमच्या कार्याला या लोकांचा आशीर्वाद असे. स्वतःच्या उणेपणाची लाज वाटून यांच्यांतले कांहींजण आम्हांला मदत करायलाहि पुढें सरसावले. पण सांठेबाजाचा समाजांतून समूळ उच्छेद करण्याची त्यांना हिंमत होईना. आणि दुष्काळानंतरच्या काळांत हा सांठेबाजच सर्वशक्तिमान झाला. एकट्या चितगांव जिल्ह्यांतले सुमारें दोन लाख लोक दुष्काळांत मृत्युमुखीं पडले. किसानाची सगळी

मालमत्ता गेली, त्याची जमीन गेली. अनेक किसान काम शोधण्यासाठीं देशो-धडीला लागले. त्यांच्या बायकांनीं लष्करी मजूरदलांत कामें धरलीं. भुकेच्या आगीनें त्यांना आपली इज्जत विकून तिच्या मोबदल्यांत व्यसनें व रोग घेण्याला भाग पाडलें.

मुलांची निष्पाप वृत्तीहि बघायला मिळत नाहीं. हीं मुलें उडाणटप्पू होऊन जिकडे तिकडे भटकत असलेलीं दिसतात. त्यांच्या चेहऱ्यावरील शुद्ध निर्मळ भावच लोपलेले असून एक प्रकारच्या विचित्र अनैसर्गिक भावनेची छाप त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेली दिसते. येंवढ्या लहान वयांत देखील हीं मुलें पैसे मिळवायला शिकलीं आहेत. लष्करी शिपायांनीं दिलेली बक्षिशी त्यांच्या खिशांत खुळखुळत असते. त्यांच्या तोंडात विड्या-सिगरेटी असतात. कांहीं मुलें आपल्या आयाबहिणींच्या अब्रूचा बाजार मांडून राहिलीं आहेत.

त्यांना घरचा अगर कुटुंबाचा पाशच राहिलेला नाहीं. निव्वळ खातेऱ्यांतच त्यांची वाढ होत आहे; त्यांत जीवनाचें पावित्र्य कुठून राहणार ?

भद्रलोकांच्या घरींहि अतःपर शांतता नांदत नाहीं. सांठेबाजाला खूष करून आपल्या रोजच्या गरजा भागवूं असा त्यांचा बेत. पण या गरजा एकसारख्या वाढतच आहेत. आणि या गरजांपायीं हे भद्रलोकहि त्याच सांठेबाजांचे सर्वस्वीं गुलाम होऊं लागले आहेत. इतके दिवस संभाळून ठेवलेला त्यांचा स्वाभिमान केव्हांच लोपला आहे. आणि घरांत असंतोषहि वाढत आहे. यांचीं मुलें व हे स्वतः देखील आतां वाममार्गाला लागले आहेत. यांचींहि नैतिक मूल्यें अजिबात नष्ट झालीं आहेत.

कसलेंहि कार्य करण्याच्या बाबतींत या भद्रलोकांना जागृतच करतां येईनासें झालें आहे. यांच्या तोंडून " आमच्यांत कांहींएक अर्थ नाहीं " अगर " आमच्यासाठीं कांहींतरी करा हो " येवढेच उद्गार फार फार तर ऐकायला मिळतात.

चितगांव शहरीं आमच्यापैकीं जे कार्यकर्ते कम्युनिस्ट पार्टींत सामील झालेले आहेत ते एका काळीं दहशतवादी होते. आम्ही कम्युनिझम मान्य केला, आम्हांला स्वतःला कम्युनिस्ट म्हणवून घेण्यांत अभिमान वाटतो, हें सगळें खरें असलें तरी आमच्या विचारसरणीवर व कार्यावर अजूनहि दहशतवादी व्यक्तिस्वातंत्र्यवादाचा स्पष्ट ठसा उमटलेला दिसतो. १९३०–३१ सालीं आम्ही मूठभर मुलगे-मुली आमच्या स्वतःच्या सामर्थ्यावर भिस्त ठेवून ब्रिटिश

साम्राज्यशाहीशीं दोन हात करायला बाहेर पडलों. परंतु कम्युनिस्ट पक्षांत सामील झाल्यानंतर किती तरी काळ लोटल्यावर देखील, १९४३ च्या दुष्काळाच्या ऐन भरांत देखील, आमच्या मनावरचे जुने संस्कार अजूनहि शिल्लक राहिलेले होतेच. म्हणूनच आम्ही वरकरणीं कितीहि नाहीं नाहीं म्हटलें तरी आम्हांला चोरून मनांतल्या मनांत असें एकसारखें वाटतच होतें कीं त्या वेळीं आमच्या जनतेवर ओढवलेल्या संकटाचें निवारण आम्हांला आमच्या स्वतःच्या सामर्थ्यावर करतां आलें असतें.

पण १९४३ साल हें १९३० साल थोडेंच होतें ? १९३० सालीं आम्हांला जें काय अलपस्वल्प यश मिळालें त्याचें कारण असें कीं जनता त्या वेळीं आमच्या पाठीशीं होती आणि आम्ही आमच्या जुन्या परंपरेनुसार सरळ सरळ सरकार विरुद्ध सामना लढत होतों. परंतु आतां परिस्थिति फारच गुंतागुतीची झालेली होती आणि पूर्वींच्या मानानें दसपट कठीण होती. जनता निराशेच्या व निष्क्रियतेच्या आहारीं गेलेली होती. आमचा शत्रू आमच्या जनतेंतच राहात-वावरत असल्यामुळें तो ओळखूं येत नव्हता. साहाजिकच आमचें एकट्याचें सामर्थ्य अगदींच अपुरें पडलें.

खेड्यांपाड्यांतले बहुतेक कॉम्रेड्स भयंकर आजारी पडले व त्यांच्या हातून काम होईनासें झालें. मी स्वतः आजारीपणामुळें काम करण्यास असमर्थ झाल्यें. पार्टीची अंतर्गत परिस्थिति बिघडूं लागली. खुद्द कांहीं कॉम्रेड्सनांच निराशेनें व हताशपणानें घेरलें आणि कांहीं जण तर पार्टी देखील सोडून गेले. आतां अशा प्रकारचा भयंकर अनुभव घेतल्यानंतर आम्हांला आमची चूक कळून आली, आमचा हिशेब कुठें चुकत होता हें आमच्या लक्षांत आलें.

आमच्या जनतेविषयींचें आमचें प्रेम म्हणजे निव्वळ एक उथळ व वरवरची भावना होती हें उघड दिसूं लागलें. आम्हांला जनतेची ओळखच नव्हती. तिच्या विषयींचें ज्ञान व अनुभव आम्हांला फारच अल्प होता. जनतेचें हृदयविदारक दुःख निवारण्यासाठीं आम्ही कशामुळें पुढें सरसावलों ? केवळ भावनेच्या हळव्या उद्रेकामुळेंच आम्ही या कार्याला प्रवृत्त झालों. या पेक्षां जास्त त्यांत कांहींच नव्हतें. जनतेच्या दुःखाबद्दलची सहानुभूतीच काय ती आमच्या जवळ होती. पण जनतेच्या जीवनाचें ज्ञान आम्हांला मुळींच नव्हतें.

म्हणूनच मग जेव्हां अरिष्टाचा लोंढा एकदम आला व जनता या लोंढ्यांत सांपडून तिची वाताहात झाली, तेव्हां आम्हीहि या अनपेक्षित प्रकारामुळें त्या वेळे-

पुरते तरी अगदीं दिङ्मूढ होऊन गेलों. त्या दिवशीं आमच्या लक्षांत आलें कीं मार्क्सवाद म्हणजे कांहीं जादू नव्हे; जें दिसेल त्याचें सोनें करणारा हा परीस नव्हे; हा कांहीं आपल्याला चांदोबा आणून देणार नाहीं. जीवनाच्या कठोर व कटु अनुभवाचे आम्ही प्रत्यक्ष धडे घेतले तेव्हां कुठें आमच्या लक्षांत आलें कीं मार्क्सवाद हें एक शास्त्र आहे, याच्या योगानें समाजाचें स्वरूप व जनतेचें जीवन समजून घेतां येतें. पार्टीच्या अभ्यासवर्गात आम्हाला जे जे इशारे ऐकायला मिळाले, जे जे आडाखे आमच्या पुढें मांडण्यांत आले, ते ते सगळे एकामागून एक खरे ठरत असल्याचें आम्हांला आतां आढळून आलें.

जीवनाचा हा असा कठोर अनुभव घेतल्यानंतर मग आम्हांला कळलें कीं कम्युनिझम हाच खरा देशाभिमान आहे. देशाभिमानाचा खरा अर्थहि आम्हांला मगच कळला. जनतेवर नुसता वरपांगीं व भावनात्मक विश्वास ठेवणें म्हणजे देशाभिमान नव्हे; अगर पुढाऱ्यांवर अंधश्रद्धा ठेवून चालणें म्हणजेहि देशाभिमान नव्हे. खरा देशाभिमान तो कीं ज्याच्या योगानें आपण जनतेमध्यें आत्मविश्वास जागृत करतों आणि या आत्मविश्वासाच्या जोरावर जनता आपल्या भवितव्याची स्वामिनी होते व आपल्या हिंमतीवर आपलें भवितव्य आपल्या हातीं घेते.

दहशतवादानें आमचा स्वतःविषयींचा आत्मविश्वास जागृत केला; आणि कम्युनिझमनें आमच्या मनांत जनतेविषयींचा विश्वास जागृत केला. दहशतवाद आम्हांला केवळ आमच्या स्वतःच्याच नैतिक गुणांवर भिस्त ठेवण्याची शिकवण देतो. कम्युनिझम त्याच्याहि पलीकडे जाऊन आम्हांला जनतेची व देशाची ओळख करून घेण्याची शिकवण देतो, जनतेच्या वृत्तींत बदल घडवून आणण्याचीहि शिकवण देतो आणि जनतेबरोबरच आमच्या स्वतःच्याहि वृत्तींत बदल घडवून आणण्याची शिकवण देतो.

आणि आम्हांला आणखीहि एक गोष्ट पाहायला मिळाली: आम्ही जें कांहीं अल्पस्वल्प कार्य केलें, जनतेच्या शत्रूंविरुद्ध झगडण्यासाठीं आम्ही जी काय उठावणी केली, तेवढ्याबद्दल जनतेनें आमच्या पदरांत श्रेयाचा वांटा टाकण्याच्या बाबतींत बिलकुल कसूर केलेली नाहीं. चितगांव शहरांत रेशनिंग आलें तेव्हां सारी जनता एकमुखानें म्हणाली "कम्युनिस्टांनीं खरोखरीच रेशनिंगसाठीं खूप चळवळ केली." जनसेवेच्या प्रत्येक कार्यात कम्युनिस्ट आपण होऊन निःस्वार्थीपणानें भाग घेतात ही गोष्ट सगळे लोक मान्य करतात. आमचा जपान-विरोधी

प्रचार, प्रतिकारासाठीं व स्वसंरक्षणासाठीं आम्ही काढलेली मोहिम, यांच्या योगानें जनता अराजकवादाकडे मुळींच झुकली नाहीं. जनतेवर दुष्काळाचें अत्यंत घोर संकट ओढवलें असतांना देखील, हालअपेष्टांचा कडेलोट झालेला असतांना देखील, जनतेच्या अंगाचा मोठेपणाचा गुप्त गुण आम्हांला पाहायला मिळालेला आहे. या मोठेपणाच्या ज़ोरावरच जनता सतत लढत राहते आणि कधींहि शरण जात नाहीं.

कॉम्रेड अनंग सेन याचे वडील सत्तरीला आलेले आहेत. ते कम्युनिस्ट नाहींत, कम्युनिझम त्यांना मान्यहि नाहीं. ते केपारा येथील प्राथमिक शाळेचे एक साधे शिक्षक आहेत. दुष्काळांत बहुतेक शिक्षक शाळा सोडून गेले कारण तिथल्या उत्पन्नांत त्यांचें भागेना. स्वतः सेन हे फार चांगले शिक्षक आहेत. अनेक हयस्कुलांकडून त्यांना आग्रहाचीं बोलावणीं आलीं. पण त्यांनीं आपली प्राथमिक शाळा सोडली नाहीं. दुष्काळांत त्यांना कितीदां तरी उपास काढावे लागले, कितीदां तरी त्यांना अन्नछत्रांतली खिचडी खावी लागली. आणि इतकी अवस्था झालेली असतांना सुद्धां जेव्हां जेव्हां त्यांना कुणी जास्त पगारावर दुसरीकडे बोलावलें तेव्हां तेव्हां त्यांनीं नकार दिला व एकच गोष्ट सांगितलीः "मी जर इथून निघून गेलों तर ही शाळा जगणार नाहीं."

आमच्या जिल्हा कमेटीचा सेक्रेटरी कॉम्रेड यशोदा चक्रवर्ती याच्या वडिलांचीहि गोष्ट अशीच आहे. त्यांचे दोन मुलगे मोक्षदा व प्रियदा हे अजूनहि बाथुआ दरवडा खटल्यासंबंधांत जन्मठेपीच्या शिक्षा भोगत आहेत. कांहीं महिन्यांपूर्वी त्यांचा एकुलता एक नातूहि वारला. घरांत मिळवतें माणूस कुणीच नाहीं. घरच्या अडचणींना व हालअपेष्टांना तर सीमाच नाहीं. तरीसुद्धां त्यांनीं अप्रामाणिकपणाचा व असत्याचा मार्ग पतकरण्याचा विचार एक क्षणभरसुद्धां कधीं मनांत आणला नाहीं. आपल्या जुन्या भिक्षुकीच्या व्यवसायावरच ते अजूनहि गुजराण करतात. आणि शिरावरचें हालअपेष्टांचें ओझें असह्य झालें असतांना सुद्धां त्यांनीं आपल्या दानतीच्या जोरावर आपली मान सतत ताठच ठेवलेली आहे. त्यांच्या थोरवीपुढें समाजाला आदरानें मान लवविणें भागच आहे.

या झाल्या मध्यम वर्गाच्या गोष्टी. पण हा मोठेपणा केवळ मध्यम वर्गापुरताच मर्यादित नाहीं. प्रसन्नबाला ही एक शेतकरी कुटुंबांतली स्त्री आहे. ती एक मध्यमवयस्क विधवा आहे. रावझान ठाण्यांतील २५० स्त्रियांना तिनें नारी समितीकडे आणलें. त्यांच्यापैकीं प्रत्येकीला दुष्काळापायीं हाल भोगावे लागले तरी तिनें

ग्रंथालय सातारा
च-६५
८९९५
५-११४
कि १.५०

एकीलाहि गांव सोडून जाऊं दिलें नाहीं. सगळ्या जणींनीं निरनिराळ्या घरोघरी कामें करून दुष्काळांत एकोप्यानें गुजराण केली. अन्नाच्या दुष्काळानंतर कापडाचा दुष्काळ आला. स्वतःच्या हिंमतीवर पोट भरणाऱ्या या बायांना हा कापडाचा दुष्काळ भलताच नडला. कारण कपड्याशिवाय त्या घराबाहेर पडणार कशा ?

प्रसन्नबालेनें ठरविलें कीं सगळ्या जणींनीं मिळून शहरांत डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटकडे शिष्टमंडळ घेऊन जावयाचें.

स्थानिक सर्कल ऑफिसरच्या कानावर ही योजना गेली. त्यानें शिष्टमंडळाची प्रमुख प्रसन्नबाला हिला एक साडीजोड देऊं केला. हें आमिष दाखवून तिला शिष्टमंडळ नेण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न त्यानें केला. बाणेदार प्रसन्नबालेनें हा कपडा सर्कल ऑफिसरच्या तोंडावर फेंकून दिला आणि त्याला सांगितलें: "मला एकटीला कापड देऊन आम्हां साऱ्याजणींची लाज कशी रे झांकणार तूं ?" तें कापड तसेंच तिथें टाकून ती परत आली, साऱ्या स्त्रियांचा मोर्चा घेऊन मॅजिस्ट्रेटकडे गेली आणि कापड देण्याचें अभिवचन तिनें त्याच्याकडून घेतलें तेव्हांच ती परतली.

उपासमारीला व हालअपेष्टांना कंटाळून सरला लष्करी मजूरदलांत दाखल झाली. एके दिवशीं कामाला जातांना तिला रस्त्याकडेला टाकून दिलेलें एक अनाथ मूल सांपडलें. तिनें हें बाळ उचलून पोटाशीं धरलें आणि घरीं आणून त्याचें लालनपालन चालविलें. मी तिला भेटायला गेल्यें तेव्हां ती हळुवारपणें म्हणाली "कुणा दुर्दैवी आईबापांनीं या बाळाला टाकून दिलें असावें. कदाचित त्याला खाऊं घालायला त्यांच्याजवळ कांहीं राहिलें नसेल म्हणून त्यांनीं असें केलें असेल. आतां मला चार पैसे मिळकत होते, म्हणून त्याला आणलाय मी. आतां मीच त्याची आई होईन आणि त्याला लहानाचा मोठा करीन.

अशीं उदाहरणें फार नसतील. पण तेवढ्यांवरून आमची जनता मेलेली नाहीं, तिचा देशाभिमान कधींहि मरणार नाहीं, हें आम्हांला उमगतें. हे स्त्रीपुरुष भुकेशीं व हालअपेष्टांशीं सतत झगडत असतांनाहि मरणाशीं समोरासमोर सामना देतांना उदात्ततेचें परमोच्च शिखर गांठूं शकतात. स्वावलंबन हा पुस्तकांतून शिकावयाचा धडा आहे असें त्यांना वाटतच नाहीं. स्वावलंबन आपल्या जीवनाचाच एक भाग आहे असें त्यांना वाटतें. आणि असलें मोठेंपण अमर असतें.

या मंडळींनीं स्वतःला वांचविण्यांत तर यश मिळविलें आहेच. हीं माणसें साऱ्या समाजाचाहि आपल्या उदाहरणानें बचाव करण्यास समर्थ होतील,